Bharat Shikshan Prasarak Mandal Latur's

# Jaikranti Sr. College Of Education (B.Ed.)

शैक्षणिक क्रांती म्हणजेच जयक्रांती !

ज्ञानमेव जयते | ज्ञानमेव जयते

ज्ञानमेव जयते

Sitaram Nagar, Latur-413 512 Ph. (02382) 256309

sem:- 1st

**Academic Year : 2021 - 22 .**

**Practicum / Enhancing Professional Capacities / Practical Courses**

**Code & Subject : BEDCC 101 , BEDCC102**

Student Name : Sushila Balaji Bansode.

Roll No. : 08

Class : **B.Ed. F.Y / S. Y.**

Semester : I

5/4/22

भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित

# जयक्रांती अध्यापक महाविद्यालय

## (बी. एड्.)

सिताराम नगर, लातूर

२०21 -२०22

# प्रमाणपत्र

श्री / श्रीमती / कु. सुचिता बालाजी बनसोडे

वर्ग F.Y. सत्र I ह. क्र. 05 यांनी शैक्षणिक वर्ष 2021-22

मध्ये 101

समाधानकारक/चांगले/उत्तमरित्या पूर्ण केले.

करिता हे प्रमाणपत्र देण्यात येते.

दिनांक : 05.04.2022

प्रभारी अधिव्याख्याता
________ विभाग

प्राचार्य
जयक्रांती अध्यापक
महाविद्यालय (बी.एड्.), लातूर

अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. | विषय शिक्षक स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|
| I | B.Ed CC101- भाषेचा अर्थ संकल्पना आणि महत्व स्पष्टकरा | | | |
| | i) भाषेचा अर्थ | 1 to 5. | | |
| | ii) भाषेची संकल्पना | 5 to 10 | | |
| | iii) भाषेचे महत्व | 10 to 17 | | |
| | | | | |
| | | | | |
| II | पेपर ⇒ BEDCC - 102 | | | |
| | शालेय नियोजन मुख्याध्यापक प्रस्तावना | 18 - 24 | | |
| | मुख्याध्यापकांची कार्य | 18 - 24 | | |
| | मुख्याध्यापकाच्या शाळाबाह्य जबाबदाऱ्या | 24 - 28 | | |
| | NAAC ची भुमिका व विजन प्रमाणके | 29 - 40 | | |
| | समारोप | 40 | | |

भाषेचा अर्थ संकल्पना आणि महत्व सविस्तर स्पष्ट करा?

भाषेचा अर्थ-

भाषा मानवी उन्नती आणि प्रगतीचा मुलाधार आहे. भाषेविना एकमेकांचे विचार समाजने अशक्य आहे भाषेमुळे माणसे आपले विचार, भावना प्रकट करु शकतात

मौखिक भाषेत वाक्यांची शब्दांची देवान-घेवान होते व परस्परांचे विचार आपण समजु शकतो मला काही सांगायचे आहे या व्यक्तिच्या प्रवर्तनीतुन भाषा निर्माण झाली. मनुष्य समाजप्रिय प्राणी आहे समाजावाचून तो एकटा राहु शकत नाही. आदिमानव टोळीटोळीने राहत असे व आपआपसातील व्यवहारासाठी कोणतेही माध्यम उपलब्ध नव्हते.

एकमेकांना काही सांगायचे, बोलायचे या भावनेतून किंवा गरजेतून हळूहळू भाषेचा शोध लागला भाषेच्या शोधानंतर मग विचारांची देवाण-घेवाण होऊ लागली. आपआपसात व्यवहार सुलभतेने होऊ लागली, व स्वतःला अभिव्यक्त करणे व दुसऱ्याला समजुन घेने सोपे झाले.

भाषा ही विविध प्रकारे अभिव्यक्त केली जाते. त्यासाठी युक्त्या प्रयुक्त्यांचा वापर केला जातो. त्या पुढीलप्रमाणे असतात.

# भाषा अभिव्यक्ती

- सांकेतिक भाषा
- भ्रुकटी
- राजमुद्रा
- नेत्रमुद्रा
- चिन्हभाषा

**सांकेतीक भाषा –**

सांकेतिक भाषा म्हणजे काही ठरावीक संकेतांची भाषा यालाच आपण हातवाऱ्यांची भाषा किंवा हाताचे संकेत असेही म्हणु शकतो.

**भ्रुकुटी –**

भृकुटीचा अर्थच भुवया असा होतो. भृकुटी म्हणजे भुवयांची हालचाल करणे.

**राजमुद्रा –**

भावनात्मक मुद्रा करणे.

**नेत्रमुद्रा –**

डोळ्यांच्या खुणांनी भाव दर्शविने.

**चिन्हभाषा –**

विविध चिन्हे दाखवून संकेत देणे.

हे सर्व प्रकार विचार अभिव्यक्तीसाठी वापरले जातात इतकेच नव्हे तर प्रसिद्ध तज्ञ [ शिकारी ] निमकाबोट' म्हणतात की प्राण्याची एक विशिष्ट भाषा असते इतर जातितील प्राणीही आपली भाषा समजतात इतकेच नव्हे तर प्राण्यांच्या संगतीत माणुस आला तर मनुष्य सुद्धा प्राण्यांची भाषा समजु शकतो व प्राणी मनुष्याच्या संगतीत आला तर तो मनुष्याची भाषा समजतो. अर्थात पशुंची भाषा ही सांकेतीक भाषा असेल.

उदा- जर शेतात सांळूक्या जास्त ओरडत असतील तर तिथे जवळपास साप आहे असे लोक समजतात.

संदेशवहनाचे काम आदिवाशी समाजाती लोक फार पूर्वीपासुन संकेताद्वारे केले जाते.
उदा - अफ्रिकेतील काही जमाती आपला संदेश मोठे-मोठे ढोल वाजवून देत. विशिष्ट अंतरावर हे ढोल नेमलेले असत ढोलावर पडणाऱ्या ठापेनुसार संदेश बदलत असे आनंदाचा ढोल, शत्रुच्या चाहुलीचा ढोल असे वेगवेगळे संदेश आदिवासी ढोल वाजवून एकमेकांना देत असत. अर्थात ते त्या काळचे दूरध्वनीच होते.

भारतातही काही भागात आदिवासी जमाती वाऱ्याच्या दिशेने एक विशिष्ट शीळ घालून आपल्या साथीदारापर्यंत आपला संदेश अथवा विचार पोहचवत असे.

अर्थातच निरोप विचार माहिती देण्याचे ते अगदी ढोबळ ध्वनिमय प्रयत्न होते माणसाने ध्वनील अर्थ अर्थ दिला व ध्वनिसमुहाला शब्दरूप दिले.

भाषा ही एक मानवाला मिळालेले वरदान आहे. सर्व मानवी व्यवहार ते केवळ भाषेमुळे. सर्व मानवी जीवन व्यापुन टाकनारी ही एक भाषा आज मानवी जीवणाचा एक अभिन्न भाग बनली आहे. माणूस सोडूण इतर प्राण्यांनी आपली भाषा बनवली नाही किंवा बनवू शकला नाही, हाच फरक मानव व इतर प्राण्यात आहे.

मानव यशस्वी होण्यामागे किंवा आजच्या इतकी विकासाची उत्तुंग भरारी मारण्यामागे भाषा हे एक प्रमुख कारण आहे. भाषा नसती तर एका पिढीकडून दुसऱ्या पिढिकडे ज्ञान प्रसारीत झाले नसते व मानव आज आहे इतका विकसीत झाला नसता माणुस हि संकल्पना आपण भाषेशिवाय करु शकत नाही.

आत्मप्रकटीकरण हा एक महत्वाचा भाग आहे. भाषेमुळे देह आहे. भाषेमुळे विचार आहेत ज्यामुळे आपण आपले विचार संवाद रूपाने व लिहुन इतरांना सांगु शकतो किंवा इतरांचे म्हणने ऐकुण घेवू शकतो.

आपण आनंदाचे अनुभव भाषेमुळे घेतो तसेच दु:ख ही आपण भाषेमुळेच अनुभवतो भाषा ही मानवी जिवनाचा अविभाज्य भाग आहे.

## भाषेच्या संकल्पना —

भाषेची संकल्पना स्पष्ट करताना काही अभ्यासकांनी पुढील प्रमाणे व्याख्या सांगितल्या आहेत.

**कृ. पा. कुलकर्णी -**

"भाषा म्हणजे व्यवहारप्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनींचा समुह होय."

**गोसावी आणि वैद्य -**

"भाषा म्हणजे परस्पर सहकार्य व विनिमयासाठी मानवी मुखातुनच प्रकटलेल्या . या ध्वच्छित ध्वनी संकेताच्या पद्धतीला भाषा म्हणतात"

**श्री वगराजेंद्र गडकर -**

"या यशोचित ध्वनी संकेतावर अधारलेली समाज व्यवहाराला सहाय्यभुत अशी पद्धती म्हणजे भाषा होय"

**स्वीट -**
"ध्वनीमय शब्दाद्वारे विचारांचे प्रकटीकरण म्हणजे भाषा होय"

**श्री सुकुमार सेन -**
"सार्थक कंठोद्गार ध्वनी समुच्चय म्हणजे भाषा होय"

**डॉ. माधुरी**
"अपने मन की बात दुसरों तक पहुँचाना और दूसरो की बात समझना भाषा कहलाता है"

ध्वनीत शब्दरूप मिळाले आणि त्या शब्दातून आपल्या विचारांचे प्रकटीकरण झाले की आपण त्याला भाषा म्हणतो. ध्वनी समुच्चय सार्थ असेल तरच मौखिक अभिव्यक्ती योग्य व स्पष्ट होईल.
तसेच स्वीट हे आपल्या भाषेच्या व्याख्येत भाषातेली सार्थक शब्दांना खूप महत्व आहे निरर्थक शब्द भाषेत नसतात असे ते म्हणतात.
समाजातील लोकांच्या तोंडून निघणारे प्रत्येक शब्द भाषा नव्हे तर त्या ध्वनींचा अर्थ समजने म्हणजे म्हणजे भाषेची अभिव्यक्ती.

## भाषेचे दोन रूपे

मौखिक भाषा — लिखित भाषा

भाषेची संकल्पना स्पष्ट करताना असे म्हटले जाते की, भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. मानवाच्या सांस्कृतीक विकासात व प्रसंगी अधःपतनात ही तिने महत्वाचे स्थान निर्माण केले आहे.

## भाषेची लक्षणे —

जगातील कोणतीच भाषा ही एकदुसऱ्या-सारखी नाही.
प्रत्येक भाषेची स्वतःची ही एक वेगळी ओळख आहे, स्वतंत्र व्यवस्था आहे. व्याकरण आहे.

असे असले तरी सर्व भाषेच्या स्वरूपात आणि कार्यात सारखेपणा आढळतो या सारखेपणाच्या आधारे भाषेची सार्वत्रिक लक्षणे ठरवता येतात.

'हॉकेट' या भाषा वैज्ञानीकाने भाषेची लक्षणे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

भा → द्विस्तरीय रचना
षे → निर्मितीशिलता
ची → याद्राच्छिकता
→ आदलाबदल
ल → विशिष्टता
क्ष → स्थलकालतीतता
णे → सांस्कृतिक संक्रमण

1] **द्विस्तरीय रचना —**
उच्चारण दोन पातळीवरुन होणे याला द्विस्तरीय रचना असे म्हणतात.

2] **निर्मितीशिलता -**
पूर्वी कधीही ऐकले नाही किंवा स्वतः उच्चारलीही नाही असे नवे वाक्य, नवी रचना, नवी गाणी करु शकतो याला निर्मिती-शिलता म्हणतात.

3] **याद्राच्छिकता -**
याद्रच्छिकतेमुळे सर्व भाषा एकमेकांपासून वेगळ्या झाल्या आहेत. भाषेत अर्थपरिवर्तनाची प्रक्रिया याद्रच्छिकतेमुळे शक्य होते.
याद्रच्छिकतेमुळे माणुस भोवतालच्या सृष्टीतील कोणत्याही अनुभवाला भाषेच्या माध्यमाने सामोरे जाऊ शकतो.

4] **आदला - बदली -**

एकमेकांच्या भाषीक रचना एकमेकांना समजने त्या पुन्हा-पुन्हा वापरणे ते मानवी भाषेतच शक्य होते. भाषेच्या आदान प्रदानातून किंवा आदला बदलीतुन मानवाला दोन फायदे झाले.

1] मानवाला अनुकरणातून कोणतीही भाषा शिकणे शक्य झाले.

2] मानवी भाषेतील नवनिर्मितरचनांचा सार्वत्रिक वापर होतो.

5] विशिष्ठता

प्राण्यांच्या भाषेच्या तुलनेने मानवी भाषेत खुप मोठी विशेषता आहे.

उदा - आईने 'जेवायला चल' म्हणले की आपण लगेच ताटावर येऊन बसतो.

मानवी भाषेतील शब्दांचा एकच अर्थ निघतो व प्रत्येक शब्दाला वेगळी ध्वनी किंवा वर्णांचा वापर मानव करतो.

6] स्थलकालतीतता –

सृष्टीतील प्रत्येक गोष्ट ही स्थल काल परत्वे बदलत असते पण भाषेला मात्र स्थल कालांची कसलीही बंधने नसतात.

भाषा ही नदीच्या प्रवाहा प्रमाणे वाहत जाते आपल्या सोबत इतर भाषेचे नवी अक्षरे व नवे शब्द आपल्या प्रवाहात सामील करते व पुढे चालते.

उदा – इंग्रजी भाषेच्या प्रवाहामुळे मराठी भाषेच्या वर्णमालेत <u>ऑ</u> ची झालेली वाढ.

डॉक्टर, कॉल, मॉल इत्यादी.

7] सांस्कृतिक संक्रमण –

भाषेचा वारसा, भाषेची संकल्पना एका पिढिकडून दुसऱ्या पिढिकडे संक्रमीत केलि जाते जेव्हा ती एका पिढिकडून दुसऱ्या पिढिकडे संक्रमीत होते तेव्हा तिच्यात त्या पिढिच्या विचारांची भर पडलेली असते.

असीच अनुभवांची भर पुढील-पुढील पिढि कडे संक्रमीत होत असते.

## भाषेचे महत्व -

जगात अनेक वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. पण या वेगवेगळ्या भाषामध्ये कुठेतरी साम्य असते.

प्रत्येक भाषेचे काही ना काही तरी वैशिष्ट आहेत. वेगवेगळ्या समुदायाच्या वेगवेगळ्या भाषा आहेत त्याच्या अनेक उपभाष आसल्या तरी अभिव्यक्तीची काही सर्व भाषेत असतात.

## भाषा एक सामाजीक वस्तु -

कोणतीही भाषा ही कोणा एकाची किंवा एका टोळीची नसून ती समाजीक संस्था आहे. सर्व समाज एकत्रीत रहात असल्यामुळे भाषेचा विस्तार व विकास झाला आहे.

भाषा ही समाजनिर्मित असून समाजाकडून समाजास मिळालेली ही एक देनगी आहे. अमुक एक शब्द अमुक प्रमाणे उच्चारता येत नाही व आपल्या लहरीनुसार भाषा वापरता येत नाही म्हणुन भाषेचे काही नियम आहेत हे नियम सर्वांना बंधनकारक आहेत म्हणजे थोडक्यात ही एक सामाजीक म्हणजेच

समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या त्याच्यावर समान अधिकार आहे.

2. अर्जित संपत्ती -

भाषा ही कोणा एकट्याची नाही तशी ती एक सामाजिक वस्तु आहे. मनुष्याला भाषा जन्मजात प्राप्त होत नाही. मनुष्याला भाषा खुप प्रयत्नांनी अर्जित करावी लागते.

अर्जित करणे = मिळवणे किंवा प्राप्त करणे

वारसा हक्काने आई - वडिलांकडून मुलांना जशी संपत्ती लाभते तशी भाषा मुलांना लाभत नाही त्यासाठी त्यांना प्रयत्न करावे लागतात जन्मजात फक्त ध्वनी प्राप्त झालेला आहे. भाषा नाही ती त्याला स्व प्रयत्नातून समाजाकडून व कुटूंबातील सदस्यांकडून अर्जित करावी लागते.

3. भाषा परिवर्तनशील आहे—

भाषेचा एक महत्वपूर्ण गुणधर्म किंवा भाषेचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भाषा ही परिवर्तनशील आहे. भाषा ही काळानुसार

परिस्थितिनुसार, स्थळानुसार बदलते. अगदी सुरवातीला ज्या शब्दांचा वापर भाषेत होत असे त्यातील बरेच शब्द आज ऱ्हास झाले आहेत. मुळ ध्वनीत तर बदल होत असतातच पण शब्दातही बदल होत आहेत.

उदा - दंत - दात, चक्र - चाक

मराठी भाषेत जे शब्द पूर्वी होते ते शब्द आज असतील असे नाही. भाषेत इतर भाषेतील शब्द जसे येतात तसेच भाषेतील शब्द जातात किंवा त्यांचा ऱ्हास होतो. यामुळे भाषेत काही फरक पडत नाही. याने भाषा बदलली असाही अर्थ होत नाही. म्हणजेच भाषेतील नविन शब्दामुळे भाषेत परिवर्तन होते.

4. भाषा एक संस्कार -

भाषा ही स्वप्रयत्नांने अर्जित करावी लागते तरीसुद्धा भाषा हो एक संस्कार आहे. भाषा शिकण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागत नाहीत व खुप कष्ट करावे लागत नाहीत तरी ती मानवास आत्मसात होते.

त्यासाठी कारणीभूत असते समाजातील व घरातील लोकांचे बोलणे ऐकणे व ते पर्नुच्चारीत करणे.

भाषा मुलांना घरातून शिकवली जाते. ती जेव्हा समान होतात तेव्हा त्यांना भाषेवर सहज प्रभुत्व मिळवता येते.

## 5. भाषा आणि संस्कृती -

भाषा ही संस्कृती साधणाचे साधे व सोपे साधन आहे. आपण आपल्या पिढिचे ज्ञान किंवा घरातील रिती संस्कृती या मुलांना बोलून म्हणजे आपल्या मातृभाषेतून शिकवतो. हे केवळ घरातील ज्ञान झाले.

परंतु विविध शास्त्रज्ञांनी लावलेले शोध, भारतातील विविधतेतील एकता, भारतीय इतिहास, किंवा जगाचा इतिहास, भारताचा व जगाचा भुगोल, विज्ञान, विविध कथा किंवा साहित्य हे सर्व भाषेच्या लिखित रुपात साठवून ठेवता येते. व समजून घेवून त्याप्रमाणे त्यामध्ये वाढ होते.

यामुळे भारतीय किंवा जागतिक संस्कृतीचे रक्षण होण्यास मदत होते.

विचार करण्याचे साधण -

भाषेचे अजून एक महत्वाची गरज म्हणजे विचार करणे. विचार करणे कोणतीही कार्य करण्याआधी मानव विचार करतो.

विचार करण्यासाठी तो आपल्या मातृभाषेचे सहाय्य घेतो जर मानवास भाष अवगत नसती तर मानव विचार करु शकला नसता व आज मानवाने जेवढी प्रगती केली आहे तेवढी आज तो करु शकला नसता. इतकेच काय आज आपण वेगवेगळ्या शास्त्राचा अभ्यास करतो तो ही केवळ भाषेमुळेच.

आपण भाषेमुळे अगदी सुरवातीपासुन शेवटपर्यंत सुसगत विचार करतो व येणाऱ्या अडचणींचा विचार करुण निर्णय घेतो.

7. आत्मप्रकटीकरणाचे साधण -

भाषेमुळे जसे आपण विचार करु शकतो तसेच आपण आपले विचार निर्भयपणे भाषेमुळेच मांडू शकतो. आपल्या मनातील विचार, इच्छा, आकांक्षा आपण इतरांपुढे सुसगत पणे भाषेमुळेच इतरासमोर मांडू शकतो.

आपण भाषेमुळे विचारांची देवान घेवाण करु शकतो. व्यवहार करु शकतो, मनवी

विनिमयाचे एकमेव साधन भाषा आहे.

थोडक्यात भाषा नसेल तर आपण आत्मप्रकटीकरण करू शकलो असतो. व आपले विचार इतरांपर्यंत पोहचवू शकलो नसतो.

## भाषेचे एक स्थिर व मानविय स्वरूप –

भाषा ही परिवर्तन शील असली तरी समाजात ती स्थिर असते. भाषा ही पूर्णतः अस्थिर किंवा विचलीत नसते. काही शब्द बदलत असतात. त्यास आपण भाषा बदलली असे म्हणु शकत नाही. ती कायम स्थिर स्वरूपात असते आणि ती समाजमान्य असते. समाजातील प्रत्येकाची गरज ही भाषा असते, व भाषा स्थीर राहत असते काही शब्दांनी भाषेत काहीही फरक पडत नाही.

ज्या प्रमाने समुद्रात बकेट भरून पाणी टाकले किंवा काढले तरी समुद्राला काही फरक पडत नाही त्याप्रमाने भाषेत काही नवे शब्द आले किंवा काही शब्दांचा ऱ्हास झाला तरी भाषेला काही फरक पडत नाही. भाषा ही स्थिर राहते.

## मानवी प्रगतीचे कारण -

मानवाने आज ज्या अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. ती केवळ फक्त आणि फक्त भाषेमुळे. मानव सोडून इतर सर्व प्राणी रानटी अवस्थेत आहेत. पण आज केवळ मानव रानटी अवस्था सोडून प्रगतीपथावर कार्यरत आहे याचे मुळ कारण भाषा आहे.

म्हणुनच म्हणतात — जो बोलतो त्याच्या अंबाड्या पण विकल्या जातात व जो शांत रहातो त्याचे गहु पण विकत नाहीत.

## समारोप -

समाजात किंवा जगात वेगवेगळ्या अनेक भाषा बोलल्या जातात भाषा ही त्या समाजाची ओळख बनते भाषा ही मानवाच्या उत्कर्षाच्या सर्वात महत्वाच्या दुवा आहे. जगाच्या पाठीवर कुठेही जा तुम्हाला भाषा शिकणे व समजने किती आवश्यक आहे हे समजते.

जिवनात अग्रेसर राहण्यासाठी सर्वात महत्वाची भाषा असते.

शालेय नियोजनामध्ये मुख्याध्यापकाची कार्ये सांगुन लेंक ची भुमिका स्पष्ट करा :—

कुशल माळी बागेचा तसा
कुशल मुख्याध्यापक शाळेचा

मुख्याध्यापक हा शाळेचा कर्णधार असतो शालेय जीवनाचे संचलन करताना त्याला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात मुख्याध्यापकाचे कार्य हे शालेय जबाबदाऱ्यातून दिसून येते.

## मुख्याध्यापकाचे शालांतर्गत कार्य/जबाबदाऱ्या –

### 1.कार्यालये –

शाळेचे दप्तर अद्यावत ठेवने हे मुख्याध्यापकाचे प्रमुख कार्य आहे शाळेतील संपुर्ण रेकॉर्ड कायम जपून ठेवणे हे ही कार्य मुख्याध्यापकाला पार पाडावे लागते विद्यार्थ्याच्या T.C. नोंद आवक-जावक रजिस्टर, शिक्षकाचे नियुक्ती रेकॉर्ड, खेळाचे साहित्य विद्यार्थ्यांना बसण्यासाठीचे बाक डेक्स टेबल, शालेय पोषण आहारासाठी लागणारे साहित्य, भांडी, प्लेट, गॅस इ.

कार्यालयीन दप्तर व त्या संबंधीचे कामे प्रत्यक्षात जरी कार्यालयीन कर्मचारी कारत असले तरी त्याची उत्तम जबाबदारी मुख्याध्यापकावर असते. मुख्याध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली

शाळेतील कर्मचारी वर्ग काम करीत असतो इतकेच नव्हे तर विद्यार्थी शिक्षक उपस्थिती नोंद, बैठक अहवाल निर्गम उतारे इ. दस्तावेज मुख्याध्यापकांना सांभाळून ठेवावे लागतात.

2. सहकारी शिक्षक व विद्यार्थी —

अध्यापन नियोजनानुसार शिक्षक अध्यापण करतात का नाही यावर देखरेख ठेवण्याचे महत्वाचे कार्य मुख्याध्यापकाचे असते. अधुन मधुन वर्ग तपासणी करुन संबंधी शिक्षकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे हे पण मुख्याध्यापकाचे कार्य आहे.

तसेच अध्यापण प्रभावी होण्यासाठी आवश्यक ते शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे तसेच ते योग्य हाताळतात कि नाही हे ही तपासने कार्य मुख्याध्यापकाचे असते.

शालेय परिसरात शिस्तीचे वातावरण राखने ही देखील मुख्याध्यापकाची प्रमुख जबाबदारी असते. वेळ प्रसंगी शिक्षकांसमोर आदर्श पाठ हाचण, आदर्श पाठ घेऊन आपल्या शाळेतील शिक्षकासमोर दाखवावे लागते. दर महिण्याच्या शेवटी शिक्षकांची वही [टाचन वही] मागने व त्यांच्या पाठासंबंधी वेळोवेळी सुचना देवून आपल्या शाळेची गुणवत्ता कशी वाढवता येईल या साठी सतत प्रयत्न मुख्याध्यापकाला करावे लागते.

प्रसंगी विद्यार्थ्यांचे कौतुक करावे लागते तर कधी कठोर शासनही करावे लागते. त्यांना अभ्यासाची चालना देणे, शाळेच्या शिस्तीचे भान ठेवण्यास शिकवणे किंवा वेळोवेळी सुचना देणे.

अशा प्रकारे सहकारी शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी सहकार्याचे संबंध ठेवून शाळेच्या गुणवत्तावाढी मुख्याध्यापक हा घटक सतत झटत राहतो.

## 3.आर्थिक नियोजन -

शाळेचा विकास व उत्कर्ष करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकाची असते शाळेला देण्यात्या शुल्क, अनुदान इ. मार्गाने मिळणाऱ्या पैशाच्या नियोजनाचे कार्य मुख्याध्यापकांना करावे लागते. शाळेला लागणारे आवश्यक साहित्य, देखभाल दुरुस्त्या उपक्रम इत्यादीचे नियोजन करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकाची आहे.

संस्थेच्या शाळेच्या बाबतीत पण जिल्हापरिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या पालकांकडून फि आकारली जात नाही शाळेला लागणारे साहित्य खरेदी करता येते. लोकवाटा निर्माण करण्यासाठी नेतृत्व करण्यास मुख्याध्यापक असावा लागतो. एखादा उपक्रम घ्यायचा असल्यास मुख्याध्यापकांचे हे कार्य

लोकवाटा जमवून ही करता येते.
उदा. वार्षिक स्नेहसंमेलन होण्यासाठी लोकवाटा गोळा करता येतो या माध्यमातून शाळेला लागणाऱ्या वस्तूची खरेदी करता येते. एकंदरीत मुख्याध्यापकाला लोकवाटा होवून त्याच्या नोंदवही मध्ये योग्य तो उल्लेख करावा लागतो.
दरवर्षी शाळेला शासनाकडून येणारे अनुदान जमा खर्च नोंद वही मध्ये नोंदवण्याचे कार्य मुख्याध्यापकांना करावे लागते. तसेच खर्चाच्या पावत्या सांभाळून त्या रजीस्टर मध्ये व्यवस्थीत लावून ठेवण्याचे काम मुख्याध्यापकाला करावे लागते.

## ४. शालेय वस्तू -

शाळा म्हटल्यावर वर्ग, ग्रंथालय प्रयोगशाळा, बाग मैदान इ. मोठे घटक आवश्यक असते याशिवाय फर्निचर शिक्षण साहित्य यांची आवश्यकता असते. या साहित्याची निगा राखने व या साहित्याचा वापर निट होत आहे का नाही हे पाहण्याचे कार्य ही मुख्याध्यापकाचे असते.

### i) इमारत —

इमारत अध्ययन अध्यापनासाठी सुस्थितीत आहे का नाही नसल्यास त्या संबधी

अहवाल तयार करून शाळा व्यवस्थापनाची मान्यता होवून तो अहवाल पाठवावा लागतो.

**२. वर्गखोल्या -**

इयत्तानुसार वर्गखोल्या आहेत की नाही याची पाहणी करून अहवाल तयार करून शासनास सादर करावा.

**३. क्रिडांगने -**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासासाठी क्रिडांगने आवश्यक असतात. शालेय स्पर्धा, परिपाठ होण्यासाठी तसेच वेगवेगळ्या खेळाचे नियोजन करण्यासाठी क्रिडांगनाची गरज असते शाळेला क्रिडांगण आहे व ते व्यवस्थीत वापरण्याची जबाबदारी मुख्याध्यापकाची असते.

**५. ग्रंथालय -**

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडण्यासा व विद्यार्थ्यांच्या स्वयम् अध्ययन चांगल्याप्रकारे करण्यासाठी ग्रंथालय हे विद्यार्थ्यासाठी अनमोल ठेवा आहे. ग्रंथालयात कोणती पुस्तके किती आहेत व कोणत्या पुस्तकांची आवश्यकता आहे याचे ज्ञान मुख्याध्यापकांना असते. तसेच विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर करतो कि नाही याची ही माहिती

मुख्याध्यापकास हवी.

**प्रयोगशाळा —** सध्याचे युग हे विज्ञान युग असल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा असने गरजेचे आहे. त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची माहिती मुख्याध्यापकांना आवश्यक आहे.

## 6. शैक्षणिक साहित्य—

विद्यार्थ्यांचे अध्ययन व शिक्षकाचे अध्यापन योग्य व प्रभावी होण्यासाठी शैक्षणिक साहित्याची आवश्यकता असते.

त्यासाठी लागणारी आर्थिक व बौद्धिक मदत मुख्याध्यापकाला करावी लागते.

## 7. शालेय परिसर व पाणी—

शालेय परिसर निरोगी ठेवण्यासाठी तो दररोज साफ करणे होणे आवश्यक असते विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी, पाण्याची व्यवस्था करणे, तसेच शालेय पोषण आहार तयार करण्यासाठी लागणारे साहित्याची जोड ही मुख्याध्यापकाला घालून द्यावी लागते.

## (8) अंतर्गत उपक्रम —

शाळेत विविध उपक्रम चालतात याशिवाय विविध बाहय परिक्षाचे वर्ग चालवणे, परिक्षा प्रमुख म्हणुन काम पाहने, ही कार्ये मुख्याध्यापकास पार पाडावी लागतात.

शिक्षक, कर्मचारी वर्ग, विद्यार्थी यांना मार्गदर्शन करणे हे काम मुख्याध्यापकांना करावे लागते.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबवणे, शिक्षकांची क्षमता वाढवण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करने यासारखी कामे मुख्याध्यापकांना करावी लागतात.

## 5] मुख्याध्यापकांच्या शाळाबाहय जबाबदाऱ्या

### 1] शासन

शाळा ही शासनाच्या आदेशानुसार व नियमानुसार चालवावी लागते. शासनाकडुन शाळेला येणाऱ्या अनुदानाचा योग्य विनिमय करणे शासणाकडून येणाऱ्या वेळापत्रकानुसार योजना आखने व कार्यवाही करणे ही कार्ये मुख्याध्यापकाचे असतात.

**शिक्षण विभाग -**
नवनवीन प्रयोगा विषयी माहिती मिळवणे व ती आमलात आणण्यासाठी प्रयत्नशील असने हो मुख्याध्यापकाची जबाबदारी आहे.

**प्रयोगशाळा -**
शासनाच्या सुचनेनुसार प्रथम उपयोग शाळा [ विज्ञान प्रयोग शाळा, गणित शाळा] शाळेत आयोजन करावे त्यातून योग्य शिक्षक व विद्यार्थी समुहांकडून प्रथम गाव पातळी मग ~~बळक~~ तालुका व जिल्हा पातळी पर्यंत पोहचण्याचे काम ही मुख्याध्यापकाचे असते.

**शालांत परिक्षा -**
माध्यमिक शाळा व मंडळाच्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थींची तयारी करुन घेणे त्यांना परिक्षेस बसवणे मंडळाकडून येणाऱ्या आदेशांची अंमलबजावनी करने व मंडळाने सांगितलेली माहिती विद्यार्थ्यांना, शिक्षकांना प्रसंगी पालकांना सांगने ही जबाबदारी मुख्याध्यापकाची असते.

**संस्था**
बहुतेक माध्यमिक शाळा या खाजगी

संस्थेमार्फत चालवल्या जातात शाळेवर संस्था-चालकाचे नियंत्रण असते. शालेय प्रशासन व समस्या मुख्याध्यापकांना संस्थाचालकाला करून द्यावी लागते.

शासनाकडून येणारे नियम व उपदेश विस्तारीत स्वरूपात संस्थाचालकास सांगावे लागतात.

## भुमिका -

शालेय विकासात मुख्याध्यापकाची भुमिका एखाद्या सल्लागाराप्रमाणे असते. परंतु तो कधी-कधी या भुमिकेच्या बाहेर येवून सुद्धा कार्य करू शकतो किंबहुना तो ते करतो.

जसे कुटुंबात कुटुंब कर्तास महत्व असते तसेच शाळेत मुख्याध्यापकाच्या भुमिकेत असणाऱ्या व्यक्तीला महत्वाचे स्थान असते.

कुटूंब कर्तांच्या भुकेतील विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात तशाच मुख्याध्यापकालाही विविध भुमिका पार पाडाव्या लागतात. जसे की मुख्याध्यापकाला पालक संपर्क ठेवावा लागतो, विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत यासाठी विविध कृतीयुक्त कार्यक्रम घ्यावे लागतात.

## अध्यापनविषयक कार्य -

मुख्याध्यापक प्रथम शिक्षक असला पाहिजे. मुख्याध्यापक हा सर्व शिक्षकांचा नेता असतो. इतर शिक्षक त्याचे अनुकरण करण्याची शक्यता असते. म्हणुन त्याने आपले विचार, विषय प्रभावीपणे मांडले पाहिजेत.

## नियोजन विषयक भुमीका -

शाळेमध्ये वर्षभराचे कार्य व्यवस्थित होयचे असेल तर त्याचे नियोजन हवे नियोजन करने हे मुख्याध्यापकाचे कार्य असते.

स्थूलमानाने नियोजनाचे (४) चार टप्पे असतात (२) दोन घटक चाचण्या व दोन सत्र (प्रथम सत्र व द्वितीय सत्र) असे चार टप्पे त्याला आपल्या शाळेत पूर्ण करावे लागतात.

## समारोप -

शाळा ही समाजाचे प्रतीरूप आसते. या प्रतिरूपाला सजवण्याचे व घडवण्याचे कार्य मुख्याध्यापक करत असतो.

ज्याप्रमाणे एक कुटुंब प्रमुख आपल्या घरातील किंवा कुटुबातील प्रत्येकाच्या गरजा व जाबाबदाऱ्या पूर्ण करतो त्याचप्रमाणे.

शाळेचा मुख्याध्यापक आपल्या शाळेच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करून शाळेला एक आदर्श समाज, कृती घडवण्याचा प्रयत्न करतो.

त्याच्या या प्रयत्नांना यश हे विद्यार्थी मोठे झाल्यावर येतेजेव्हा सर मला परत लहान होऊन शाळेत यायचे आहे तेव्हा ते साध्य होते.

राष्ट्रीय मुल्यांकण व प्रमानंद्द मान्यता परिषद्द NAAC या संस्थेची स्थापना १९९४ मध्ये करण्यात आली. NAAC ही उच्च शिक्षण संस्था UGC च्या अंतर्गत असनारी ही एक संस्था आहे.

**मुख्यालय** – बेंगलुर [कर्नाटक]

**स्थापना वर्ष** – इ.स. १९९४

**प्रमुख व्यक्ती** - प्रो. एस सी शर्मा

**उद्देश** –

शैक्षणिक क्षेत्रातील प्रचलीत पारंपारीक कालबाहय भाग काढुन टाकुन तिथे नव्या संदर्भातिल आशय संदर्भ, जबाबदाऱ्या निश्चित करणे व प्रत्येक्ष करणे.

आर्थीकि दृष्टया किफायतशीर असणारा व जागतीक स्तरावर आपल्या उच्चशिक्षणात गुणवत्ता राखनारा व ती टिकवून ठेवने हा उद्देश NAAC या शैक्षणिक संस्थेचा आहे. NAAC ने १९९४ पासून उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाची मुल्याकण करण्यास सुरवात केली. मुल्यांकनासाठी NAAC कोणतीही सक्ती करत नाही.

UGC कडून शैक्षणिक संस्थाना मिळणारे भरगोर अनुदान शिक्षण संस्थाना देणाऱ्या, विद्यार्थी, पालक व जनसामान्यातील शिक्षण संस्थेतील प्रतीमा अशा अनेक गोष्टी नॅक कडून होणाऱ्या मुल्यांकनावर आधारीत आहेत.

1 वर्षात 450 उच्च शिक्षण संस्थांचे मुल्यांकण करणे (नॅक) NAAC ने जगातील अशा संस्थामध्ये जागतीक विक्रम केला आहे.

NAAC चे प्रमुख कार्यालय बेंगलुर येथे आहे संपूर्ण भारतातील उच्च शिक्षण संस्थाना आपले मुल्यकण करून घेने सोपे जावे म्हणुन NAAC चे आनखी एक उपकार्यालय जयपुर (राजस्थान) येथे सुरु करण्यात आले आहे.

NAAC ची पूर्वीची मूल्यांकणाची पद्धती आज थोडीशी बदली आहे पुर्वी 10 कसोट्या मुल्यांकना-साठी निश्चित केल्या जात होत्या त्या सध्यस्थितीत 7 किंवा 6 अशा झाल्या आहेत.

पूर्वी एखाद्या संस्थेचे मुल्यांकण केल्या नंतर स्टार देण्याची पद्धती अस्तीत्वात होती मात्र वर्तमान पद्धतीत NAAC ने ग्रेड पद्धती सुरु केली आहे. त्यासाठी S.S.R सुरु करणे आवश्यक

आहे.

SWOT ANAYSIS :-

S - Strength.

W - Weakness.

O - Opportunities.

T - Threats.

म्हणजेच आपली बलस्थाने, त्रुटी, उपलब्ध संधी याचा स्वतः शोध घेने त्याप्रमाणे स्वतःचे मुल्यांकण करणे व ते कितपत खरे आहे व NAAC च्या तज्ञाकडून तपासुन घेने NAAC च्या अधिस्वीकृतीचा दर्जा प्राप्त करुन घेने या मूल्यांकनात अभिप्रेत आहे.

NAAC चे व्हिजन -

गुणवत्तेचे स्वयः मूल्यांकण व बाह्य घटकांद्वारे गुणवत्त वृद्धि आणि गुणवत्तेचे सातत्य त्याच्या माध्यमातून भारतातील उच्च शिक्षणाचे गुणवत्ता पूर्ण बळकटी करण करणे व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाना सक्षम करने हा या संस्थेचा उद्देश आहे.

उच्च शिक्षण संस्था किंवा त्याचे विभाग त्याचे वैशिष्टे, अभ्यासक्रम विशिष्ट प्रकल्प इ. ठरावीक मुल्यमापण करने व अशा संस्था विभाग प्रकल्पांना अभिस्वीकृती प्रदान करने हे ध्येय (नॅक) NAAC चे असते.

उच्चशिक्षण संस्थामध्ये अध्ययन अध्यापन संशोधन याद्वारे गुणवत्ता वाढीसाठी योग्य ते वातावरण निर्माण करणे. उच्चशिक्षणात स्वयंमूल्यमापण जबाबदारी, स्वायत्तता आणि उपक्रम शिलता.

गुणवत्तेशी संबधीत सशोधन सल्ला, प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी आयोजन करने.

गुणवत्तेचे मुल्यांकन गुणवत्ता वृद्धी व सातत्यासाठी शिक्षकांना सहकार्य करणे.

उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम, पाठ्यक्रम पायाभुत सुविधा यांची पडताळनी करणे.

## NAAC ची पहिल्या दशकातील उपलब्धी -

उच्च शिक्षणातील बाह्यमुल्यांकन आणि अभिस्वीकृतीची उपलब्धी रुजवली गेली

उच्च शिक्षण संस्थाचे पुर्नमुल्यांकन करण्यात आले [100 पेक्षा जास्त विद्यपीठे व 1900 पेक्षा अधिक महाविद्यालये]

जगभरातील नव्या संकल्पना पद्धती यांचा भारतीय शिक्षणाच्या संदर्भात समावेश केला गेला.

गुणवत्ता संस्कृतीचा विकास

## NAAC ची दुसरे दशक व दिशा -

माहिती तंत्रज्ञानाच्या ICT माध्यमातून शैक्षणिक संस्थांचे मुल्यांकन करण्यास सुरवात.

एखादा विषय किंवा अभ्यासक्रम यासाठीच्या अभिस्वीकृतीची योजना यशस्वी करणे.

(3) इतर व्यावसायीक अभिस्वीकृती प्रदान करणाऱ्या संस्थाना सहकार्य करणे.

(4) मुल्यमापन करणाऱ्या तंत्रासाठी व्यवसायिक विकास कार्यक्रमाची सोय करणे.

(5) गुणवत्ता हमी नियतकालिक सुरु करने.

(6) संशोधन व प्रशिक्षण यासाठी केंद्रांची स्थापना करने.

(7) उच्चशिक्षणात उत्कृष्ट प्रथाचा प्रचार करणे.

(8) गुणवत्ता हमीच्या नवनवीन पद्धतीना विभागाना योग्य तो सल्ला देणे.

(9) सिमापार (cross-border) शिक्षण सुविधाच्या अभिस्विकृतीची सुविधा उपलब्ध करुन देणे

(10) उच्चशिक्षणातील सर्व घटकांसाठी गुणवत्ता साक्षरता उंचावणे.

## NAAC चे पूर्वमूल्यांकन :-

गुणवत्तेच्या सातत्यपूर्ण बदलाच्या शोध घेत NAAC ने पुनर्मूल्यांकनासाठी काही बदल केले आहेत

1. कसोटी
2. S.S.R. सादरीकरण
3. तज्ञ समितीची भेट
4. NAAC. नॅक

## मूल्य :- Values :-

1. राष्ट्रीय विकासातील उच्च शिक्षण आणि शिक्षण वाटा

2. जागतिक स्पर्धेत टिकाव धर्ती व कौशल्य, ज्ञान विद्यार्थ्यांना देवून त्यांना शिक्षित करणे.

3. विद्यार्थ्यांच्या मूल्यशिक्षणावर भर देणे

5. नवनवीन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर

⑥ उत्कृष्टतेचा ध्यास घेणे.

## NAAC ची गुणवत्ता दर्शक प्रमाणके

कसोटी क्र. 1 :- अभ्यासक्रमाचे स्वरुप

ⓐ उत्तम प्रबोधन
ⓑ अभ्यासक्रमाचा विकास
ⓒ अभ्यासक्रमाचा पर्याय
ⓓ शैक्षणिक लवचिकता
ⓔ प्रत्याधारण यंत्रणा

कसोटी क्र. -2 :- अध्ययन - अध्यापन

ⓐ प्रवेश क्षमता
ⓑ विविध प्रकारच्या क्षमतेच्या विद्यार्थ्यांचा शोध व त्यांच्या शैक्षणिक गरज
ⓒ अध्ययन अध्यापन प्रक्रिया
ⓓ शिक्षकांची गुणवत्ता.
ⓔ अध्यापनाचे मूल्यमापन
ⓕ अध्ययनाचे मूल्यमापन
ⓖ मूल्यमापनातील सुधारणा

कसोटी क्र. 3 - संशोधन सल्लासेवा व विस्तारकार्य

(a) संशोधन वृद्धी
(b) संशोधनामधी फलश्रुती
(c) ~~शैक्ष~~ शैक्षणिक प्रकरने
(d) सल्लासेवा
(e) विस्तार कार्य
(f) विस्तार कार्यातील सहभाग.

कसोटी क्र. 4 :- पायाभुत सुविधा व अध्ययन सामग्री / साधने

(a) भौतिक सुविधा
(b) पायाभुत सुविधा
(c) अध्यापनामधी साधन या दृष्टीने चांगले ग्रंथालय.
(d) अध्यायनाची साधने या दृष्टीने संघटन योजना व सुविधा.

कसोटी क्र. 5 :- विद्यार्थी कल्पना, प्रगती

विद्यार्थ्यांची माहिती
विद्यार्थ्यांची प्रगती

विद्यार्थ्यांचे कल्याण.
उपक्रम

कसोटी क्र. 6 :- संस्थेचे संसाधन व व्यवस्थापन

(a) उद्दिष्टाभिमुख आणि उद्दिष्टाधिष्ठित निर्णय प्रक्रिया

(b) संस्थेची संघटनात्मक संरचना

(c) कार्यकारी अधिकाऱ्यांचे अधिकार व कार्य

(d) सम्यक नियोजन

(E) मनुष्यबळ नियोजन आणि नोकरभरती

(F) कामांचे मूल्यमापन

(g) सेवकांच्या विकासाचे उपक्रम

(h) साधनसंपत्तीचे संघटन

(i) आर्थिक व्यवस्थापन

कसोटी क्र. 7 :- निकोप कार्यपद्धती व चांगल्या प्रथा.

(a) सर्वांगिण व्यवस्थापूर्ण व्यवस्थापन

(b) नवनवे उपक्रम

(c) मूल्याधारित शिक्षणपद्धती सामाजीक जबाबदारी।

(d) नागरिकांचे कार्य

(e) सर्वसाधारण विकास

(f) संस्थाच्या परिसर

(g) सर्वसाधरन विकास वातावरण

(h) संस्थाच्या पुढाकार

Crition wise differential

Curricular aspects - 100

Teaching learning or evaluation - 350

Research consultancy - 120

Infrastructure and learning resources - 100

Student progression - 130

Governance leadership management - 100

Innovation and best practies - 100

1000

समारोप -

NAAC चे कार्य उच्च महाविद्यालयाचे स्थान आणखीन उंच करण्यास मदत करते.

विद्यार्थ्यांना अधिकाधिक चांगल्या सुविधा चांगले शिक्षण, या गोष्टीवर महाविद्यालये विचार करु लागली व NAAC ला प्राचारण करून आपली बलस्थाने व आपल्या कमजोरी ओळखुन त्यामध्ये चांगल्या सुधारना करून आपला दर्जा सुधारण्याचे कार्य NAAC च्या मदतीने महाविद्यालये करत असतात.

म्हणुन NAAC चे कार्य खुप महत्वपूर्ण आहे.

Bharat Shikshan Prasarak Mandal Latur's

# Jaikranti Sr. College Of Education (B.Ed.)

शैक्षणिक क्रांती म्हणजेच जयक्रांती !

ज्ञानमेव जयते ज्ञानमेव जयते

ज्ञानमेव जयते

Sitaram Nagar, Latur-413 512 Ph. (02382) 256309

Sem :- 1st 2nd

**Academic Year :** 2021-22

**Practicum / Enhancing Professional Capacities / Practical Courses**

**Code & Subject :** BEDCC 103 — Contemporary Indian Education
BEDCC 105 - Enviromental Education and Disater mangement.

Student Name : Suchita Balaji Bansode.

Roll No. : 05.

Class : **B.Ed. F.Y / S. Y.**

Semester : 1st

भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित

# जयक्रांती अध्यापक महाविद्यालय

## (बी. एड्.)

सिताराम नगर, लातूर

२०21 -२०22

# प्रमाणपत्र

श्री / श्रीमती / कु. बनसोडे सुचिता बालाजी

वर्ग 1 सत्र I ह. क्र. 05 यांनी शैक्षणिक वर्ष 2021-22

मध्ये 103 ; 104

समाधानकारक/चांगले/उत्तमरित्या पूर्ण केले.

करिता हे प्रमाणपत्र देण्यात येते.

दिनांक : 05.04.2022

प्रभारी अधिव्याख्याता
__________ विभाग

प्राचार्य
जयक्रांती अध्यापक
महाविद्यालय (बी.एड्.), लातूर

अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. | विषय शिक्षक स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|
| | B.ED C C 105 Environmental Education and Disaster M. | | | |
| | | | | |
| I | प्रदूषणाची संकल्पना स्पष्ट करून प्रदूषणाचे सचित्र स्पष्टीकरण | | | |
| | (1) प्रस्तावना | 2- | | |
| | (ii) प्रदूषणाचा अर्थ | 3 | | |
| | (iii) वायु प्रदूषण कारणे व उपाय. | 4-17 | | |
| | (iv) समारोप | 18 | | |
| II | BEDCC 103 Contemporary India and Education. | | | |
| | (i) प्रस्तावना, उद्दिष्टे, महत्व | 20-25 | | |
| | (ii) आंबेडकरांचा परिचय व प्राथमिक शिक्षण | 24-30 | | |
| | (iii) पुरस्कार व पुस्तके, वर्तमानपत्र | 30-35 | | |
| | (iv) सामाजिक कार्य | 35 | | |
| | (v) समारोप | 40 | | |



105

प्रदूषणाची संकल्पना स्पष्ट करून प्रदूषणाचे प्रकार सविस्तर आणि सविस्तर स्पष्ट करा.

## प्रस्तावना -

पर्यावरणावर प्रदूषणाचा अत्यंत हानिकारक परिनाम होत आहे. आज असंख्य रोग हे दूषित पाणि, दूषित हवा, किंवा दूषित वायुमुळे अधिक घातक बनले आहेत.

जलप्रदूषणामुळे सुपिक स्रोत नष्ट होत आहे. कारखान्यांमुळे ज्यादा कचरा निर्माण होत आहे. ज्यामुळे पाणी, हवा व ध्वनी प्रदूषणात वाढ होत आहे.

विज्ञानाच्या या युगात जिथे मानवाला काही वरदान मिळाले आहे. तिथे काही शापही आले आहेत. प्रदूषण हा शाप आहे जो विज्ञानाच्या गर्भातून जन्माला आला आहे. ज्याला जगातील सर्वच लोकांना सहन करावे लागत आहे.

निशा।

## प्रदूषणाचा अर्थ

नैसर्गिक संतुलनात दोष निर्माण करणे. शुद्ध हवा मिळत नाही. शुद्ध पाणी मिळत नाही शुद्ध अन्न मिळत नाही. किंवा शांत वातावरण मिळत नाही.

प्रदूषणाच्या शब्दशः हा अर्थ - नष्ट करणे असा होतो.

## प्रदूषणाचे प्रकार —

प्रदूषण सर्वच क्षेत्रात खुप मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.

1] वायू प्रदूषण

2] जल प्रदूषण

3] ध्वनी प्रदूषण

4] मिट्टी प्रदूषण

5] रेडिओधर्मी प्रदूषण

## वायु प्रदूषण -

मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे अपरिमित नुकसान झाले आहे. त्यामुळे जल प्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि मृदा प्रदूषण अशा प्रदूषणाच्या विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी वायू प्रदूषण ही समस्या अत्यंत धोकादायक असते.

जिवंत राहण्यासाठी सजीवांना प्राणवायुची आवश्यकता असते. माणूस आहार किंवा पाण्याशिवाय अनेक दिवस जिवंत राहु शकतो मात्र हवेशिवाय 10 मिनिटेही जिवंत राहू शकत नाही. प्राणवायू म्हणजेच ऑक्सिजन हा हवेतील महत्वाचा घटक होय.

हवेत ऑक्सिजनचे प्रमाण 21% असते ते 10% ने ही कमी झाले तर मानवाला मृत्यु अटळ आहे.

ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे सर्वप्रथम मेंदूवर आघात होतो. यामुळे गोंधळलेली अवस्था येणे, मृत्यु येणे असे प्रकार घडतात. विषारी दुषित वायु केवळ आपल्या अस्तित्वाने हेवेतील ऑक्सिजन कमी करते.


POLLUTION
alamy
www.alamy.com



## वायू प्रदूषण म्हणजे काय :-

जगण्यासाठी सर्वच सजीवांना प्राणवायूची गरज असते. हा प्राणवायु हा हवेमध्ये असतो.

वातावरणातील हवेमध्ये दूषित अपाय-कारक घटक हवा प्रदूषित होते असते. उच्च त्या हवेची गुणवत्ता खालवते. अशी हवा सजीवांच्या आरोग्यासाठी निवडून येते यालाच वायू प्रदूषण किंवा हवेचे प्रदूषण असे म्हणतात.

हवेची गुणवत्ता ही वायु गुणवत्ता निर्देशांक [ हवा गुणवत्ता निर्देशांक ] त्यानुसार केली जाते. ज्या हवेचा इंडेक्स 0 ते 0.5 असते ती हवा स्वच्छ व प्रदूषण रहीत समजली जाते.

## हवेतील प्रमूख घटक व त्याचे प्रमाण-

नायट्रोजन - 79.20 %.
ऑक्सिजन - 20.60 %.
कार्बनडाय ऑक्साइड - 0.20 %.
अन्य घटक - सुक्ष्म घटक असतात.

## वायु प्रदूषण कारणे -

हवेच्या प्रदूषणास मानवच सर्वस्वी जबाबदार आहे. याची काही करणे पुढीलप्रमाणे आहेत.

लोकसंख्या वृद्धी

शहरीकरण

औद्योगिक विकास

प्लास्टिक मुळे बाहेर पडणारा वायु.

औष्णिक वीज केंद्राच्या धुर

रासायनिक उद्योग बाहेर पडणारी रासायनिक घटक

बेसुमार वृक्ष तोड

धूळ

कचरा जाळने व त्याचा होणारा धुर

टायर जाळणे.

लाकडाचा जळण म्हणून वापर

अमर्यादित वाहनांचा वापर. वाहनां मुळे होणारे प्रदूषण हे सर्वात जास्त आहे. वाहनांच्या आतून निघणाऱ्या धुरात कार्बन मोनोक्साईड चे प्रमाण अधिक असते.

फ्रिज, A.C. यांच्या अतिवापरामुळेही वायु प्रदूषण होते.

शेतामध्ये कीटकनाशके जंतुनाशके मारली किंवा फवारली जातात त्यातून निघणारे गॅस ही हवेमध्ये पसरतात व त्यातुनही वायुप्रदूषण होते.

याशिवाय जंगलातील वणवा, ज्वालामुखींच्या उद्रेकामुळेही वायुप्रदूषण होते पण यांचे प्रमाण खुप कमी असते.

## वायु प्रदूषणाचे दुष्परिणाम :-

हवे शिवाय मनुष्यप्राणी मानवी जीवन जगू शकत नाही. कारण जगण्यासाठी हवेची क्रिया सतत चालू ठेवावी. मात्र जरूर प्रदूषित असेल तर ? यान्या निश्चित वाईट परिणाम आपल्या आरोग्यावर परिणाम होतो.

हवा दूषित झाल्याने सर्व सजीवांना घातक परिणाम भोगावे लागतात यामध्ये मानवाला विविध प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागते.

हवेतील प्रदूषकांमुळे वनस्पतीची वाढ होत नाही रस्त्याच्या कडेला असणाऱ्या गवतामध्ये वाहनांच्या धुरात असणारे शिसांचे सूक्ष्म कण मिसळतात. असे गवत खाणाऱ्या प्राण्यांचे आरोग्य धोक्यात येते. परिणामी कधि कधि प्राण्यांच्या जीवावर बेतते.

खनिज तेलाचे उत्पादन करणाऱ्या क्षेत्रामध्ये वनस्पतींची संख्या कमी असते. याचे कारण म्हणजे खनिज तेलाने होणारे प्रदूषण वनस्पतीसाठी घातक ठरते.

हवा प्रदूषणाचे परिणाम केवळ सजीवावर होत नाहीत तर ते परिणाम दगड माती व तेथील वातावरणावरही होतात.

दगडी, लाकडी, मातीचे आणि धातूची शिल्पे यावर दूषित हवेची प्रक्रिया होते

उदा → ताजमहल हा पांढऱ्याशुभ्र संगमरवरापासुन बनवला आहे पण आता तेथील हवा प्रदूषणामुळे ताजमहलच्या संगमरवरांचा रंग पिवळसर काळा होत आहे.

ओझोन वायुचा थर कमी होने :–

ओझोन वायू सूर्यापासून येणारी अल्ट्राव्हायोलेट सारखी हानिकारक किरणे वातावरणाच्या वरच्या बाजुला रोखुन धरण्याचे कार्य करत असतात. या वायूच्या थराला पृथ्वीचे कवच असे म्हणतात. पण हवेतील कार्बनडाय ऑक्साइड व कार्बनमोनोऑक्साइडच्या वाढत्या प्रमाणामुळे या ओझोनच्या थराला छिद्र पडत आहेत. त्यामुळे सूर्याची गर्मी दिवसेंदिवस वाढत आहे.

हवेतील क्लोरोफ्लोरो कार्बन हा प्रदूषक हवेत मिसळला जाऊन ओझोनच्या थरात पर्यंत जाऊन पोहोचतो. ओझोनला प्राणवायुचा पट्टा असेही म्हणतात. याच ओझोनला विघटीत करण्याचे काम क्लोरोफ्लोरो नामक रसायन करत आहे.

परिनामी ओझोनचे प्रमाण कमी होऊन सूर्याची अतिनिल किरणे पृथ्वीवर येत आहेत.

दूषित हवा पावसावर देखील परिणाम करते. पावसावर परिणाम झाल्याने शेतीवरही अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते. यामुळे वाळवंटीकरण होण्याचा वेग झपाट्याने वाढत आहे.

हवेमुळे राजस्थान च्या सीमालगत असणाऱ्या पंजाब कडे वाळूचे ढिग येत आहेत जर वाटेत झाडे नाहीत हवेत गरमी आहे. त्यामुळे हवेचे प्रसरण होऊन हवा दूर पर्यंत पसरते आहे. त्यामुळे भारतात वळवटी प्रदेश वाढत आहेत.

पेट्रोल आणि डिझेल यामध्ये जळणारे प्रदूषकांमध्ये कार्बन डाय-ऑक्साइड, कार्बन मोनोक्साईड, अर्धवट जळालेल्या हायड्रोकार्बन्स सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड शिशाची संयुगे, धुर, आणि सुक्ष्म कणांचा समावेश होतो.



# वायु प्रदूषण रोखण्यासाठीच्या उपाययोजना

प्रदूषण होण्यासाठी सर्वात महत्वाचा घटक म्हणजे वाढती लोकसंख्या, ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी व्यक्ती समाज आणि शासन यांनी नियोजपूर्वक कार्य करणे आवश्यक आहे.



रासायनिक कारखाने आणि तेल शुद्धीकरण कारखाने किंवा खत, कागद आणि धातू प्रक्रिया कारखाने या ठिकाणी वापरण्यात येणाऱ्या प्रदूषकांची सहनसीमा प्रत्येक उद्योगाने कटाक्षाने पाळली पाहिजे. असे केल्यास हवा प्रदूषणाचे प्रमाण निश्चितच कमी होईल.



सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, सागरी ऊर्जा
आणि जैविक ऊर्जा अशा पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा
वापर करावा।



वाहनांची नियमित देखभाल करावी तसेच काही खराबी झाली असेल तर तात्काळ दुरुस्ती करुन प्रदूषण नियंत्रणास मदत करावी.

एकाच ठिकाणी कारखान्यांची गर्दी झाल्याने त्या परिसरातले सगळेच वातावरण प्रदूषित होऊन जाते यासाठी कारखान्यांचे विकेंद्रिकरण करावे. त्यामुळे सर्वच भागाच्या विकासही होईल तसेच मिळणाऱ्या सोईवर ताण ही पडणार नाही.

इंधन म्हणुन लाकडाचा वापर करु नए त्यासाठी जनजागृती करण्यात यावी.

झाडे लावावी व ती जगवावी असा निर्धार करावा.

लहानपणापासूनच वृक्षाबद्दल ची जाणिव मुलांमध्ये निर्माण करावी.

आपल्या घरात जीतकी मानसे तितकी झाडे आपण लावावी व ती मोठी करावी.

जर लहान पणापासूनच मुलांमध्ये प्रदुषणाविषयी जागृकता निर्माण केली तर मुले आपोआप प्रदुषणा पासून होणाऱ्या त्रासापासून दूर राहतील.

सर्वात महत्वाचे म्हणजे आपले पर्यावरण सार्वजनिक संपत्ती नसुन ती आपली खाजगी संपत्ती आहे असे समजून तीचा नाश करणे थांबवले पाहिजे. तीचा योग्य प्रमाणात वापर केला पाहिजे.



## समारोप :—

आजच्या या लेखात मी हवेच्या प्रदूणाची कारणे, दुष्परीनाम व हवा प्रदूषणाचे रोखण्यासाठीच्या काही उपाययोजना सांगीतल्या आहेत.

हवा ही नेहमी वाहत असते एका जागेवरुन दुसऱ्या जागेत. या हवेत सुंगध दिला तर ती सर्वत्र सुंगध दरवळत जाते प्रदूषण दिले तर प्रदूषण पसरवत जाते.

तर आता आपणास ठरवायचे आहे की सुंगध द्यायचा आहे की प्रदूषण.

11/4/2022

एका भारतीय विचारवंताच्या
शैक्षणिक योगदानाचा
चिकित्सक अभ्यास

**प्रस्तावना -**

भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेऊन देशासाठी व समाजासाठी आहोरात्र कार्य करुन सामाजीक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली त्यांच्या सेवेचा वारसा आजही देशावासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरलेला आहे.

अशा या थोर पुरुषात डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांचे नाव अग्रस्थानी आहे.

कर गुजर गये वो भीम थे।
दुनिया को जगाने वाले भीम थे।

हमने तो सिर्फ इतिहास पढा है यारो।
इतिहास बनाने वाले हमारे भीम थे।

भीमरावांना असे काही तरी करायचे होते की ते या जगातून गेल्यावरही त्यांना आपले कार्य जिवंत ठेवायचे होते. देशप्रेमाच्या ध्येयाने झपाटलेली ती त्यागमयी मुर्ती होती. म्हणुनच मला येथे एक बाबसाहेबांची ओळ आठवत आहे.

मैं ऐसे धर्म को मानता हूँ
जो स्वतंत्रता, समानता और
भाईचारा सीखता है।

## उद्दिष्टये :-

आपण कोणतेही कार्य करताना त्या संबंधीचे उद्दिष्टये किंवा ध्येय निश्चित करत असतो. व त्या नुसार आपण आपल्या कार्यात आग्रेसर होत असतो.

माझ्या प्रात्यक्षिक कार्याचे उद्दिष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेणे हा आहे. त्याचबरोबर आंबेडकरांची जीवनशैली कशी होती, त्यांनी कोणती पुस्तके लिहली या पुस्तकांचा इतर जनतेवर काय परिनाम झाला याची माहिती देण्याचा प्रयत्न मी करत आहे.

तसे पहाता आंबेडकरांचे पूर्ण चरित्रच हे अनुकरणीय आहे पण त्यातील काही पैलुंना मी समजुन घेण्याचा प्रयत्न या प्रात्यक्षिकाद्वारे करण्यात आला आहे.

खूप

**महत्व –**

प्रात्येक्षिक कार्याचे महत्व खुप आहे. आपण किंवा मानव स्वत: केलेली गोष्ट लवकर विसरत नाही.

त्याचप्रमाणे विद्यार्थी दर्शन केलेले प्रयोग आयुष्यभरसाठी मनावर अधिराज्य करतात.

म्हणुनच शाळेत प्रयोगशाळा, ग्रंथालय संगणक कक्ष यांची सोय असते. यांच्या मदतीने विद्यार्थी आपले प्रयोग किंवा प्रात्यक्षिक कार्य करतात.

प्रात्यक्षिक कार्या मुळे विद्यार्थ्यातील कलागुणांची वाढ होते. त्याच्यात सृजनशीलता वाढीस लागते.

विद्यार्थीकेंद्री शिक्षकप्रणाली मध्ये प्रात्यक्षिक कार्याला खुप महत्व आहे. प्रात्यक्षिक कार्या मुळे विद्यार्थी वेगवेगळी पुस्तके वाचतात संदर्भ ग्रंथ वाचतात व आपले प्रात्यक्षिक कार्य दर्जेदार करण्याचा प्रयत्न करतात.

## अंबेडकरांचा परिचय -

पूर्ण नाव :- भीमराव रामजी सकपाळ [अंबेडकर]
वडीलांचे नाव :- रामजी सकपाळ
आईचे नाव :- भीमाबाई सकपाळ
पत्नीचे नाव :- ① रमाबाई सकपाळ
② सविता
जन्म :- १४ एप्रिल १८९१
जन्मठिकाण :- महु मध्यप्रदेश
मुळ गाव :- अंबवडे रत्नागीरी महाराष्ट्र
मृत्यु :- 6 डिसेंबर 1956 [वय वर्षे 65]
समाधीस्थळ :- चैत्यभूमी, मुंबई महाराष्ट्र.

## प्रारंभिक जीवन -

अम्बेडकरांचा जन्म 14 एप्रिल 1891 ला ब्रिटिश भारतातील मध्य भारत म्हणजे आताच्या मध्यप्रदेश राज्यातील महु या गावी झाला.

त्या काळी महु ही एक लष्करी छावनी होते तेथे त्यांचे वडील लष्करात कामास होते.

डॉ. अंबेडकर हे रामजी सकपाल व भीमाबाई यांचे 14 वे व अंतीम आपत्य होते. अंबेडकर कुटुंब कबीर पंथ माननारे होते. त्यामुळे लहानपणा पासुनच अंबेडकरांवर धर्मनिरपेक्षवादाचा प्रभाव किंवा पगडा जास्त होता

अंबेडकर कुटुंब मुळचे मराठी होते आणि ते रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे गावचे रहीवासी होते.

त्यावेळी भारतात स्पृश्य अस्पृश्य भेदभाव खुप मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होता.

# लहानपणी चे अंबेडकर

वय - 13 वर्ष



या स्पृश्य - अस्पृश्यतेच्या झळा आंबेडकरांनाही सोसाव्या लागल्या होत्या. शालेय शिक्षण करण्यास सक्षम असुनही त्यांना अस्पृश्य असल्या कारणाने अनेक अपमान सहन करावे लागले. तसेच अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

तरीही हार न मानता त्यांनी आपले शिक्षण चालु ठेवले.

## प्राथमिक शिक्षण :-

अंबेडकरांनी 7 नोव्हेंबर 1900 रोजी सातारानगर येथील राजवाडा चौकात असलेल्या शासकीय हायस्कूल येथे इंग्रजीच्या पहिल्या वर्गात प्रवेश घेतला.

या दिवसापासून त्यांची शैक्षणिक कारकीर्द सुरु झाली म्हणुन महाराष्ट्रात 7 नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणुन साजरा केला जातो.

भीमराव इंग्रजी चौथी इयत्ता पास झाले



बॅरीस्टर अंबेडकर

## माध्यमिक शिक्षण :-

1907 :→ मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण

1912 :→ B.A अर्थशास्त्र, राज्यशास्त्र

1915 ते 1917 :→ कोलंबीया विद्यापिठात पदवी पदव्युत्तर, शिक्षण

1917 :— M.A. उत्तीर्ण

1918 :— अर्थशास्त्र P.H.D. पूर्ण

1927 :— P.H.D. अधिकृत रीत्या प्राप्त

1916 :— त्यांना बॅरीस्टर ही पदवीका प्राप्त

1952 :— उस्मानिया विद्यापिठाची मानक पदवी.

# आंबेडकरांची ग्रंथसंपदा

| क्रम संख्या | पुस्तकाचे नाव | प्रकाशित वर्ष |
| --- | --- | --- |
| 1. | भारतातील जातिसंस्था तिची रचना उत्पत्ती आणि विकास | १९१६ |
| २. | ब्रिटीश भारतीय प्रांतिक वित्ताची उत्क्रांती | १९१६. |
| ३. | संघराज्य विरुद्ध स्वतंत्र्य | १९३९. |
| ४. | रुपयाचा प्रश्न उद्गम आणि उपाय | १९२२. |
| 5. | पाकिस्तान अथवा भारताची फाळणी | १९४५ |
| 6. | जातीचे निर्मूलन | १९३६ |
| 7. | रानडे, गांधी आणि जिन्ना | १९४२ |
| 8. | बौद्धधम्म आणि साम्यवाद | १९५६. |

येथे नमूद करणे महत्वाचे आहे की बाबासाहेबांच्या वैयक्तिक ग्रंथालय "राजगृह" मध्ये 50,000 पेक्षा जास्त पुस्तके होती आणि ती जगातील सर्वात मोठी खाजगी ग्रंथालय होती डॉ. बाबासाहेब अंबेडकर हे एकूण 64 विषयाचे मास्टर होते.

डॉ. बाबासाहेब अंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि स्वातंत्र भारताचे पहिले न्यायाधिश होते.

## पुरस्कार -

भारताच्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांना 31 मार्च 1990 ला मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात आला त्यांचा हा पुरस्कार मुलांना देण्यात आला.

## सामाजिक कार्य -

डॉ. बाबासाहेब अंबेडकर म्हणजे भारताच्या नव्या उभारणीचे एक महान वैभव बनल होते. लोकशाही आणि राज्याघटना आणि जगातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी लोकशाही शासनाचा स्विकार केला त्यामध्ये एक व्यक्ती एक मत, एकमुल्य आणि एकच किंमत हा सिद्धांत दिला. ही राजकीय लोकशाही असली तरीही त्याचे रूपांतर सामाजीक व आर्थीक लोकशाहीत व्हावे असे त्यांना वाटत होते. तरच जगापुढे हा देश टिकेल अन्यथा अडचणी येतील त्यासाठी त्यांनी जगाला शोभेल आणि भारताला अधुनिक काळात सर्व प्रकारच्या सुधारणा व सर्वांगिण विकास करता येईल, अशी राष्ट्राला राज्यघटना दिली 21 व्या शतकात देशाला विकासाच्या

दिशेने जायचे असेल तर डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशीवाय पर्याय नाही. असे मला वाटते.

## आंबेडकरांनी चालु केलेली वृत्तपत्रे -

मुकनायक - १९२०.

बहिष्कृत भारत - १९२७.

जनता - १९३०.

प्रबुद्ध भारत - १९५६.

## आंबेडकरांचा राजकीय कार्यकाळ

मुंबई विधिमंडळाचे सदस्य - इ.स. 1926 ते 1937.

मुंबई विधानसभेचे सदस्य - इ.स. 1936 ते इ.स 1942

ब्रिटीश भारताचे मजुरमंत्री ऊर्जामंत्री - इ.स. 1942 ते 1946.

संविधान सभेचे सदस्य - इ.स. 1946 ते 1950

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री व न्यायमंत्री - 1947 ते 1951

राज्यसभेचे सदस्य - 1952 ते 1956.

भारतीय घटनेचे शिल्पकार
B. R. आंबेडकर



## शैक्षणिक कार्य -

अंबेडकर हे उच्चविद्याविभूषीत होते ते शिक्षणतज्ञ होते

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, आणि जो ते प्राशन करेल तो वाघासारखा गुरगुरल्या रहाणार नाही"

असे त्यांनी लिहले आहे.

प्राचीन हिंदू समाजातील जातीच्या नियमानुसार कनिष्ठ जातींना शिक्षण घेण्याचा हक्क नव्हता तर केवळ उच्च जातींना शिक्षणाचा अधिकार होता. त्यामुळे कनिष्ठ जातींची स्थिती जवळपास गुलामासारखी झाली होती.

① शैक्षणिक जागृती —

अंबेडकरांच्या मते हजारो वर्षापासून शिक्षण नाकारलेल्या कनिष्ट जातीमध्ये अज्ञान व निरक्षरता होती. यामुळे त्याला उच्च जातीच्या लोकांसाठी हलक्या प्रतीचे काम करावे लागत असत.

आंबेडकरांनी कनिष्ट जातीला व त्याच्या या दयनीय स्थितीचे कारण शिक्षणाचा अभाव हेच आहे. याची जाणीव अंबेडकरांनी करून दिली. कनिष्ट जातीतील मुलांना शाळेत पाठवण्याची सक्ती अंबेडकरांनी केली. त्यांना प्रोत्साहन दिले. या मुलांसाठी शिष्यवृत्ती, गणवेश, भोजन व निवाऱ्याची सोय केली.

आपल्या अनुयांना त्यांनी

"शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा"

असा संदेश दिला.

## अंबेडकरांचे कार्य-

अंबेडकरांनी अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या उत्थानासाठी ९ मार्च १९२४ रोजी दामोदर हॉल मध्ये बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली.

या सभेच्या शाखा प्रत्येक जिल्ह्यात सुरु करून तळागाळापर्यंत जाण्याचा प्रयत्न या सभेच्या सदस्याकडून करण्यात आला.

१ जानेवारी १८१८ मध्ये भीमा कोरेगाव येथे ब्रिटिश आणि पेशव्यामध्ये लढाई झाली होती या लढाईत ब्रिटिशांकडून बहुतांश दलित समाजाचे महार सैनिक लढले होते. याच्याच आठवण करुण देण्यासाठी २५ डिसेंबर १९२७ रोजी दिलेल्या भाषणात आंबेडकर अस्पृश्यांना उद्देशून म्हणाले की तुम्ही शुर वीरांची संतान आहात. ही गोष्टी काल्पनिक नव्हे.

भीमा कोरेगावला जाऊन बघा तुमच्या पूर्वजांची नावे तेथील विजयस्तंभावर कोरलेली आहेत तो पुरावा आहे, की तुम्ही मेंडबकरींची संतान नसुन सिंहाचे छावे आहेत.

## चवदार तळे सत्याग्रह -

२० मार्च १९२७ रोजी आंबेडकरांनी चवदार तळ्याकडे कूच केली. बाबासाहेबांनी सर्वप्रथम आपल्या ओंजळीने तळ्यातील पाणी हातात घेतले व ते पाणी प्राशन केले अशाप्रकारे महाड येथील चवदार तळे अस्पृश्यासाठी खुले करण्यात आले.

शिवजयंती व गणेशोत्सव सहभाग-

३ मे १९२७ रोजी बदलापूर येथे शिवजयंती उत्सव आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली साजरा केला गेला. बदलापूरच्या गावकऱ्यांनी जातिभेद न ठेवता आंबेडकरांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले

बहिष्कृत भारत च्या २० मे १९२७ च्या अंकात छापलेल्या माहितीनुसार आंबेडकरांनी आपल्या भाषणात विविध देशाच्या व भारताच्या इतिहासाचे दाखले देत सांगितले की

हिंदु समाज तेव्हाच सामर्थ्यवान होऊ शकेल, जेव्हा तो आपल्या अनिष्ठ रुढी नष्ट करू शकेल आणि समानतेने व माणुसकीने वर्तन करू शकेल.

आदर्शांचे, व्यक्तिमहत्वांची, विचारांची खान.



डॉ. B. R. आंबेडकर

समारोप - आंबेडकर हे व्यक्तिमत्व य शब्दात किंवा य वाक्यात संपनारे नाही. आंबेडकरचे हे संपूर्ण जीवनच अनुकरणीय आहे.

त्यानी प्रत्येक भारतीयला भारतीय माणुस म्हणुन जगले पाहिजे असे शिकवले.

असंघटीत समाज संघटीत करण्याचे कार्यही अंबेडकरांनी केले.

अंबेडकरांनावर या लोंकानी अनन्वित अत्याचार केले पण सर्व विसरुन अंबेडकरांनी या देशाचे संविधान लिहले. प्रथम कायदामंत्री बनुन येथील जनतेला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला

अशा या महामानवाला माझा त्रिवार नमस्कार..

जयक्रांती अध्यापक महाविद्यालय, लातूर.

2020-21.

बी. एड. प्रथम वर्ष - II$^{nd}$ sem.

* प्रात्यक्षिक कार्य *

विषय :- लिंग, शाळा आणि समाज. [201]

प्रात्यक्षिक कार्याचे नाव :- "स्त्री विषयक कायद्यांचा चिकित्सक अभ्यास."

मार्गदर्शक प्राध्यापक :- हिंगणे मॅडम.

छात्राध्यापकाचे नाव :- गायकवाड यशोमती बाबुराव.

रोल नं :- 23.

## ➤ प्रस्तावना :

आधुनिक काळात स्त्री जीवनाला मोठ्या प्रमाणात महत्त्व दिले जाते. स्त्रीयांचे शिक्षण, स्त्रीयांचे अधिकार हे सर्व आजच्या काळात मिळत असलेले आपल्याला पहायला मिळते. भूतकाळाचा विचार केला तर, स्त्रीयांना फारसा सन्मान, अधिकार व शिक्षण या सर्व गोष्टींची पूर्तता मिळाली नसल्याचे आपल्याला पहायला मिळते. त्यावेळी फक्त मुलींना कौटुंबीक वातावरण म्हणजेच चूल आणि मूल आणि समाजात चालत असलेली रुढी परंपरा म्हणजे विवाह एवढ्याच गोष्टींची मर्यादा घालून दिलेली होती.

त्यामुळे भूतकाळात स्त्रीयांचा विकास हा होऊ शकला नाही. स्त्रीयांना पारंपारिक कामाव्यतिरिक्त व समाजाला मान्य असणाऱ्या गोष्टीव्यतिरिक्त कोणतेही बौद्धीक ज्ञान मिळत नसे. पण आधुनिक काळात म्हणजेच २१ वे शतक हे स्त्रीयांना मान, सन्मान, शिक्षण, अधिकार देणारे शतक मानले जाते. २१ व्या शतकात स्त्री शिक्षणाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली व रुढी परंपरेचा विचार न करता स्त्री शिक्षणाचे महत्त्व २१ व्या शतकात समजून आले. २१ व्या स्त्रीयांची मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली दिसून येत आहे. उद्योग क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात, क्रिडा क्षेत्रात स्त्रीयांची मोठ्या प्रमाणात कामगीरी दिसून येते.

## ➤ प्रात्यक्षिक कार्याचे शिक्षणासाठी महत्त्व :-

सदरील प्रात्यक्षीक कार्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःचा मान, सन्मान, अधिकार, शिक्षण व या सर्वांचे महत्त्व याची जाणीव या प्रात्यक्षिक कार्यामधून मिळेल. एकंदरीत भूतकाळात झालेल्या घटना म्हणजेच त्या काळातील स्त्री जीवन आणि आधुनिक कालीन स्त्री जीवन यामधील फरक समजण्यास मदत होईल. एकंदरीत भूतकाळात चालणाऱ्या परंपरा या कितपत योग्य होत्या व याचा परिणाम चांगला अथवा वाईट कसा झाला याची पूर्णपणे ज्ञान विद्यार्थ्यांना समजून येईल.

आधुनिक काळाचा विचार केला तर स्त्रीयांचे जीवन कसे असावे व स्त्रीयांचे शिक्षणामुळे समाजात होणारे चांगले बदल व त्या कुटुंबाचा होणारा विकास या सगळ्या गोष्टींची माहिती व गरज विद्यार्थ्यांना भासू लागेल. व्यक्ती म्हणून किंवा मानव म्हणून प्रत्येक व्यक्तीला अधिकार मिळायला पाहिजेत, ते अधिकार मिळण्यास मदत होईल व स्त्रीयांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन हा एकंदरितच चांगला असेल. देशाच्या विकासात स्त्रीयांचे शिक्षण किती महत्वाचे आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना होईल.

स्त्री शिक्षणामुळे स्त्रीच्या कुटुंबातील वातावरण बदल होताना दिसून येत आहे. स्त्रीयांना शिक्षण मिळणे हा त्यांचा हक्क आहे, ते त्यांना मिळालेच पाहिजे अशी रुजवणूक पुढील पिढीत होताना दिसून येत आहे.

## > भारतामध्ये स्त्रीचे स्थान व त्याची कारणे

- स्थान :- भारतामध्ये 18 व्या शतकाचा जर विचार केला तर स्त्रीयांचे स्थान हे समाजाला बांधिल म्हणजेच चूल आणि मूल एवढ्या-पुरतेच मर्यादित होते पण 21 व्या शतकात झालेल्या मानवाच्या विकासामध्ये काही गोष्टी बदलत गेल्या व स्त्रीयांकडे केवळ चूल आणि मूल या दृष्टीने न पाहता आज त्यांना त्यांचे अधिकार, शिक्षण हे देण्याची गरज वाटत आहे त्यामुळे आज भारत स्त्री शिक्षणाकडे व प्रगतीकडे वाटचाल करत आहे.

पण विविध राज्यांचा जर विचार केला तर स्त्री शिक्षणामध्ये वेगवेगळेपणा दिसून येतो, विकसीत राज्यांमध्ये म्हणजेच महाराष्ट्र, गुजरात, गोवा, दिल्ली या राज्यांमध्ये स्त्री शिक्षणाला महत्व दिले जाते, तर अद्याप मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश इत्यादी राज्यांमध्ये स्त्रीयांचा विकास झालेला दिसत नाही. त्यामुळे असे सांगता येईल की, भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यांमध्ये स्त्री शिक्षणात वेगळेपणा दिसून येतो.

Page No. :
Date : / /

## नेतृत्व स्थानांमध्ये स्त्रियांच्या भूमिका

महिला सक्षमीकरण हा चर्चेचा विषय ठरला आहे स्त्रिया वाढतात आणि त्यांच्या वास्तविक क्षमतेपर्यंत पोहचतात या कल्पनेने अद्याप बरेच लोक आरामात नसले तरी बहुसंख्या स्त्रिया संघर्ष करणाऱ्या संस्कृती आणि समाजातील निकषांपेक्षा उंच आहेत.

ते समाजाने ठरवलेल्या नियमित बारच्या वर जात आहेत आणि आज व्यवसाय जगाच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करीत आहेत महिला घरी दोन्ही काम करत आहेत आणि कामाच्या ठिकाणी उत्कृष्ट आहेत. कार्य-जीवन संतुलन राखण्यासाठी ते एक उत्तम उदाहरण आहेत.

## - अव्वल यशस्वी भारतीय महिला उद्योजक

### ① इंद्रा नुई

इंद्रा नुई ही एक व्यावसायिक महिला आहे. जी पेप्सिकोच्या वाढीस आणि विस्तारासाठी मोलाची कामगिरी बजावते, नुई यांनी पेप्सिकोचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष म्हणून काम पाहिले. आज ती ॲमेझॉन (Amazon) आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (ICC) च्या बोर्डवर सेवा बजावते.

### ② किरण मजूमदार-शॉ

किरण मजूमदार-शॉ ही एक भारतीय अब्जाधीश उद्योजक महिला आहे. त्या बंगळूरूमध्ये असलेल्या बायोकॉन लिमिटेडच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत. बंगळूरूच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या त्या माजी अध्यक्ष आहेत. जैव तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना 1989 मध्ये भारत सरकार कडून पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 2002 मध्ये त्यांना वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने टेक्नॉलॉजी पायनियर म्हणून मान्यता दिली. त्याच वर्षी त्यांना अर्न्स्ट आणि यंग एंटरप्रेन्योर ऑफ द इयर अवॉर्डही मिळाला.

Page No. :
Date : / /

(3) वंदना लुथ्रा

वंदना लुथ्रा ही एक प्रसिद्ध भारतीय उद्योजक आहे. ती व्हिएलसीसी हेल्थ केअर लिमिटेड ची संस्थापक आहे. ती ब्युटी अँड वेलनेस सेक्टर स्किल अँड कौन्सिल च्या अध्यक्ष आहेत.

- भारताच्या विविध भागातील स्त्रियांच्या संघटना

(1) आसाम :-

लेनिनच्या विचारांवरती आधारीत असलेली 'नारीमुक्ती संस्था' 1979 मध्ये आसाममध्ये स्थापन झाली. या संस्थेने स्त्रियांची पिळवणूक थांबविणे, स्त्री-पुरुष समान हक्क यासाठी संघर्ष केला. प्रसंगी जनआंदोलनाचा कार्यक्रम स्विकारला.

(2) बिहार :-

1979 मध्ये बिहारमध्ये 'छात्र युवा संघर्ष वाहिनी' या संघटनेने महत्वपूर्ण कार्य केले. हुंडा विरोधी भूमिका तसेच दलित स्त्रियांच्या जमिनीविषयक हक्कांचा पुरस्कार या संघटनेने केला. वर्ग व जात विरोधी कार्य करणारी ही एक महत्वाची संघटना होती.

(3) गुजरात :-

सन 1970 नंतर स्त्रीयांना रोजगार देण्यासाठी गुजरात-मध्ये अनेक संघ स्थापन झाले त्यामध्ये महत्वपूर्ण काम करणारी स्त्रियांची संस्था अहमदाबाद येथे स्थापन झाली. ती म्हणजे 'सेल्फ एम्प्लॉईड वुमेन्स असोसिएशन' स्त्रियांना बाळंतपणाचे फायदे, विधवांना विविध सोयी-सवलती, हस्तोद्योगांची निर्मिती याशिवाय भव्य मोर्चे काढून स्त्री प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम या संघटनेने केले.

(4) महाराष्ट्र :-

देशाच्या विविध भागात स्त्री संघटनांनी जोर धरला

असताना महाराष्ट्रामध्ये स्त्रियांच्या विविध संघटना स्थापन झाल्या. आपला न्याय, हक्कांसाठी शासनांशी संघर्ष करून सवलती मिळवून घेण्यामध्ये महाराष्ट्रातील स्त्री संघटना यशस्वी झाल्या. या संघटनांनी फक्त महाराष्ट्राबाहेरील झालेल्या चळवळी-मध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले असे नाही. तर 19 व्या शतकापासून महाराष्ट्रात समाज सुधारणा चळवळी सुरू झाल्या होत्या. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे या समाज सुधारकांनी स्त्रियांचा प्रश्न ऐरणीवरती मांडला. यातूनच स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रामध्ये अनेक महिला मंडळे व संघटना स्थापन झाल्या. पुणे, नाशिक, लातूर, औरंगा-बाद, धुळे या ठिकाणी स्त्री संघटना कार्यरत होत्या.

> स्त्रीयांचा इतिहास

पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या इतिहासात स्त्रिया दीर्घकाळ शोषित व उपेक्षित राहिल्या. पाश्चात्य देशात आठराव्या शतकात स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला. तथापि, विकसित व विकसनशील देशात स्त्री चळवळ व स्त्री अभ्यास वेगवेगळ्या टप्प्यावर आहे.

स्त्रीवादही पाश्चिमात्य देशाकडून आपल्याकडे आलेल्या संकल्पना आहे. असे असले तरी स्त्रीवाद म्हणजे समान हक्क, समान दर्जा व समान संधी होय. सर्व जगभरातील समाज व्यवस्थांनी, संस्कृतींनी स्त्रियांना दुय्यम स्थान दिले होते. जवळपास पितृसत्ताक कुटुंब व समाजव्यवस्था अस्तित्वात होती. तिला स्वतःचे असे स्वतंत्र व्यक्तिमत्व नव्हते. तिला पिता, पुत्र, पती यांच्या अधिपत्याखाली रहावे लागत होते.

भारतीय महिलांसाठी मध्ययुगीन भारत हे युग हलक युग मानले जात असे. मध्ययुगीन भारताने अनेक परदेशी विजय पाहिले आहेत, त्यामुळे महिलांचा दर्जा कमी झाला आहे. जेव्हा परदेशी मोगल आणि ब्रिटीससारख्या विजेत्यांनी भारतावर

स्वारी केली. संस्कृतीच्या काही बाबतीत महिलांच्या स्थितीवर विपरीत परिणाम झाला. काही प्रकरणा मध्ये महिलांना मुक्त करण्यात आले. भारतामध्ये मागील अनेक वर्षांपासून महिलांना पुरुषांची मालमत्ता मानले जाऊ लागले. स्त्रीला स्वतःचे स्वातंत्र्य दिले गेले नाही. वडिल, भाऊ, पती यांच्या अधिपत्याखालीच राहणे महिलेनेही पसंत केले. महिलांना शिक्षण देण्यास सुरुवात झाली तेव्हा त्यांच्या वरील निर्बंधासारख्या काही नवीन गोष्टींना स्थान देण्यात आले.

- ① सती :- पतीच्या अंत्यसंस्कारा बरोबर पत्नीवरही मरणाची विधी करण्याची पद्धती सती म्हणून ओळखली जाते. सरणावर उडी घेण्यास हिंदू धर्मग्रंथानुसार काही स्त्रिया पतीच्या अंत्यसंस्कारावेळी भाग पाडले जात असे. त्याकाळी स्त्रियांसाठी सती जाणे बंधनकारक होते, जर महिलेने अशा प्रथेचे पालन केले तर तिचा समाजात आदर करत असे. स्त्रीने पतिव्रता धर्माचे पालन करावे.

- ② बालविवाह :- लहान वयातच मुलीचे लग्न करणे ही मध्ययुगीन भारतात एक रुढी मानली जात होती. त्यांना 8वी ते 10वी पर्यंत शिक्षण घेण्याची परवानगी नव्हती. त्या ऐवजी घराच्या कामात प्रशिक्षण देण्यात येत होते. बालविवाहामुळे जन्म वाढीचा दर वेगाने वाढत होतो. वारंवार बाळंतपणामुळे महिलांचे आणि मुलांचे मृत्यु दर वाढताना दिसून येत होते. मृत्युदर वाढल्यामुळे बालविवाह करण्यात येत असत.

- ③ विधवा पुनर्विवाह निर्बंध :- मध्ययुगीन भारतातील विधवांची स्थिती खूप गरीब होती, विधवांना बरोबरीची वागणूक दिली जात नव्हती. महिला ब-याच निर्बंधाच्या अधीन राहत होत्या. पतीच्या निधनानंतर त्यांना धार्मिक जीवन जगू द्यावे लागत होते. कोणत्याही ~~उत्स~~ उत्सवात त्यांना परवानगी नव्हती. कोणत्याही चांगल्या कामात त्यांची उपस्थिती एक वाईट शकुन समजली जायची. अनेक विधवांना

शोकाचे प्रतिक म्हणून त्यांना डोक्यावरील केस काढावे लागत असे, कालांतराने विधवांनाही पुन्हा विवाह करण्यास परवानगी देण्यात आली.

(4) जौहर :- जौहर ही प्रथा सतीप्रमाणेच कमी अधिक प्रमाणात होती. त्याला सामुहिक आत्महत्या म्हणत असत.

(5) पडदा प्रणाली :- मध्ययुगीन काळात बुरखा म्हणजेच पडदा प्रणाली मोठ्या प्रमाणात प्रचलित होती. भारतीय समाज हे परदेशी राज्यकर्त्यांच्या नजरेपासून स्त्रियांच्या रक्षणासाठी पडदा प्रणाली वापरली जात होती. मध्ययुगीन काळात भारतावर आक्रमण झाल्यामुळे या व्यवस्थेला महिलांच्या स्वातंत्र्यावर आळा घातला गेला.

(6) स्त्री शिक्षण :- मध्ययुगीन भारत आणि विशेषतः हिंदू समाजातील मुलींना घरातील कामासंबंधीचे शिक्षण दिले जात होते. मात्र औपचारिक शिक्षण दिले जाते जात नव्हते.

> स्त्री शिक्षणाचा इतिहास

स्त्री व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्वाचे साधन म्हणजे स्त्री शिक्षण होय. स्त्री शिक्षण हा कोणत्याही समाजजीवनाच्या समृद्धीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे. कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, त्यावरून ठरते.

> ऐतिहासीक पार्श्वभूमी : वेदकाळ

भारतात वेदकाळी स्त्रीयांना मान होता. त्यांना मुलांच्या बरोबरीने आवश्यक असे शिक्षण मिळत असे व उपनयनाचा अधिकार होता. उपनयनानंतर त्यांच्या अध्ययनास सुरुवात होई, ब्रम्हवादिनी व सद्योद्वाहा असे विद्यार्थीनींचे दोन प्रकार होते.

VEDHA®
Page No. :
Date : / /

ब्रह्मवादिनी मुली जागन्म ब्रह्मचर्य पाळून वेदविद्येचा व ब्रह्मविद्येचा अभ्यास करीत, पठणाशिवाय स्वतंत्र लेखनही त्या करीत. लोपामुद्रा, विश्ववारा व घोषा या विदुषींनी रचलेल्या रचना ऋग्वेदात आढळतात. ब्रह्मयज्ञाच्या वेळी केल्या जाणाऱ्या तर्पणात सुलभा, मैत्रेयी, गार्गी व वाचक्नवी या विदुषी स्त्रियांचीही नावे आढळतात.

सद्योवाहा विद्यार्थिनी सोळाव्या वर्षापर्यंत शिक्षण घेऊन मग अनुरूप पतीशी विवाहीत होत. गृहस्थाला पत्नीवाचून यज्ञाचा अधिकार नसे. यज्ञाचम यज्ञात पत्नीचा फार मोठा वाटा असे. वैदिक काळात सुरु झालेली स्त्री शिक्षणाची उच्च परंपरा त्यानंतरच्या रामायण महाभारत काळात टिकून होती. तसेच बौद्ध-जैन धर्माच्या प्रारंभीच्या काळात सुद्धा स्त्रियांना शिक्षणाच्या क्षेत्रात मानाचे स्थान होते.

> स्मृतिकाळ :- (इ.स. 400-1000) ~~स्मृ~~ स्मृति निरनिराळ्या काळांत रचल्या गेल्या आहेत. त्यापैकी काही (गौतम, आपस्तंब, मनु) पहिल्या -दुसऱ्या शतकात रचल्या गेल्या. त्यातील त्यांचा स्त्रीविशयक दृष्टिकोन पुरुषांच्या भोगेच्छापूर्तीचे एक साधन एवढाच मर्यादित होता. मुलींच्या दृष्टीने ते अंधारयुग होते. या काळात स्त्रीयांवर अनेक निर्बंध लादले गेले. मुलींचे उपनयन नाममात्र होई. वेदकाळी यज्ञ करणारी, वेदसुक्त रचणारी व ब्रह्मवादिनी म्हणून गौरविली गेलेली स्त्री स्मृतिकाळात अविद्या ठरली.

> आधुनिक काळ :-

माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (कार 1819-27) यांच्या प्रयत्नामुळे मुंबई व पुण्यात संस्कृत पाठशाळेची स्थापना झाली (1821) आणि स्त्री शिक्षणाचाही प्रारंभ यांच्याच राजवटीत झाला. येथे 1824 मध्ये अमेरिकन मिशन-यांनी मुंबईतील भायखळा येथे एतद्देशीय मुलींकरता एक स्वतंत्र शाळा स्थापन केली होती. मुंबई

इलाख्यातील या मुलींच्या पहिल्या शाळेत सुमारे ३०० मुली शिक्षण घेऊ लागल्या. त्यास धर्ममार्तंडांचा मोठा विरोध होता. १८४९ पर्यंत सरकारी धोरण मुलींच्या शिक्षणाबाबत तटस्थपणाचे होते मात्र लॉर्ड डलहौसी याने स्त्री शिक्षणाबाबत स्वतः लक्ष घातले आणि बंगालच्या शिक्षण मंडळासही या कामी लक्ष घालण्याची विनंती केली.

दादाभाई नौरोजी तर त्या वेळी स्त्री शिक्षणासाठी एक प्रमुख आधारस्तंभ होते. नौरोजी यांनी २२ ऑक्टोबर १८४९ रोजी 'स्टुडंट्स लिटररी ॲंड सायंटिफिक सोसायटी' या संस्थेच्या वतीने मुलींसाठी तीन मराठी व चार गुजराती शाळा सुरु केल्या. त्या वेळी सुमारे ४४ मुली तेथे शिकत होत्या आणि शिक्षकही विनामुल्य काम करत होते.

> मध्ययुग :-

मुसलमानी अंमलात (अकरावे ते सतरावे शतक) स्त्री शिक्षणाची पिछेहाट झाली. भारतीय समाजाचे अर्धे अंग विकल करुन गेली. याकाळात स्त्रियांच्या शिक्षणाबाबतीत विशेष प्रयत्न झाले नाहीत. मात्र बाबर बादशाहची कन्या गुलबदन बेगम हिने हुमायुननामा हा ग्रंथ लिहीला. तो एक ऐतिहासिक दस्तऐवज ठरला. शहाजानची मुलगी जहांआरा, हिने तत्कालीन मुस्लिम साधुंची माहिती मुनसीम-अल-अर्वाह या शिर्षकाने संग्रहित केली तर औरंगजेबाची मुलगी झीबुन्निसा हिने 'मुखफी' या नावाने उर्दु कविता केल्या. या शाही घराण्यातील काही उच्चभ्रू स्त्रिया सोडल्या तर एकूण या काळात स्त्रिया शिक्षणापासून वंचितच राहिल्या. या काळी मात्र राजपूत महिलांत काही विधवा राण्यांनी उत्तम प्रकारे प्रशासन करुन मुस्लिम शत्रूबरोबर लढाया केल्याची उदाहरणे मिळतात. त्यापैकी कुमारदेवी (मेवाड), कर्णवती (चितोड) व जवाहिराबाई या कुशल प्रशासक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी लष्करी प्रशिक्षण घेतले होते.

* स्त्री शिक्षणाबाबत महात्मा फुलेंची भूमिका

या महात्मा फुले सुधारकांच्या कार्याच्या पार्श्वभूमीवर यांचे क्रांतिकार्य स्त्रियांच्या आत्मसन्मान जागृत करणारे आणि तत्कालीन स्त्री साहित्याला प्रेरणा देणारे आहे इ.स 1848 मध्ये त्यांनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली पत्नी सावित्रीबाई यांना स्वतः शिकवून शिक्षिका बनवले. स्त्री शिक्षण म्हणजे अनीति-कता व सामाजिक अनाचाराला निमंत्रण आहे, असा दांभिक प्रचार सनातनी धर्मी वर्गाने केला. त्यांनी सावित्रीबाईंना दगड व शेण फेकून मारले, ज्योतीरावांच्या वडलांवर दडपण आणून त्यांनी ज्योतीरावांना व सावित्रीबाईंना घराबाहेर काढण्यास भाग पाडले पण ज्योतीरावांनी सर्व विरोधांवर मात करत मुलींसाठी आणखी शाळा काढल्या.

शिक्षण मिळाल्याने कशी जागृती होते याचे प्रत्यंतर ज्योतीरावांच्या शाळेत शिकणाऱ्या मुक्ता नावाच्या मातंग समाजाच्या मुलीने वयाच्या 11 व्या वर्षी लिहीलेल्या (इ.स 1855) एका निबंधा-तून मिळते. हा निबंध अहमदनगर येथून प्रकाशित होणाऱ्या ज्ञानो-दय पत्राने छापला होता. त्यात ती म्हणते, 'ब्राम्हण लोक म्हणतात की इतर जातींनी वेद वाचू नयेत याचा अर्थ आम्हास धर्मपुस्तक नाही. इंग्रजी राज्यापूर्वी उच्चवर्गातील लोकांचा अपराध करणाऱ्या महार-मांगाचे डोके मारीत असत. मुलटेकडीच्या बाजारात फिरण्याची मोकळीक नव्हती, ती आता मिळाली. या देशीतील स्त्री मुक्तीचा हा पहिला उद्गार होता

महात्मा फुले यांनी इ.स 1863 साली बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून मोठमोठाली पोस्टरे गावभर सर्वत्र लावली. अडचणीत सापडलेल्या विधवांनी तेथे यावे, आपल्या मुलांना जन्म द्यावा त्यांची नावे जाहीर होणार नाहीत जाताना त्यांनी मूल घेवून जावे किंवा ठेवून जावे, अनाथाश्रमात त्यांच्या मुलांचे संगोपन केले जाईल अशी सोय ज्योतीरावांनी केली.

महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत

Page No. :
Date : / /

विद्येविना मती गेली ।
मती विना नीती गेली ।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शुद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ॥

इतके अनर्थ एका अविद्येने केले ॥ जातीभेद पाहून बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स १८४८ साली पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली, तसेच अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत इ.स 1852 मध्ये शाळा स्थापन केली, त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे. ज्योतीरावांनी पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई. त्याचप्रमाणे स्वतंत्र पुणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.

महात्मा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार - स्वातंत्र्य, समानता आणि बंधुभाव या त्रयींवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठवणारे महात्मा फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचारांचे होते. त्यांनी मेकॉलेच्या खलित्यास कडाडून विरोध 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजांचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकवा यावर होता. 'आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षण प्रणाली असण्यावर महात्मा फुलेंचा आग्रह होता. प्रथम

उपेक्षितांना शिक्षण' हे सूत्र अंमलात आणाते, यावर भर देण्यात आला.

महात्मा फुलेंचे शिक्षण विषयक विचार

① स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा
② प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत
③ प्रशिक्षित शिक्षकांची तरतूद करणे
④ प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे
⑤ ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिक्षण
⑥ शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल विचार
⑦ व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण
⑧ त्रिभाषा सूत्राचा अवलंब
⑨ शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा
⑩ शिक्षण विषयक ज्ञान व विचार

> 21व्या शतकातील स्त्री शिक्षण :-

आज २१व्या शतकात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. इ.स पूर्वीच्या काळात स्त्रियांची प्रगती ही अत्यंत हलाखीची होती. राजा राममोहन रॉय व ज्योतीबा फुले यांनी स्त्रियांच्या अडचणी समजून त्यांना त्यातून बाहेर पाडण्यासाठी मार्ग दाखवला. आज २१व्या शतकात सुद्धा स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीने शिकून मोठमोठ्या अधिकारी पदावर काम करताना दिसत आहेत. स्त्रियांच्या बाबतीत आज २१व्या शतकात फक्त चूल आणि मूल अशी परिस्थीती राहिलेली नाहीये, स्त्रियांनी अनेक छोटे-मोठे उदयोग घरच्या-घरी करून त्यातून सुद्धा मानाचे स्थान मिळवले आहे. आजच्या २१व्या शतकात मुली किंवा स्त्रिया या स्वतंत्र विचारांच्या जरी असल्या तरी त्यांनी त्यांची मर्यादा ओळखून वागायला हवे, त्यामुळे विनयभंग, बलात्कार अशा समस्या उद्भवणार नाहील असे वाटते.

स्त्रिया या सर्व कुटुंबाची जबाबदारी स्विकारून नोकरी करतात, त्यावेळी घरच्यांनीसुद्धा पाठिंबा दिल्यामुळे

त्या कोणत्याही परिस्थितीमध्ये स्वतःला खंबीरपणे सिद्ध करू शकतात. शिक्षणामुळे त्यांची प्रगती खूप मोठ्या प्रमाणात झालेली आपल्याला पहायला मिळते या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. 21 व्या शतकात देखील समाजात स्त्रीचे स्थान क्वचितच तेवढे मोठे आहे. अलीकडच्या काळातील उदाहरणे घ्यायची झाल्यास माजी दिवंगत प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी, माजी राष्ट्रपती प्रतिभा ताई पाटील सारख्या महिलांनी देशाचे नेतृत्व करून देश चालवला. विज्ञान जगतात प्रगती करीत कल्पना चावला या महिलेने अंतराळात उंच भरारी घेतली. किरण बेदी, सरोजिनी नायडू, मेधा पाटकर, मृणाल गोरे, पी. टी. उषा, सानिया मिर्झा सारख्या अनेक महिलांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपली कामगीरी दाखवून जागतीक व राष्ट्रीय पातळीवर देशाचे नाव कमविले. देशाची प्रतिमा उंचावली.

21 व्या शतकात झालेल्या विकासामुळे स्त्री शिक्षणाचे महत्व अधिक वाढतच आहे व शासन देखील स्त्री शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवत आहे.

> स्त्री शिक्षणासंबंधी कायद्याचे विवेचन -

- ① स्त्री लैंगीकते संबंधी कायदे

मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या घटताना दिसत आहे. याच्या प्रतिबंध घालण्यासाठी ~~मध~~ गर्भलिंग चिकीत्सा प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु आहे. या कायद्यान्वये गर्भातील लिंग तपासणी करणाऱ्या व्यक्तीला आणि अशी तपासणी करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकाला दंड आणि सजेची तरतूद करण्यात आली आहे.

लैंगीक गुन्ह्यासंबंधात भारतीय दंड संहिता कलम 375 व 373 अनुसार कडक शिक्षा देण्यात येतात. या प्रकरणाची

सुनावणी कार्याच्या बंद खोलीत होते.

- ② स्त्री शिक्षणासंबंधी कायदे

महिल्या महिलांच्या शिक्षणाची पातळी अजूनही पुरुषापेक्षा कमी आहे. आधुनीक युगात ग्रामीण भागात महिला निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. तेथे 63 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक अशिक्षित आहेत.

- ③ स्त्री अत्याचार संबंधी कायदे

केंद्र सरकारने कौटुंबीक हिंसाचारामध्ये महिलांचे संरक्षण करण्यासाठी 2005 मध्ये एक कायदा संमत केला.

(i) शारिरीक छळ :- स्त्रीला मारहाण करणे. तिला थोबाडीत मारणे, जाळणे इत्यादी प्रकारांच्या शारिरीक दुखापत सामावेश.

(ii) तोंडी किंवा भावनिक अत्याचार :- वाईट बोलणे, वाईट नावाने हाक मारणे, चारित्र्याबद्दल संशय घेणे, हुंडा आला नाही किंवा मुलगा झाला नाही म्हणून त्रास देणे, स्त्रियांना तिच्या मनाविरुद्ध गोष्टी करावयास लावणे, जबरदस्ती करणे, आत्महत्येची धमकी देणे इ.

(iii) आर्थिक अत्याचार – हुंड्याची मागणी करणे, स्त्री व तिच्या मुलाबाळांना पालण पोषणासाठी पैसे न देणे, नोकरी करण्यास मनाई करणे, घरातून हाकलून देणे, स्वतःचे घर वापरण्यास मनाई करणे. इ.

- ④ स्त्री-बाल विवाहासंबंधी कायदे :-

बालविवाहाची प्रथा बंद करण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायदा 1987 मध्ये सुधारणा झाल्या आहेत. लग्नाच्या वेळी मुलीचे वय किमान 18 आणि मुलाचे वय 21 वर्षाहून कमी असल्यास शिक्षेची तरतूद आहे. हा कायदा सर्व जाती धर्माच्या लोकांना

एकसारखाच लागू आहे.

- ⑤ स्त्री विवाहसंबंधी कायदे :-

भारतातील लोक स्वतः च्या कुटुंबातील विवाह निश्चित करतात. खेड्यामधील परिस्थिती खूप वाईट आहे. विवाहासाठी मुली-बरोबर सल्ला मसलत केली जात नाही. मुलीला आपल्या पतीच्या लहरी व कल्पनेचे पालन करण्यास शिकविले जाते.

① विवाह नोंदणी - हे दुष्परिणाम सोडविण्यासाठी विवाहाची अनिवार्य नोंदणी देखील सूचविली आहे. नोंदणीच्या वेळी वधू आणि दोघांचेही पालक वराला शपथ घेण्यास सांगितले पाहिजे.

② पुनर्विवाहाशी संबंधीत कायदा - जोडीदाराच्या मृत्यूनंतर किंवा विवाहित जोडीदारास योग्य कायदेशीर कारणावरून घटस्फोट घेऊन पुन्हा लग्न करण्यास परवानगी देतो. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा 1856 तसेच (XZ) 1856 कायदा 29 जुलै 1856 च्या अधिनियमात ईस्ट इंडिया कंपनीच्या नियमांतर्गत हिंदू विधवा च्या पुनर्विवाहांना कायदेशीर मान्यता देण्यात आली.

अशा तरतुदीच्या व्यतिरिक्त, हिंदू अनुक्रम अधिनियम 1956 आणि हिंदू विवाह कायदा 1956 मध्ये विधवा पुनर्विवाहाशी संबंधीत तरतुदी देखील केलेल्या आहेत.

- ⑥ स्त्री वारसा संबंधी कायदे :-

वारसा आणि वारशा संदर्भातील कायदा सहजपणे भारतीय ~~म~~ अनुच्छेद कायदा 1925 मध्ये संदर्भित करण्यात आला आहे. भारतामध्ये कौटुंबिक मालमत्ता अचल आणि जंगम अशा दोन्ही संपत्तीवर महिलेचा मालकी हक्क आहे. हिंदू कायद्यानुसार 1932 च्या अगोदर ~~एखाद्या~~ एखाद्या महिलेल्या तिच्या आईवडिलांकडून लग्नाच्या वेळी मिळालेल्या पैशाशिवाय इतर कोणत्याही मालमत्तेचा हक्क नव्हता.

नंतर हिंदू उत्तराधिकार कायदा 1956 हा हिंदू महिलांना आपल्या पतीच्या संपत्तीचा पूर्ण आणि समान वाटा मिळवून देण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण बाब करण्यात आली. 2005 मध्ये कायद्यात दुरुस्ती करून प्रगतीशील पाऊल उचलले आहे.

- ⑦ महिला राजनैतिक संबंधता संबंधीत कायदा :-

एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी महिलांकरिता राखीव असलेल्या प्रत्येक पंचायतीत थेट निवडणुकाद्वारे जागा भरावयाच्या आहेत. अशा जागा पंचायतीतील वेगवेगळ्या मतदारांच्या संघामधून फिरविण्यात येतील. (कलम 243 (डी-3)).

महिलांसाठी राखीव असलेल्या प्रत्येक स्तरांवर पंचायतीच्या अध्यक्षाच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांश कमी नाही. महिलांसाठी राखीव असलेल्या प्रत्येक नगरपालिकेत थेट निवडणुकीचे जागा भरायच्या आहेत आणि अशा जागा नगरपालिकेत वेगवेगळ्या मतदारसंघाना फिरविणे आवश्यक आहे.

- ⑧ महिला रोजगार संबंधी कायदे :-

जे महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिकतेपासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करतो. हा कायदा लोकसभेत 3 सप्टेंबर 2012 रोजी संमत करण्यात आला आहे. 23 एप्रिल 2013 रोजी राष्ट्रपतीची संमती मिळाली आणि हा कायदा 1 डिसेंबर 2013 रोजी भारतभर लागू झाला.

(i) सन्मान आणि समतेचा हक्क
(ii) समान वेतनाचा हक्क
(iii) प्रसूती संबंधीत कायदे विषयक हक्क

- ⑨ महिला कौटुंबिक हिंसाचारा संबंधी कायदे

घरगुती हिंसाचार कायदा 2005 चे संरक्षण महिला दंड संहिता भारतीय दंड संहितेच्या कलम 498 (अ) च्या तरतूदी

पेक्षा वेगळा आहे कारण त्यात घरगुती हिंसाचाराची व्यापक व्याख्या देण्यात आली आहे.

- (10) महिलांवर कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अत्याचारासंबंधी कायदे :-

लैंगिक छळाचे कार्यस्थळ अधिनियम २०१३ हा भारतातील एक वैधानिक कायदा आहे. जो महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळ लैंगिकतेपासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करतो, हा कायदा ३ सप्टेंबर रोजी संमत करण्यात आला आहे. राज्यसभेमध्ये २६ फेब्रुवारी २०१३ रोजी संमत करण्यात आला आहे. या विधेयकाला २३ एप्रिल २०१३ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली आहे. आणि हा ९ डिसेंबर २०१३ रोजी भारतभर लागू झाला.

> महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची कारणे -

- (1) सामाजिक कारणे :-

समाजातील वातावरण वैचारिकदृष्ट्या अधिक दूषित होत आहे. मुलींना कपडे कसे घालावे हे सांगण्यापेक्षा पुरुषांनी आपले विचार बदलावे असे नेहमी सांगितले जाते.

(1) शिक्षणात असमानता — महिलांच्या शिक्षणाची पातळी अजूनही पुरुषापेक्षा कमी आहे. आधुनिक युगात ग्रामीण भागात महिला निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. जेथे 63% किंवा त्यापेक्षा अधिक स्त्रिया अधिक अशिक्षित आहेत. अल्पवयीन मुलींपासून ते वृद्ध महिलांपर्यंत समाजातील या सर्व घरातील स्त्री ही तिच्यावरील अत्याचाराने पिळली जात आहे.

- (2) कौटुंबिक कारणे :-

(1) पुरुषप्रधान संस्कृती :- पितृसत्ताक व्यवस्था किंवा पुरुष श्रेष्ठ हे कौटुंबिक हिंसाचारास व स्त्रियांच्या सर्वच समस्येस कारणीभूत झालेले आहेत. स्त्रीयांवर व लहान मुलांवर अन्याय व

अत्याचार करतो, या व्यवस्थेने पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ मानली जाते.

② आर्थिक स्वावलंबन :- बहुसंख्य कुटुंबामध्ये पुरुष एकच कमवता असतो. स्त्री व मुले गरजा पूर्ण करण्यासाठी त्या पुरुषा-वर अवलंबून असतात.

③ पुरुषाची व्यसनाधिनता :- आपल्या व्यसनाच्या पूर्तीसाठी ते पत्नी व मुले यांच्याकडे ते पैसे मागवतात त्यांचे कामाचे पैसे आपण घेऊन गरजा पूर्ण करतात.

④ हुंडा प्रथा :- हुंड्याची मागणी जेव्हा वधु पित्याकडून पूर्ण केली जात नाही, तेव्हा तिचा पती व इतर नातेवाईक तिचा छळ करतात.

⑤ मानसिक कारणे :- स्त्रीला ~~मुल~~ मूल होत नसेल तर पती व कुटुंबातील व्यक्ती मानसिक दृष्ट्या त्रास देण्याचे प्रमाण अधिक असते.

-③ विवाह विषयक कारणे :-

① हुंडा :- आधुनिक भारतात आणखी एक गंभीर समस्या म्हणजे हुंडा होय. जर एखादी मुलगी लग्नात मोठ्या प्रमाणात हुंडा आणते तर तिला मान देण्यात येतो. आणि तिला कुटुंबात चांगली वागणूक दिली जाते. नवीन घर असेल तर तिला त्रास सहन करावा लागतो.

② घरगुती हिंसा :- कुटुंबातील एक किंवा घरातील एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तिस शारीरिक दुखापत किंवा इजा करणे.

③ शारीरिक छळ

④ जाती व्यवस्थेचे कारण :- जातीव्यवस्थेमध्ये व्यक्तीने विवाहाचा जोडीदार हा स्वतःचा जातीतून व उपजातीतून ~~निवडा~~ निवडण्याचा निर्बंध केला.

-④ शैक्षणिक कारणे :-

① स्त्रीला समाजात दुय्यम स्थान असल्यामुळे घरातील मुलांपेक्षा

मुलींच्या शिक्षणाला दुय्यम स्थान दिले जाते.
(२) बऱ्याच वेळा मुलींची लग्ने, शिक्षण पूर्ण करण्याचा आत केली जातात, त्यामुळे मुलींना शाळा सोडाव्या लागतात
(३) मुलींच्या साठी वेगळ्या वसतिगृहाची सोय नसणे
(४) शाळात स्त्री शिक्षिका नसल्यामुळे बरेच पालक मुलींना शाळेत घालत नाहीत.

- (ब) इतर कारणे :-
(१) समाजाची सनातनी प्रवृत्ती :- कन्या परक्याचे धन आहे अशी बाहसंख्या आईवडिलांची धारणा आहे.
(२) दारिद्र्य :- भारतातील जनतेचा बराचसा भाग हिंसा दारिद्र्या-खाली जगत आहे.
(३) गळती :- स्त्री शिक्षणात गळतीचे प्रमाण जास्त आहे.
(४) स्त्री शिक्षणाचा अभाव :- ग्रामीण भागातील शाळांत स्त्री शिक्षकांचा अभाव असतो.

> २१ व्या शतकातील महिलांचे स्थान व यश

पूर्वी पार पाहता पूर्वी पासूनच भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला मानाचे स्थान आहे. परंतु तत्कालीन समाज रचनेप्रमाणे काही मानमर्यादेपर्यंत सिमीत होते. आज २१ व्या शतकात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. इ.स पूर्वीच्या काळात स्त्रियांची परिस्थिती ही अत्यंत हलाखीची होती, राजा राममोहन रॉय व ज्योतीबा फुलेंनी स्त्रियांच्या अडचणी समजून त्यांना त्यातून बाहेर पडण्यासाठी मार्ग दाखवला

महात्मा फुले यांनी स्वतच्या बायकोला सावित्रीबाई फुले यांना शिकवून पुण्यात मुलींसाठी पहिली मुलींची शाळा काढली. यामुळे शिक्षणाचे महत्त्व मुलींना कळले व त्यामुळे आज २१ व्या शतकातसुद्धा स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीने शिकून मोठमोठ्या अधिकारी पदांवर काम करताना दिसत आहेत.

VEDHA
Page No. :
Date : / /

राजा राममोहन रॉय यांनी विधवा पुर्नविवाह याला पांदि पाठिंबा दिल्यामुळे आजच्या काळात सुद्धा स्त्रियांचे पुर्न-विवाह होत आहेत. इ.स पूर्व मध्ये हुंडाबळी ही समस्या सुद्धा होतीच पण आजसुद्धा २१ व्या शतकात स्त्रियांची हुंडाबळी या समस्येला सामोरे जावे लागते.

स्त्रियांच्या बाबतीत आज २१ व्या शतकात फक्त चूल आणि मूल अशी परिस्थिती राहिलेली नाहीये. स्त्रियांनी अनेक छोटे-मोठे उद्योग घरच्या घरी करुन त्यातूनसुद्धा मानाचे स्थान मिळविले आहे. स्त्रिया या सर्व कुटुंबाची जबाबदारी स्विकारुन नोकरी करतात. त्यावेळी घरच्यांनीसुद्धा पाठिंबा दिल्या-मुळे त्या कोणत्याही परिस्थितीमध्ये स्वताला खंबीरपणे सिद्ध करु शकतात. आज २१ व्या शतकात देखील समाजात स्त्रीचे स्थान तेवढेच मोठे आहे व मोठेच राहील

अलीकडच्या काळातील उदाहरणे द्यायची झाल्यास दिवंगत माजी प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी, राष्ट्रपती पदापर्यंत पोहचलेल्या प्रतिभा ताई पाटील सारख्या महिलांनी देशाचे नेतृत्व करुन देश चालविला. विज्ञान जगतात प्रगती करीत कल्पना चावला या महिलेने अंतराळात उंच भरारी घेतली. किरण बेदी, सरोजिनी नायडू, मेधा पाटकर, पी.टी. उषा, सानिया मिर्झा, इ. सारख्या अनेक महिलांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपली कामगीरी दाखवून जागतीक व राष्ट्रीय पातळीवर देशाचे नाव कमविले आहे. व देशाची प्रतिमा उंचावली.

हल्ली देखील अनेक स्त्रिया उच्च शिक्षण प्राप्त करुन डॉक्टर, वकिली चा व्यवसाय करीत आहेत. तसेच इंजिनिअरिंग व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. एवढेच नव्हे तर पदवी प्राप्त केलेल्या साधारण महिला पण विविध बँका, सहकारी संस्था, व इतर शासकीय, खाजगी कार्यालयामध्ये सेवा करुन कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत.

शिक्षिकेचा पेशा धारण करुन शासकीय व खाजगी शाळा, महाविद्यालयामध्ये ज्ञानार्जनाचे महान कार्य करित आहेत.

आजकाल अशिक्षित महिला पण काही मागे नाहीत त्या शेती, बांधकाम, लघु उद्योग क्षेत्रासारख्या ठिकठिकाणी पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून अंग मेहनतीची व कष्टाची कामे करीत आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे सर्व करताना ते कुटुंबाची पण तेवढीच काळजी घेत आहेत. अशा सर्व कर्तबगार कर्तुत्ववान स्त्रियांचे कौतुक करावे तेवढेच थोडेच आहे.

> महिलांवरील अन्याय अत्याचार कमी करण्यासाठी उपाय योजना

- ① राजाराम मोहन रॉय आणि ब्राम्हो समाज :-

धर्मशास्त्राचा चिकित्सकपणे अभ्यास करून आधुनिक विचारसरणी निर्माण करणे व त्या पद्धतीने वर्तन- व्यव-हार झाले पाहिजेत अशी म्हणणारी पहिली प्रबुद्ध व्यक्ती म्हणजे राजाराम मोहन रॉय, त्यांनी स्त्री विषयक समानतेचा पुरस्कार केला आणि त्यासाठी आयुष्य वेचले.

- ② सती बंदी :-

सन 1815 साली राजाराम मोहन रॉय यांनी सती प्रथेवर हल्ला चढवणारे पहिले पुस्तक लिहीले. आधुनिक भारताचे जनक म्हणून ज्यांना ओळखले जाते त्यांनी सनातन्यां-च्या विरोधाला न जुमानता स्त्री सुधारणेचा पाया बंगालमध्ये रचला. यासाठी त्यांनी इंग्रजी, फ्रेंच, लॅटीन, ग्रीक, पार्शियन, अरेबिक. इ. भाषा शिकल्या आणि 1828 साली ब्राम्हो समाजाची स्थापना केली.

गं. ज. लॉर्ड बेंटिंग यांनी इ.स 1829 साली सतीबंदीचा कायदा मंजूर केला. या कायद्याच्या द्वारे सती जाणे अथवा सती जाण्यास भाग पाडणे किंवा जिवंत जाळणे, पुरणे

Page No. :
Date : / /

हे बेकायदेशीर ठरविण्यात आले. आणि तो मनुष्यवधाचा गुन्हा समजून फौजदारी शिक्षेची तरतूद केली, राजाराम मोहन रॉय यांनी हिंदू धर्मातील ही अत्यंत क्रूर चाल कायद्याने बंद करून स्त्री सुधारणेचा पाया घातला.

③ भ्रूणहत्या विरोध :-

मुलगी जन्माला येणे हे 19 व्या शतकात पाप समजले जात होते किंवा शाप समजले जाई, त्यामुळे मुलीचा जन्म होताच त्यांना मारून टाकले जात असे. यासाठी मुलींना अफू सारखे पदार्थ देऊन मारले जात. या वाईट प्रथेविरुद्ध बंगालम--ध्ये राजाराम मोहन रॉय यांनी आवाज उठविला. परिणामी कायद्याद्वारे बालहत्या, भ्रूणहत्या बेकायदेशीर घोषित करण्यात आली.

④ बालविवाह व विधवा विवाह प्रतिबंध पद्धतीस विरोध :-

देवेंद्रनाथ यांनी याबाबत पुढाकार घेतला आणि 1872 साली मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा 14 वर्षे असावी असा 'नेटिव्ह सिव्हिल मॅरेज ॲक्ट' आणि 'ब्राम्हो मॅरेज ॲक्ट' मंजूर करून घेतला. तर केशवचंद्र सेन यांनी स्त्री सुधारणा व सामाजिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला, स्वतःच्या पत्नीला पडदा पद्धतीतून बाहेर काढले. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा पुनर्विवाहावरील बंदी हटविण्यासाठी मोहिम सुरु केली. 1855 मध्ये ब्रिटीश सरकारकडे विनंतीपत्र सादर करून विधवा पुनर्विवाहाचा कायदा संमत करण्याची विनंती केली.

⑤ विवाह वय :-

इ.स. 1954 च्या विवाह कायद्याद्वारे मुला मुलींचे विवाहासाठीचे किमान वय 21 वर्षे व 18 वर्षे निश्चित करण्यात आले असून या इ.स 1954 च्या खास विवाह नोंदणी अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. या कायद्याने विवाह या मूलभूत

VEDHA
Page No. :
Date : / /

प्रश्नाला कायदेशीर संरक्षण प्राप्त करून दिले गेले.

- ⑥ हुंडा :-

इ.स. 1961 च्या हुंडाप्रतिबंधक कायद्यानुसार हुंडा घेणाऱ्याला 6 महिन्यांची शिक्षा व 5000 रुपयाचे दंड ठरविण्यात आला आहे. भारतीय साक्षी पुरावा कायदा कलम 113 नुसार सात वर्षांच्या आत जर स्त्रिचा अनैसर्गिक मृत्यू झाला तर पती व त्याचे नातेवाईकांना आत्महत्येला जबाबदार धरून गुन्हा दाखल केला जाऊ शकतो.

> शिक्षक म्हणून समाजातील महिलांचे महत्त्व विशद करा.

स्त्रीयांबद्दल सकारात्मक विचार व दृष्टिकोन ही स्त्रीयांच्या प्रगतीची कारणे आहेत. अशी शिकवण आपण त्यांना विद्यार्थ्यांना दिली पाहीजे. त्यांच्यामध्ये स्त्रीयांबद्दल आदर व सन्मानाची वृत्ती निर्माण होण्यास हवी असा दृष्टिकोन समाजात रुजला पाहिजे. हे दोन्हीही दृष्टिकोन असलेला माणूसच स्त्रीयांच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरू शकतो.

स्त्रीयांचे कुटुंबातील स्थान खुप महत्त्वाचे आहे. तीच जर शिकली तर समाजात आणि कुटुंबात परिवर्तन घडवून आणू शकते. स्त्रीया ह्या पुरुषांपेक्षा कमी नसून ~~त्यांच्या~~ त्यांच्या बरोबरीने काम करण्याची ताकद स्त्री मध्ये निर्माण होऊ शकते.

समाजातील स्त्री व पुरुष आंतरक्रिया या समान श्रद्धा, परंपरा, चालीरीती, रुढी, मुल्ये, वर्तणूक यांवर अवलंबून असतात. त्यांच्या आंतरक्रियांवर प्रभाव पाडणाऱ्या समान (वर्तन) पद्धतींनी त्यांच्या समाजाची संस्कृती बनलेली असते.

Good

Page No. :
Date : / /

जयक्रांती अध्यापक महाविद्यालय, लातूर.
2020 - 2021.

बी. एड. प्रथम वर्ष - II^nd Sem.

* प्रात्यक्षिक कार्य *.

विषय :- समावेशित शिक्षण. [203].

प्रात्यक्षिक कार्याचे नाव :- एका विशेष शिक्षण देणाऱ्या शाळेला भेट देऊन अहवाल तयार करणे.

मार्गदर्शक प्राध्यापक :- सुरवसे सर.

छात्राध्यापकाचे नाव :- गायकवाड यशोमती.

रोल नं :- 23.

युडायस क्र. २७२८१२००८२९

जीवन विकास प्रतिष्ठान, लातूर द्वारा संचलित

# सौ. सुशिलादेवी देशमुख निवासी मुलींचे मूक–बधीर विद्यालय, लातूर.

नोंदणी क्रं. एफ ३९३, लातूर

अपंग शाळा मान्यता नोंदणी क्रमांक ०२४७

कार्यालय : विवेकानंद हॉस्पीटल रोड, सिग्नल कॅम्प, लातूर – ४१३ ५१२.

☎:२५२५१४

: मुख्याध्यापिका :
श्रीमती सुनिता के. कुलकर्णी

: अध्यक्ष :
जयसिंहराव आनंदराव देशमुख

दिनांक : 13/07/2021

जा.क्र.

प्रती,

प्राचार्य

जयक्रांती अध्यापक महाविदयालय

लातूर

विषय– विदयार्थीनी शाळेस भेट देल्याबाबत

मा.माहेदया,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येतो की, आपल्या महाविदयालयातील विदयार्थी हे विशेष शाळा भेटी अंर्तगत आपल्या शाळेला भेटी दिली आहे हजर विदयार्थीनींची यादी सोबत जोडत आहोत

आपला विश्वासू

मुख्याध्यापिका
सौ. सुशिलादेवी देशमुख निवासी
मुलींचे मुकबधीर विद्यालय, लातूर.

छात्राध्यापकाचे नाव :-
गायकवाड यशोमती बाबूराव.

एका विशेष शिक्षण देणाऱ्या शाळेला भेट देऊन अहवाल तयार करणे :-

प्रस्तावना :-

सामान्य बालकांपेक्षा भिन्न असतात क्षमता व गरजा असलेल्या बालकास विशेष बालक म्हणतात. अशा बालकाची वाढ व विकास सामान्य बालकांपेक्षा भिन्न असल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक गरजा भिन्न असतात. विशेष गरजा असणाऱ्या मुलांचा विचार करून विविध तंत्र-साधने, सुविधा व उपकरणे यांच्या साहाय्याने जी शिक्षण प्रणाली आणि अध्यापन पद्धती ठरविली जाते, त्यास 'विशेष शिक्षण' म्हणतात.

जेव्हा शिक्षक सर्व साधारण विदयार्थ्यांना डोळ्यासमोर ठेवून शिकवतो, तेव्हा त्यांचे शिकवणे विशेष मुलांना उपयोगी पडतेच असे नाही. त्यामुळे सर्व साधारण विद्यार्थ्यांपेक्षा वेगळ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गतीनुसार विशेष शिक्षण मिळावे, याकरिता शासनाकडून सोय केली जाते. तेच विशेष शिक्षण होय. विशेष शिक्षणामुळे विशेष बालकांना परिणामकारक जीवन जगण्याचे बळ प्राप्त होते. त्यांच्या गरजांची पूर्ती विशेष शिक्षणाने केल्यास हीच मुले पुढे राष्ट्रशक्ती सा ठरून राष्ट्रविकास साधू शकतात.

P.T.O.

## विशेष शिक्षण म्हणजे काय?

विशेष शिक्षण म्हणजे दुर्बल किंवा अपंग बालकांसाठी शिक्षणाची वेगळी व्यवस्था करणे होय. अशा बालकांसाठी विशिष्ट शाळाची सोय असते. यांच्या अभ्यासक्रम इतर सामान्य शाळेतील अभ्यासक्रमापेक्षा वेगळा असतो. सामान्य शाळेत पारंपारिक अभ्यासक्रम असतो. तर विशेष शाळेत अंध-मूक-बधिर, अस्थिव्यंग, श्रवणदोष, वाचनदोष अशा मुलांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम असतो. त्यांची शैक्षणिक साधने वेगळी असतात. अशा शाळेतील शिक्षकांना स्वतंत्र प्रशिक्षण दिले जाते. या शाळेमध्ये सामान्य विद्यार्थ्यांना प्रवेश नसतो.

### उद्दिष्टे :-

१) विशेष बालकांना ओळखून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शैक्षणिक संधी उपलब्ध करुन देणे.
२) विशेष बालकांच्या गरजा, क्षमता व अडचणी ओळखून त्यांच्याकडे व्यक्तीगत लक्ष देणे आणि साधन सुविधा पुरवून त्यांना मदत करणे.
३) विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी विशेष अभ्यासक्रम, विशेष अध्यापनपद्धती, विशेष तंत्र साधनांचे विकसन व अंमलबजावणी करणे.
४) विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी स्वतंत्र मुल्यमापन पद्धतीचे विकसन करुन अंमलबजावणी करणे.
५) विशेष बालकांना जीवन जगण्यास समर्थ बनविणे.

P.T.O.

FOR EDUCATIONAL USE

## प्रात्यक्षिक कार्याचे शिक्षकासाठी महत्त्व :-

शाळेचा दर्जा हा शिक्षकाच्या दर्जावर अवलंबून असतो. कोणत्याही शिक्षण योजनेच्या ठिकाणी केंद्रस्थानी शिक्षकच असतो. त्यामुळे शिक्षकाने स्वतःच्या स्वतः शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे. शिक्षकांनी आयुष्याच्या आतापर्यंत विद्यार्थी म्हणूनच जगायला हवे. त्यांनी शिकण्याची इच्छा कधीही मरु देता कामा नये.

या प्रात्यक्षिक कार्यामुळे शिक्षकाला विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या अध्ययन - अध्यापनाचा अनुभव मिळेल. त्यांच्या शाळेतील परिसराची माहिती मिळेल. त्यांना लागणाऱ्या सोयीसुविधा, अध्ययन - अध्यापनाचे साहित्य, आरोग्यसेवा इ. गोष्टींची माहिती मिळेल.

विशेष बालकांना अध्ययन करताना येणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाय योजना इ. गोष्टींची प्रत्यक्ष अनुभूती मिळेल. त्यांच्यासाठी असणाऱ्या अभ्यासक्रमाची ओळख होईल. त्यांच्यासाठी शासनाने राबवलेल्या विविध योजनांची, त्यांना मिळणाऱ्या मदतीची माहिती मिळेल.

या प्रात्यक्षिक कार्यामुळे शिक्षकाला त्यांच्या नैतिक जबाबदाऱ्या, कर्तव्ये याची जाणीव होईल.

P.T.O.

## अपंग शिक्षणाचा इतिहास :-

पूर्वी शारीरिक व मानसिक दोष असणाऱ्या मुलांना मागील जन्माचे फळ समजून त्यांच्याकडे लक्ष दिले जात नव्हते. मात्र मध्ययुगात धार्मिक दृष्टिकोनातून विशेषत: ख्रिस्ती धर्मातून दयेच्या भावनेने कार्य-चर्चमधून दिव्यांगांची सेवा केली जाऊ लागली. पुढे आधुनिक काळात वैचारिक प्रबोधन होऊन तत्त्वज्ञ, विचारवंत यांनी सर्वसामान्यांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केला होऊ लागले. शिक्षण तज्ज्ञांनी दिव्यांग बालकांना सामान्य मुलांबरोबरच विशेष शिक्षण देण्यात यावे, यासाठी एकात्मिक शिक्षणाची शिफारस केली.

विशेष बालकांना विशेष शिक्षण देण्यासाठी सॅम्युएल हॅनिक (Germany), थामस ब्रेडवूड (England), गॅलेनडट (America), वॅलेंटीन हॅनी (France), पी. पी. सिथीन (Spain), मारिया मॉटेसरी (Italy), सेगाईन व इटाई इ. शिक्षणतज्ज्ञांचा मोलाचा वाटा आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विशेष गरजा असणाऱ्या मुलांबाबत कायदा, सुविधा, उपचार इ. पद्धतींच्या नियोजनाची सुरुवात करण्यात आली.

२०१५ नंतर भारतामध्ये कोणत्याही प्रकारची शारीरिक, मानसिक अक्षमता असलेल्या व्यक्तींना अपंगाऐवजी दिव्यांग असे संबोधले जाऊ लागले. अपंग विद्यार्थ्यांमध्ये असलेली न्यूनगंडाची भावना दूर करून त्यांना सामान्य विद्यार्थ्यांसोबत सामावून घेऊन शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने अपंग एकात्मिक शिक्षण योजना सुरू करण्यात आली.

P.T.O.

FOR EDUCATIONAL USE

## अपंग शिक्षणाचे प्रकार :-

अपंग बालकांना मुख्यत: तीन प्रकारे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे.

1) विशेष शिक्षण
2) एकात्मिक शिक्षण
3) समावेशित शिक्षण

## 1) विशेष शिक्षण :-

" विशेष शिक्षण म्हणजे दुर्बल किंवा अपंग बालकांसाठी शिक्षणाची वेगळी व्यवस्था करणे होय. अशा बालकांसाठी विशिष्ट शाळांची सोय असते. यांचा अभ्यासक्रमही इतर सामान्य शाळेत सामान्य शाळेत पारंपारिक अभ्यासक्रम असतो. तर विशेष शाळेत अंध-मूक-बधिर, अस्थिव्यंग, श्रवणदोष, वाचनदोष अशा मुलांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम असतो. त्यांची शैक्षणिक साधने वेगळी असतात. अशा शाळेतील शिक्षकांना स्वतंत्र प्रशिक्षण दिले जाते. या शाळांमध्ये सामान्य विद्यार्थ्यांना प्रवेश नसतो.

## 2) एकात्मिक शिक्षण :-

एकात्मिक शिक्षण व्यवस्थेत अपंग मुलांना सामान्य शाळेतच सामान्य विद्यार्थ्यांबरोबर प्रवेश दिला जातो. परंतु येथेही विशिष्ट शिक्षण हे सामान्य शिक्षणाचा एक भाग आहे. म्हणजे अशा मुलांचा प्रवेश सामान्य शाळेत असला तरीही त्यांना अशा शाळेत विशेष प्रकारचे शिक्षण दिले जाते.

P.T.O.

3) समावेशित शिक्षण :-

समावेशित शिक्षण पद्धती ही विशेष पद्धती व एकात्मिक शिक्षण यांच्याही पुढचे पाऊल होय. समावेशित शिक्षण हे सामान्य शिक्षण प्रक्रियेचा एक भाग आहे. दुर्बल बालकांना काही आवश्यकतेनुसार साधारण विद्यालयात शिकवणे समावेशित शिक्षण नसून बालकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार साधारण विद्यालयात शिक्षण नसून त्यांच्या आवश्यकतेनुसार सामान्य बालकांसोबत शिक्षण देणे यात साधारण व दुर्बल मुलांना सर्व शक्य सर्वांसाठी शिक्षणाची तरतूद आहे. हे शिक्षण देत असताना दुर्बल बालकांच्या विशिष्ट शैक्षणिक आवश्यकताही ध्यानात घेतल्या जातात. भारतात 6 ते 14 वर्षांच्या बालकांची संख्या 22 कोटी असून दुर्बल व्यक्तींची संख्या 2 कोटी 30 लाखापर्यंत आहे. समावेशित शिक्षण अशा सर्व बालकांना एकत्रित शिक्षणाची संधी देते. अशा शाळामधील अभ्यासक्रम हा लवचीक असतो. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांकडे विशेष लक्ष दिले जाते.

P.T.O.

## मतिमंद शिक्षण :-

"ज्या बालकाची बुद्धिमत्ता सामान्य बुद्धिमत्तेपेक्षा कमी आहे. जो मानसिक दृष्ट्या मागास आहे आणि ज्याला समायोजन किंवा पाठशालीतील कार्यक्रमांशी समायोजन साधणे अवघड जाते. अशा बालकास मतिमंद बालके म्हणतात."

मतिमंद बालके आपल्या संवेदनावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. शिक्षणाच्या दृष्टीने विचार करता 60 ते 85 बुद्ध्यांक असणाऱ्या बालकांना शिक्षण देणे शक्य असते. 31 ते 60 बुद्ध्यांक असणाऱ्या बालकांना बौद्धिक शिक्षण देणे शक्य नव्हते त्यांना काही ना काही व्यावसायिक शिक्षण देता येते.

बर्टनच्या म्हणण्यानुसार मतिमंद विद्यार्थीसाठी स्वतंत्र शाळेची सोय करणे आवश्यक आहे. कारण या विद्यार्थ्यांची सामान्य विद्यार्थ्यांशी कोणत्याच पातळीवर तुलना होऊ शकत नाही. त्यांना त्यांच्या कुवतीनुसार वेगळा पाठ्यक्रम हवा, शिक्षकाने त्यांना अधिक प्रेमाने व सहानुभूतीने शिकवावे.

मतिमंदाची शिकण्याची गती सावकाश असते. म्हणून व्यक्तिगत निर्देशनाची गरज असते. अशावेळी छोटे वर्ग हवेत. वर्गात 20 पेक्षा जास्त मुले नसावीत. मतीमंदांना शिकविणारा शिक्षक कुशल असावा, त्याने आपल्या अध्यापनात सोप्या, मनोरंजक पद्धती वापराव्यात, त्याने स्नेह व सहानुभूतीने अट्टाहास न करता बालकांना शिकवावे.

P.T.O

FOR EDUCATIONAL USE

## अंध शिक्षण :-

शारीरिक अपंगत्वापैकी दृष्टीदोष हे एक अपंगत्व मानले गेले आहे. ७० से.मी. अंतरावरून ज्या व्यक्तीला हाताची बोटे मोजता येत नाहीत. अशांना अंधव्यक्ती म्हणतात. काही मुले अंध असतात. त्यांना काहीही दिसत नाही. त्यांना हे अंधत्व जन्मतः अपघातामुळे किंवा आजारामुळे आलेले असते. काही मुले अंशतः अंध असतात. त्यामुळे त्यांच्यात दृष्टीदोष निर्माण होतो.

## शैक्षणिक उपाययोजना :-

दृष्टिदोष / अंध मुलांसाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातात :

१) अंध मुलांना विशेष शाळेत दाखल केले जाते.
२) अशा शाळांमधून ब्रेल लिपीतून शिक्षण दिले जाते.
३) अंशतः दृष्टीदोष असणाऱ्या अध्ययनार्थ्यांना शक्यतो अंकगणिताचे अध्यापन केले जाते.
४) लिहिलेले किंवा मुद्रित साहित्य ठळकपणे छापून दिले जाते.
५) दृष्टिदोष असणाऱ्या विद्यार्थ्यांवर वाचनामुळे पडणारा ताण कमी व्हावा, म्हणून श्रवणफितीचा उपयोग केला जातो.
६) आकाशवाणीवरून प्रसारित होणारे विविध शैक्षणिक कार्यक्रम मुलांना ऐकवले जातात.

अशा प्रकारे, अंधांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो.

P.T.O.

FOR EDUCATIONAL USE

## मूकबधिर शिक्षण :-

काही मुले मुके असतात. त्यांना काहीही बोलता येत नाही. त्यांना हे अपंगत्व जन्मत: असते किंवा अपघातामुळे, आजारपणामुळे आलेले असते. काही मुले अंशत: मुके, तोतरे, कर्णबधिर व्यक्तीपेक्षा ऐकू कमी येणाऱ्या व्यक्तींची संख्या जास्त आढळून येते. काही वेळा अनुवंशाने दोषयुक्त वातावरणामुळे, दुर्घटनेमुळे, गंभीर आजारामुळे कमी ऐकू येण्याचा दोष निर्माण होतो.

'ज्या बालकांना ऐकू येत नाही आणि बोलताही येत नाही. अशा बालकांना मूकबधिर बालके असे म्हणतात' अशा बालकांसाठी मूकबधिर शाळेची व्यवस्था आहे.

### अशा बालकांसाठी शैक्षणिक उपाययोजना :-

1) ओठांच्या सावकाश हालचालीवरून म्हणजे ओष्ठ्य वाचनामुळे अशा मुलांना उच्चारण समजून देणे.
2) अध्यापनात विविध दृकश्राव्य साधनांचा वापर करावा.
3) शालेय शिक्षणाबरोबर त्यांना हस्तकला, चित्रकला, शिक्षणवह्या विविध कला शिकवल्या जातात.
4) मूकबधिरांना उत्तेजन मिळावे, म्हणून विविध स्पर्धा घेतल्या जातात.
5) शैक्षणिक कार्यक्रमातून अशा बालकांसाठी भाषाचिन्ह पद्धत, श्रवण पद्धतीचे नकाशे, चार्ट यांचा उपयोग केला जातो.

अशा प्रकारे मूकबधिर बालकांना वेगवेगळ्या प्रकारे शिक्षण दिले जाते.

P.T.O.

## भारतामध्ये दिव्यांग शिक्षणाची संकल्पना :-

भारतात विकलांगतेची स्थिती दर्शविण्यासाठी विविध संज्ञा वापरल्या जातात. या सर्व संज्ञा साधारणपणे वैद्यकीय प्रारूपावर [Medical Model] अवलंबुन आहेत. भारतीय संदर्भात सामाजिक प्रारूपावर [Social Model] आधारित संकल्पनात्मक चौकटीचा अभाव असल्यामुळे विभिन्न पद्धतींच्या आधारे विकल्प विकलांगतेच्या मूल्यमापनाचे प्रमाणीकरण (Standardisation) उपलब्ध नाही. देशात सर्वसाधारणपणे विकलांग, पांगळा, शारीरिकदृष्ट्या शारीरिकदृष्ट्या अपंग यासारखे पर्यायी शब्द जे संबंधित व्यक्तींशी आजार स्थिती दर्शवितात, त्यांचा वापर केला जातो.

## संविधानिक अधिकार :-

समाजातील सर्व व्यक्तींना ~~समता~~ समता, स्वातंत्र्य, न्याय आणि प्रतिष्ठा प्राप्त व्हावी. यासाठी संविधान कटीबद्ध आहे. सर्वसमावेशक समाजनिर्मितीसाठी याबाबी आवश्यक आहेत. आणि यामध्ये वंचित समाजघटकांचाही समावेश होतो.

विकलांग व्यक्ती संदर्भात कलम ४१ चा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. या कलमानुसार, राज्य हे रोजगाराचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि बेरोजगारी, वृद्धपकाळ, आजारपण काळामध्ये सार्वजनिक मदतीची तरतूद करेल, असे नमूद केले आहे.

P.T.O.

FOR EDUCATIONAL USE
REEGAL INDUSTRIES

शाळेतील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती :-

शाळेत काम करणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची संख्या : 50

मु.अ.चे नाव :- सौ. सुनिता मनोज कुलकर्णी

कोरोना काळातील शिक्षकांची उपस्थिती : 50%

शालेय व्यवस्थापन समितीतील सदस्य संख्या : 11
[ पदसिद्ध चेअरमन, पदसिद्ध सचिव, पदसिद्ध कोषाध्यक्ष, 4 सदस्य, शालेय समिती सचिव, शिक्षक प्रतिनिधी, शिक्षकेत्तर प्रतिनिधी, पालक प्रतिनिधी इ.]

शाळेची वेळ :-

सोमवार ते शुक्रवार : 11 ते 05
शनिवार : 08 ते 11

शाळेतील एकूण वर्ग तुकडी व विद्यार्थ्यासंबंधित माहिती :

इयत्ता : पाचवी ते 10 वी पर्यंत

वर्गसंख्या : 20

वर्गव्यवस्था :
या शाळेतील विद्यार्थी आसन व्यवस्था ही गोलाकार आहे. प्रत्येक वर्गात किमान 8 विद्यार्थी असल्यास वर्ग मान्यता मिळते.



P.T.O.

प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांची श्रवण क्षमता किती आहे ? हे दर्शविणारा स्वतंत्र तक्ता आहे.

विद्यार्थ्यांबद्दल माहिती :-

या शाळेमध्ये मूक आणि बधीर विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

1) या विद्यार्थ्यांना स्वतःचे मत किंवा अडचणी व्यक्त करताना अनेक अडचणी येतात.

2) हे विद्यार्थी हस्तकला व्यवसाय निपुण आहेत.

3) तसेच चित्रकला, क्रिडा स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धेत उत्तम कामगिरी करून आपले नाव / ओळख निर्माण करताना दिसतात.

4) विद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदवून आपल्यामधील गुप्त क्षमता विकसित करताना दिसतात.

5) परंतु, सध्या कोरोना काळामध्ये त्यांच्या आर्थीक परिस्थितीमुळे ऑनलाईन शिक्षणाचा सहभाग कमी आहे.

6) हे विद्यार्थी खुणांचा वापर करुन संभाषण करतात.

अशा प्रकारे, हे विद्यार्थी जरी विशेष असले तरी, त्यांच्या विशेष कौशल्यामुळे ते दुसऱ्यांना प्रेरणा देतात.

P.T.O.

## इतर माहिती :-

शाळेमधील विद्यार्थ्यांशी उपक्रम :-

1) चित्रकला, क्रिडा यांच्या जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेतात. त्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाते.

2) विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

## अभ्यासक्रम :-

विशेष गरजा शाळेचा अभ्यासक्रम, त्यांच्या परिक्षा स्वतंत्र असतात. अभ्यासक्रमामध्ये शिवणकाम, चित्रकला, हस्तकला, गृहशास्त्र, शरीर आरोग्यशास्त्र, विज्ञान अशा विषयांचा समावेश असतो.

या शाळेला आदर्श शाळेचा पुरस्कार वेगवेगळ्या संस्थामार्फत भेटलेला आहे.

दहावीचा स्वतंत्र बोर्ड असणारी महाराष्ट्रातील एकमेव शाळा आहे.

P.T.O.

FOR EDUCATIONAL USE

भेट देणाऱ्या शाळेचे नाव, संस्था, गाव याबद्दल सविस्तर माहिती :-

शाळेचे नाव :- सौ. सुशिलादेवी मुलींचे मुकबधीर विद्यालय, लातूर.
ता. लातूर, जि. लातूर

संस्थेचे नाव :- जीवन विकास प्रतिष्ठान द्वारा, संचालित.

शाळेचे स्थापना वर्ष :- सन 1989-90

शाळेचा पत्ता :- सिग्नल कॅम्प, लातूर

शाळेचा परिसर :-

शाळेचा परिसर स्वच्छ आणि सुंदर आहे. शाळेच्या भिंती बोलक्या आहेत. भिंतीवर भौगोलिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक, शैक्षणिक दृष्टीकोन विकसित करणारे वेगवेगळ्या प्रकारचे सुंदर चित्ररेखाटन करण्यात आले आहे. शाळेच्या परिसरात वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था आहे. शाळेच्या परिसरात वातावरण निसर्गरम्य सुविधा आहे.
अशा प्रकारे शाळेचे परिसर विद्यार्थी-शिक्षकांच्या सोयीनीयुक्त आहे.

P.T.O.

FOR EDUCATIONAL USE

## विद्यार्थ्यांना अध्ययन करताना येणाऱ्या अडचणी :-

१) मुकबधीर असल्यामुळे स्वतःच्या भावना व्यक्त करता येत नाहीत.
२) अध्ययनातील शंका विचारता येत नाहीत.
३) त्यांना सतत शारीरिक त्रास होतो.

## शिक्षकाचा अध्यापन करताना येणारा अनुभव :-

विद्यार्थी स्वतः अभिव्यक्त होऊ शकत नाहीत. त्यामुळे शिक्षकाला प्रत्येक विद्यार्थ्यांच्या हालचालींचे वैयक्तिक निरीक्षण करून अध्यापन करण्याच्या, अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करावा लागतो. विद्यार्थ्यांशी सतत खुणांच्या साहाय्याने संभाषण करण्याचा प्रयत्न करावा लागतो. विद्यार्थ्यांना प्रेमळ वागणूक दयावी लागते.

विद्यार्थ्यांमध्ये कसल्याही प्रकारचा न्युनगंड निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या कौशल्याप्रमाणे, त्यांच्या कुवतीप्रमाणे मार्गदर्शन करावे लागते.

## कोरोना काळातील अध्यापन पद्धती :-

या कोरोनाच्या संसर्गामुळे विद्यार्थी प्रत्यक्ष वर्गात हजर राहू शकत नाहीत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षणाची सुविधा केली आहे. ऑनलाईन वर्गात विद्यार्थ्यांना व्हिडिओ तयार करून पाठवले जातात.

P.T.O.

Bharat Shikshan Prasarak Mandal Latur's

# Jaikranti Sr. College Of Education (B.Ed.)

शैक्षणिक क्रांती म्हणजेच जयक्रांती !

ज्ञानमेव जयते

Sitaram Nagar, Latur-413 512 Ph. (02382) 256309

**Academic Year :** 2021 - 2022

**Practicum / Enhancing Professional Capacities / Practical Courses**

**Code & Subject :** BEDCC - 301 , BEDCC - 302

Student Name : Gulbilepatil Priyanka Kalyan.

Roll No. : ________________

Class : **B.Ed. F.Y / S. Y.**

Semester : III

भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित

शैक्षणिक क्रांती म्हणजेच जयक्रांती !

ज्ञानमेव जयते

# जयक्रांती अध्यापक महाविद्यालय

## (बी. एड्.)

सिताराम नगर, लातूर

२०    -२०

# प्रमाणपत्र

श्री / श्रीमती / कु. गुळबिले पाटील प्रियंका कल्याण

वर्ग B.ed सत्र III ह. क्र.________ यांनी शैक्षणिक वर्ष 2022-23

मध्ये कुमार व वैयक्तिक एका बालकाचा अभ्यास

समाधानकारक/चांगले/उत्तमरित्या पूर्ण केले.

करिता हे प्रमाणपत्र देण्यात येते.

दिनांक :

प्रभारी अधिव्याख्याता
09/11/22 विभाग

प्राचार्य
जयक्रांती अध्यापक
महाविद्यालय (बी.एड्.), लातूर

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. | विषय शिक्षक स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|
| BEDCC-301 | बाल्यावस्था आणि वाढते वय कुमार अवस्थेतील मुला बालकांच्या अभ्यास. | | 9-11-22 | |
| BEDCC 302 | अध्ययनासाठीचे मूल्यांकन | | 09/11/2022 | |

बाल्यावस्था आणि वाढते वय

Childhood & Growing up

BED CC - 301.

प्रा. :- श्रीमती हिंगणे एस. एस. मॅडम.

* कुमारअवस्थेतील एका बालकाचा अभ्यास -

→ प्रस्तावना : " मानवी जीवनातील पुर्नजन्माची अवस्था किंवा बाल्यातुन तरूणपणाकडे नेणारी संक्रमणाची अवस्था म्हणजे कुमारवस्था होय."

कुमारवस्थेतील बालकांचे वय 12 ते 18 या वयातील असते. या अवस्थेतील बालकात शारिरीक, मानसिक, समाजिक या स्थितीत फार जलद गतीने बदल घडुन येत असतात. त्यामुळे जिवनाशी सामार्थ जाताना प्रश्न उभे राहतात. म्हणुन या अवस्थेला समस्यांची अवस्था असेही म्हणतात.

वादळी अशांततेचा काळ (period of Streme & Stress असेही म्हणतात.

कुमारवस्थेत बदल अत्यंत वेगाने होतात त्यामुळे मुले भांबावुन जातात. योग्य मार्गदर्शनाच्या अभावाने याची स्पष्ट कल्पना येत नाही. चुकिच्या पद्धतीने माहिती मिळवण्याच्या प्रयत्न करतात. मासीक पॉर्न, वेबसाइट इ. विकृत माहिती विद्यार्थ्यांसमोर येऊ शकते योग्य मार्गदर्शन करून यांच्या क्षमताना विधायक वळण लावता येते.

गरज व महत्व –

कुमारांची अवस्था ही अनेक समस्या संघर्ष ह्वंद्व यातुन जाणारी असते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला योग्य वळण लावणे गरजेचे आहे. यातुनच योग्य व्यक्तीमत्व आकारास येईल. ही भूमिका कुटुंब, शाळा, परिसर माध्यम, यांनी सर होणे गरजेचे आहेस पण त्याच बरोबर सर्वांनी एकमितपणे यांचा विचार करुन समन्वयाची भुमिका बजावणे गरजेचे आहे.

कुमारअ समतांचा विकास करण्यासाठी योना संघर्षांना तोंड थावे देण्यास समर्थ बनवण्या-साठी कुटुंब, शाळा, प्रसार माध्यम यांनी सतर्क रहणे गरजेचे आहे.

बालक हा समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. त्याचा मानसिक, बौद्धीक, शारिरीक विकास सामाजिक विकास होणे खुप गरजेचे आहे. बालक शिकला तर तो समाजाला चांगले ज्ञान देऊ शकतो. देऊ शकतो. बालकानुनच समाजाची निर्मिती होवु शकते. म्हणुन प्रत्येक बालक हा कुशलोत व सदृढ होणे खुप गरजेचे आहे. त्याचा केवळ शारीरिक विकास महत्वाचा नसुन त्याचा मानसिक विकास होणे तितकाच महत्वाचा आहे. याबाबतच आपण व आपले सतत बालकाचा विकास होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | घटक / उपघटक | पेज क्र. |
|---|---|---|
| A) | बालकाची सर्वसामान्य माहिती | |
| B | बालकाचा शारीरिक विकास | |
| C | बालकाचा मानसिक विकास | |
| D | बालकाचा भावनिक विकास | |
| E | बालकाच्या आवडी निवडी | |
| F | बालकाचा सामाजिक विकास | |
| G | बालकाचा नैतिक विकास | |
| H | बालकाचे गुणवैशिष्ट्ये व दोष | |
| I | बालकाचे व्यक्तिमत्व | |
| J | बालकाविषयी प्रतिक्रिया | |
| K | बालकाची उपयुक्तता | |
| L | स्वत:चे मत | |
| M | समारोप | |

बालकाची सर्वसामान्य माहिती

1) बालकाचे नाव : अक्षरा महेश पवार

2) पत्ता - हरंगुळ (बु.) ता. जी. लातूर

3) शाळेचे नाव - स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर

4) इयत्ता : 7th

5) तुकडी : 'अ'

6) बालकाची जन्मतारिख - 16-11-2012

7) वय - 16-11-2012 09 वर्ष

8) आईचे नाव - सुचिता

9) पालकाचे शिक्षण - B. com.

10) पालकाचा व्यवसाय - Job.

अशा प्रकारे बालकाची म्हणजे प्रगती अक्षरा महेश पवार हीला तिची विचारपूस करून तिला प्रश्न पद्धतीचा वापर करून त्या बालकाची सर्वसामान्य माहिती मिळाली.

B) बालकाचा शारीरिक विकास –

या अवस्थेमध्ये मुलामुलींमध्ये जैविक शारीरिक बदल घडुन येतात ते म्हणजे

i) जेवन व्यवस्थीत करत नाहीत
ii) हातापायाची वाढी वाढल्याने ती लेबु दिसत आहे.
iii) शारीरिक रचना व बांधा यामध्ये बदल होत आहे.
iv) उंचीच्या मानाने वजन वाढत नाही.

C) बालकाचा मानसिक विकास –

बालकाचा मानसिक विकास घडवुन आणायचा असेल तर त्याच्या सर्वांगीण विकासाच्या अभ्यास करणे गरजेचे ते म्हणजे त्याची निरीक्षण क्षमता.

i) निरीक्षण क्षमता
ii) अनुकरण क्षमता
iii) तर्क व अनुमान
iv) सृजनशिलता

i) निरीक्षण क्षमता :

एखाद्या आवडीच्या विषयात तासन-तास रमते रमते. तीला एखाद्या गोष्टीचे निरक्षण करायला खुप आवडते. ती जर निरीक्षण करायला लागली तर ती त्यात रमुन जाते ते कसे असे.

काय झाले? कशामुळे झाले? त्याला असे करता येईल का? व ती त्याला पुर्व ध्यानपुर्व पाहते. ती सतत वर्तमानपत्रे, मासिके, कथा, कादंबऱ्या यांचे नियमित वाचन करते. तीला सतत मानसिक संघर्षाला सतत समोरे जावे लागते.

ii) अनुकरण क्षमता :
खुप मायाळु आहे. ती सर्वांसोबत मायेने प्रेमाने राहते. तीला अहंकारपणा नाही ती घरामध्ये सर्वांसोबत प्रमाने राहते. तीला लहान मुले व तिच्या बरोबरच्या मुली यांच्या सोबत खेळायला आवडते. ती मोठे जसे बोलतात तो राहायला बघते.

iii) स्मरणशक्ती :
खुप हुशार आहे. ती काही पाहिलेले खुप लवकर लक्षात ठेवते तिचा विचार शक्ती खुप चांगली आहे. ती शाळेमध्ये वर्गात ती खुप हुशार आहे अशा प्रकारे. तीची स्मरणशक्ती खुप चांगली आहे.

iv) तर्क व अनुमान :
मुलांचा मानसिक विकास करायचा असेल तर त्याला ~~तर्क~~ व अनुमान बरोबर लावावा लागेल.

→ तिची तर्क व अनुमान शक्ती खूप चांगली आहे.
→ ती तर्क व अनुमान बरोबर लावते.

ग) सृजनशिलता :
→ सृजनशिलता ही प्रत्येक विषयामध्ये असायला पाहिजे.
→ ती शाळेत, घरी किंवा समाजात अध्यापक विद्यार्थी नी म्हणुन ओळखली जाते.
→ अशा प्रकारे एखाद्या मुलाच्या विकास करायचा असेल तर त्याच्या मानसिक विकास होणे खुप गरजेचे आहे. पण त्या विद्यामध्ये निरीक्षण क्षमता, स्मरणशक्ती तर्क व अनुमान व सृजनशिलता गुण असायलाच पाहिजे.

बालकाचा भावनिक विकास : बालकाच्या भावनिक विकासाच्या संदर्भात काही बाबी महत्वाच्या आहेत. त्यामध्ये वेगवेगळ्या आविष्कार दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामध्ये भिती, क्रोध, चिंता, प्रेम, सामाजिक विकास सहानभुती यांचा समावेश होतो. या भावना खालीलप्रमाणे :

प्रेम : प्रेम अतिशय व्यापक संकल्पना आहे. लहानपणापासुनच म्हणजे जन्मापासुन प्रौढ अवस्थेपर्यंत

प्रत्येक व्यक्तीला इतरांच्या प्रेमाची गरज आहेत. इतरांवर प्रेम केल नाही तरी चालेल पण आपल्यावर सगळे प्रेम करावेत असे वाटते.

ii] राग क्रोध :

→ भिती आणि चिंता या दोन बाबींशी निगडीत क्रोध-राग ही भावना आहे.

→ तीला खोटे बोलायला आवडत नाही तीला कोणी तीला खोट बोल तर तीला लगेच राग येतो.

iii] चिंता :

→ ती सतत आपल्या कुटुंबाची चिंता करत असते.

→ तिची तब्येत चिंता करून करून खुप खराब झालेली आहे.

iv) भिती :

→ ती अंधारात जायला खुप भिते.

→ मोठ्याने आवाज आल्यास, कर्कश आवाज असल्यास शिक्षकांनी दरडावल्यास, आईने मारण्यासाठी हात उगारल्यास व ती एकटी असल्यासही खुप भिते.

६] बालकांच्या आवडी - निवडी :

या वयातील बालकांना वेगवेगळे छंद निर्माण होतात. बालकांच्या वेग-वेगळ्या आवडी - निवडी असतात. त्यांना वेगवेगळं पाहिलेलं करावं वाटते. त्यांचा कल जास्त प्रमाणात शिक्षणाकडे नसुन खेळण्याकडे असतो. तर काही मुलांचा नसतो. अशा प्रकारे जीचा मी अभ्यास करत आहे तिच्या आवडी - निवडी खालीलप्रमाणे :

i] कला :

- कला ही जन्मातच तिच्या अंगी आली आहे.
- तिला विनकाम करायला खुप आवडते.
- तिला मिळुन - मिसळुन राहायला आवडते.
- तिला शाळेत जायला खुप आवडते.

ii] अभिरुची :

- तीला वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन तेथील माहिती मिळव-घ्यला खुप आवडते.
- विविध भाषा शिकण्यास खुप अभिरुची आहे.
- गृहजिवन शास्त्राचा विषयी खुप रुची आहे.

iii] खेळ :

→ क्रिडा क्षेत्राची खुप आवड आहे.
→ तिला विविध खेळ खेळावेस वाटतात.
→ तिला सामुहिक खेळ खेळायला आवडते.

iv) छंद :

या वयातील बालकांना वेगवेगळे छंद निर्माण होतात तसेच वेगवेगळे छंद निर्माण होतात.
→ तिला वेगवेगळ्या रांगोळ्या काढायचा छंद आहे.
→ तिला सर्वांसोबत बोलण्याचा छंद आहे.
→ तिला खेळायचा छंद आहे.

F] बालकांचा सामाजिक विकास :

मुलांचा विकास सामाजिक वातावरणात होतो. सामाजिक वातावरणामध्ये सभोतालच्या परिस्थितीचा विचार होतो. जन्मानंतर मुल हे कुटुंबात वाढते परंतु हळुहळु सामाजिक जिवनाचा आस्वाद घेऊ लागते. म्हणूनच सामाजिक वातावरणात मुलांच्या जिवनावर परिणाम होतो. या वयातील बालकांचे सामाजिक वर्तन खालीलप्रमाणे :

i] मनमिळावूपणा :

→ अक्षराचा स्वभाव खुप छान व मनमिळावु आहे, ती सर्वांसोबत खुप प्रेमाने राहते.
→ अक्षराचा थाट करुन राहीवासी वाटत व त्यामुळे ती सर्वांना आवडते.

ii] सहकार्य :

→ अक्षरा घरातील, बाहेरील, समाजातील, कुटुंबातील सर्वांना मदत करते.
→ अक्षरा माणसांना मदत करते पण ती प्राण्यांची मदत करते.

iii] पुढाकार :
ती सामाजिक कार्यात तर पुढाकार घेतेच पण ती कोणत्याही कार्यात सतत सहभागी होते खेळ, घरकाम, सामाजिक कार्य इ.

बालकाचा नैतिक विकास : सामाजिक परंपराशी सुसंगत राहणारे वर्तन म्हणजे नैतिक वर्तन होय. दुसऱ्या शब्दात समुहाचा आचार संहितेशी सुसंगत वर्तन म्हणजे नैतिक विकास होय. नैतिक मुल्य भौतिक विकासावर अवलंबुन असतात.
बालकांचा नैतिक विकास पुढीलप्रमाणे :

i] निती मुल्याचे ज्ञान ;

→ अक्षराला नितीमुल्याचे ज्ञान आजुन तेवढे प्राप्त झाले नाही.
→ तिचे प्रचार माध्यम, अनुचीत साहित्य कुसंगतीतुन अनैतिक वर्तन घडुन येत आहे.

ii] वक्तशीरपणा :

→ तिच्यामध्ये वक्तशीरपणा वाढत चालेला आहे.
→ वक्तशीरपणामुळे तिचा आत्मविश्वास वाढत आहे.
→ तिची आदर्शपुर्ण वर्तवणुक आहे.
→ ती वेळेवर सर्व कामे करते.

iii] स्वालंबन :
या वयात मुलांच्या मुलींच्या मानसिक विकास व शारीरिक विकास होतो. आपली स्वत:ची कामे त्यांने स्वत:च करावी वाटतात.
→ तिला तीच्या आवडी निवडीत पालकांचा सहवास नको वाटते.
→ पालकांचा नेहमी उपदेश आवडत नाही.
→ स्वत:च्या जिवनाचे तत्वज्ञान मांडते.

iv) स्वच्छता :
→ तिला अजुन तेवढी समज आलेली नाही.

→ तिच्या शरीरातील बदल व त्याविषयी स्वच्छता यामुळे ती गोंधळुन गेली आहे.
→ ती घरकाम स्वच्छ करते.

v) निटनिटकेपणा : सिर्चा आदर्शपणे वागवणुक आहे व तिच्यामध्ये निटनिटकेपणा आणण्याचा ती प्रयत्न करत आहे.

बालकासंबंधी प्रक्रिया : मुलामुलींचे बालपण संपुर्ण तारुण्य सुरु होईपर्यंतच्या काळ हा कुमारवस्था म्हणुन ओळखला जातो. वयात येत असताना मुला-मुलींच्या जिवनातील हा काळ त्यांच्या भावी जिवन-साठी अत्यंत महत्वाचा असतो.

1) या वयातील बालक मानसिक मनामिळावु असतात मैत्री करतात. गट करुन राहतात त्याचप्रमाणे अक्षरा हो मनामिळावु स्वभावाची आहे. ती मैत्रिणीसोबत इतरासोबत मनामिळावु राहते.
2) तिच्यात निरीक्षण क्षमता जास्त आहे. निटनिटकेपणा वक्तशीर

K] स्वतः चे मत :

कुमारवस्था म्हणजे मोठे होणे होय. परिपक्व मुलांचे (कुमारस्थे) पुर्ण (odalsence बाद झालेल्या प्रगल्भ तरुणात रुपांतर होणाऱ्या प्रक्रियेचा कालखंड होय. या काळात मुलामध्ये शारीरिक, बौद्धिक, मानसिक आणि समाजिक बदल होत असतात. या काळात सुरुवातीस शरीरातील अंतःस्त्रावमध्ये बदल होण्यास सुरुवात होते.

L] समारोप :

कुमारवस्था हा कालखंड मुला-मुलींच्या जिवनात झंझावताच्या अशांततेचा व संघर्षाचा कालखंड समजला जातो. हे वय संस्कारक्षम असल्यामुळे त्यांच्यावर योग्य ते संस्कार होणे गरजेचे आहे. कारण हा मुलामुलांची भावी जीवनासाठी अत्यंत महत्वाच्या आहे. या कालावधीत आलेल्या बदलाचे परिणाम कायमस्वरुपी असतात.

या प्रात्यक्षीकाद्वारे कुमारवस्था म्हणजे काय? ती कोणत्या वयात असते? हे कळले कुमारवस्थेत बालकामध्ये होणारे शारीरिक, मानसिक, भावनीक बदल व त्याचा विकास याबद्दल माहिती मिळाली.

समाप्त.

अध्ययनासाठीचे मूल्यांकन ~ पेज नं.

(Assessment for Learning

## प्रात्यक्षिक कार्याचा विषय

संविधान तक्ता, उत्तर सूचि गुण विभागणीच्या आधारे संपादणूक चाचणी तयार करणे.

seen

09/11/2022

प्रस्तावना –

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत बी.एड द्वितीय वर्ष अभ्यासक्रमात अध्ययनासाठीचे मुल्यांकन या विषयाच्या अंतर्गत घटक चाचणीच्या स्थुल आराखड्यानुसार संविधान तक्ता कसा तयार करायचा याचा सविस्तर आढावा घेतला आहे. सदर प्रात्यक्षिक कार्य करताना संपादणुक चाचणी तयार करतानाचे महत्वाच्या बाबी लक्षात आल्या.

आपण कोणतेही कार्य करण्यापुर्वी त्याची पुर्व तयारी, त्याचा पुर्व आराखडा असुनच कार्य करतो अगदी त्याच प्रमाणे एखादी संपादणुक चाचणी तयार करताना गुणविभागणी आराखडे, संविधान तक्ता, प्रश्नयुक्त नमुना उत्तर पत्रिका या सर्वांचा समावेश असतो.

गरज आवश्यकता —

सर्व सामान्यपणे शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचा घटक म्हणजे विद्यार्थी होय विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट्ये होय आणि हा विचार औपचारिक अवस्थमधुन सातत्याने शिक्षकाच्या सानिध्यात घडवुन येत असतो. हा विकास अध्ययन अध्यापन प्रक्रिया विविध अध्यापन अनुभव इ. मार्फत होत असतो.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमहत्वाचा विकास होत असताना वेळोवेळी मुल्यमापनाद्वारे त्यांच्या अध्ययनातील त्रुटी दुर सोडुन, त्यांची उत्तम प्रगती करण्यासाठी सातत्याने शिक्षकाकडुन शाळेमध्ये विविध मुल्यमापनाच्या साधनाचा अवलंब केला जातो यात संपादणुक चाचणीचे महत्व आपणास अधोरेखित करावे लागते.

# संपादणूक चाचणीचे नियोजन

## मराठी

### उद्दीष्टानुसार गुणविभागणी तक्ता.

| अ. क्र. | उद्दिष्ट्ये | गुण | शे. गुण |
|---|---|---|---|
| 01 | ज्ञान | 2 | 8 % |
| 02 | आकलन | 6 | 24 % |
| 03 | उपयोजन | 11 | 44 % |
| 04 | कौशल्य | 6 | 24 % |
| | एकुण | 25 | 100 % |

### * प्रश्नानुसार गुण विभागणी तक्ता

| अ. क्र. | प्रश्न प्रकार | गुण | शे. गुण. |
|---|---|---|---|
| 01 | दिर्घोत्तरी | 06 | 24 % |
| 02 | लघुत्तरी | 15 | 60 % |
| 03 | वस्तुनिष्ठ | 04 | 16 % |
| | एकुन | 25 | 100 % |

# उपघटकानुसार गुण विभागणी तक्ता

| अ. क्र. | उपघटक | गुण | शे. गुण |
|---|---|---|---|
| 01 | माय (कविता) | 02 | 8% |
| 02 | कवितेची पार्श्वभुमी | 02 | 8% |
| 03 | कवितेचे गाभा | 08 | 32% |
| 04 | कवितेचे रिक्त जागा | 07 | 28% |
| 05 | कवितेचे दिर्घ प्रश्न | 16 | 44% |
| | एकुन | 25 | 100% |

# संपादणूक चाचणी

## घटक चाचणी (प्रश्नपत्रिका)

विषय - मराठी  एकुण गुण - 25
वर्ग - 6 वा  वेळ - 35 मी

प्र1. रिकाम्या जागा भरा  5 गुण

① हंबरून वासराले —— जव्हा गाय.

② —— नसे वाटाण साथी हिंडे अनवाणी.

③ करू नको बाई मणे —— खाय

④ —— कुठं मोठा साहेब होणार नाय.

प्र2. एका वाक्यात उत्तरे द्या.  6 गुण.

① 'माय' कवितेचे कवी कोण आहेत?

② कवितेमध्ये कोणाचे वर्णन केले आहे?

③ गायीमध्ये कवीला कोण दिसतो?

प्र३. चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा ९ गुण.

① कवितेतील आईची अवस्था कशी आहे?

② कवी सुट्टीत घरी आल्याबरोबर आई त्याच्या साठी काय करत असते?

③ कवीच्या आईचे डोळे का भरून येतात?

प्र५. कवितेचा सार तुमच्या शब्दात लिहा? गुण-6

प्र.1 आर सुचि व गुणदान योजना - ४ गुण

1) चाटतो — ① गुण

② पायात — ①

③ पोटभर — ①

④ शिकुणशानी — ①

प्र.2 —? (एकुण गुण - 6 प्रत्येकी 2 गुण)

① माय कवितेचे कवी स.ग. पाचपोळ आहेत.

② कवितेमध्ये कविने त्याच्या आईचे वर्णन केले आहे.

③ आईमध्ये कविला त्याची माय म्हणजेच आई दिसत आहे.

प्र.3 —? (एकुण गुण ३ प्रत्येक ३ गुण)

① स.ग. पाचपोळ यांनी आपल्या आईचे वर्णन केले आहे या कवितेमध्ये आईची विकर आहे आई पायात घालवण्यासाठी चप्पल नाही.

ती अनवाणी पायाने जंगलाच्या काटक्या वेचण्यासाठी फिरत असते. पोटभर खाण्यासाठी अन्न मिळत नाही कवीचे वडील आईला सतत दारू पिऊन मारझोड करतात. अशी अवस्था आहे.

② कवी सुट्टीमध्ये घरी आल्यावर त्यांच्या आईला फार कौतुक वाटत असत आपला मुलगा शिक्षण घेत आहे. त्यांच्यासाठी चांगले अन्न खाऊ घालावे म्हणुन ती शेजारी पाजारी यांच्याकडुन उसन पासन आणुन खाऊ घालत असते.

③ कवीचे वडील त्यावेळेस त्यांच्या शिक्षणासाठी विरोध करतात त्यावेळेस आई म्हणते की असे वाईट सांगुन त्याचे अन्न घेऊ नये.

प्र५. —— ६ गुण.

स. गा. पाचपोळ यांनी आपल्या सायेचे कवितेत आपल्या आईचे वर्णन केले आहे आपल्या घरी अठरा विश्व दारिद्र्य असताना पण आपले आई आपल्यासाठी आपल्या शिक्षणासाठी जे प्रयत्न करते ते वर्णन केले आहे.

अनवाणी पायाने फिरुन जळणाऱ्या घेऊन त्या विकुन आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसे देतो फिरत असताना तीला कुणाचे पण भिती वाटत नाही घरात खाण्यासाठी अन्न मिळत नाही तरी पण तीची तरमळ खुप आहे की आपल्या मुलाने शिकुन मोठा साहेब व्हावा.

# इतिहास ना.

## उद्दीष्टानुसार गुण विभागणी तक्ता

| अ.क्र | उद्दीष्ट्ये | गुण | शे. गुण |
|---|---|---|---|
| 01 | ज्ञान | 05 | 20% |
| 02 | आकलन | 06 | 24% |
| 03 | उपयोजन | 10 | 40% |
| 04 | कौशल्य | 04 | 16% |
| | एकुण | 25 | 100% |

## प्रश्न प्रकारानुसार गुण विभागणी तक्ता

| अ.क्र. | प्रश्न प्रकार | गुण | शे. गुण |
|---|---|---|---|
| 01 | दिर्घोत्तरी | 06 | 24% |
| 02 | लघुत्तरी | 14 | 56% |
| 03 | वस्तुनिष्ठ | 5 | 20% |
| | एकुण | 25 | 100% |

उपघटकानुसार गुणविभागणी तक्ता :

| अ. क्र. | उपघटक | गुण | शे. गुण |
|---|---|---|---|
| 01 | भारताची संसद | 02 | 8 % |
| 02 | लोकसभा | 04 | 16 %. |
| 03 | राज्यसभा | 06 | 20 %. |
| 04 | संसदेचे कार्य | 05 | 12 %. |
| 05 | राज्यसभेचा सभापती | 03 | 16 %. |
| 06 | लोकसभेचे अध्यक्ष | 04 | 12 %. |
| 07 | मंत्रीमंडळ | 03 | |
| | एकुण | 25 | 100 %. |

# संकलित चाचणी

घटक चाचणी — प्रश्न पत्रिका

विषय - नागरिकशास्त्र — एकूण गुण - 25

वर्ग - 8 वी — वेळ - 35 मी

प्र1. योग्य जोड्या जुळवा

| | | | |
|---|---|---|---|
| ① | लोकसभा | अ | वरिष्ठ |
| ② | राज्यसभा | ब | कनिष्ठ |
| ③ | पंतप्रधान | क | 48 जागा |
| ④ | महाराष्ट्र लोकसभाजागा | ड | मंत्रिमंडळाचा नेता |
| ⑤ | संसद भवन | इ | नवी दिल्ली. |

प्र2. एकुन वाक्यात उत्तरे लिहा. 10 गुण.

① लोकसभा हे संसदेचे कोणते सभागृह आहे.

② लोकसभेच्या सदस्यांना या नावाने संबोधले जाते?

③ आपल्या देशात आपल्या संसदेला काय करण्याचा हक्क देण्यात आला आहे.

④ राज्यसभा हे संसदेचे कोणते सभागृह आहे?

⑤ लोकसभेची सदस्य संख्या किती आहे.

प्र३. रिकाम्या जागा भरा.

① भारताचे — हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात.

② राज्यसभेची एकुन सदस्यसंख्या — आहे.

③ लोकसभेची सदस्यसंख्या — आहे.

④ महाराष्ट्रात लोकसभेचे सदस्य — आहेत.

प्र ४. थोडक्यात उत्तरे द्या. 06 गुण

① लोकसभेचे सदस्य कसे निवडले जातात?

② लोकसभेच्या अध्यक्षाची कार्ये सांगा.

③ कायद्याची निर्मिती थोडक्यात स्पष्ट करा.

उत्तर सुची व गुणदान योजना.

1 1 — ब

2 2 — अ

3 3 - ड

4 4 — क
5 5 — इ

प्र2. — (एकुण - 10 गुण प्रत्येकी दोन) 10 गुण

① कनिष्ठ सभागृह आहे.
② लोकसभेच्या सदस्यांना खासदार या नावाने संबोधले जाते.
③ आपल्या देशात आपल्या संसदेला कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.
④ राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे.

प्र3. — प्रत्येकी एक गुण.

① उपराष्ट्रपती
② एकुन सदस्य संख्या - 250
③ 552
④ 48

प्र4. — प्रत्येकी (3 गुण)

① लोकसभेची सदस्य हे भौगोलिक मतदार संख्या निर्माण केले जातात व हे सदस्य येत जनतेतुन निवडले जातात

यांची मुदत पाच वर्षांसाठी असते सार्वत्रिक निवडणूक संस्था माध्यमातून हे सदस्य निवडले जातात.

② सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या बैठकीत अध्यक्षाची निवड होते सभागृहाचे कामकाज निपक्षपातीपणे पहाणे लोकसभेच्या सभासदाला, लोकप्रतिनिधी या नात्या हक्क देणे सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालवणे सभागृहाची प्रतिष्ठा राखणे कायद्याविषयी नियमांचा अर्थ लावणे व त्यानुसार हे चालवणे कार्य करावे लागतात.

③ संसदेचे दोन सभागृह म्हणजे एक राज्यसभा व दुसरे लोकसभा या दोन सभागृहामध्ये कायद्याची निर्मिती होते.

०७/११/२०२२

Bharat Shikshan Prasarak Mandal Latur's

# Jaikranti Sr. College Of Education (B.Ed.)

शैक्षणिक क्रांती म्हणजेच जयक्रांती !

ज्ञानमेव जयते

Sitaram Nagar, Latur-413 512 Ph. (02382) 256309

**Academic Year :** 2021-2022

**Practicum / Enhancing Professional Capacities / Practical Courses**

**Code & Subject :** BEDCC-303 BEDCC-304

Student Name : Gulbile priyanka Kalyan

Roll No. : 32

Class : **B.Ed. F.Y / S. Y.**

Semester : III$^{rd}$

भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित

# जयक्रांती अध्यापक महाविद्यालय

## (बी. एड्.)

सिताराम नगर, लातूर

२०    -२०

## प्रमाणपत्र

श्री / श्रीमती / कु. मुळबिले प्रियंका कल्याण

वर्ग Bed सत्र III ह. क्र.________ यांनी शैक्षणिक वर्ष 2022-23

मध्ये मुल्यमापनाची साधने स्पष्ट करा एका समुपदेश केंद्राला

समाधानकारक/चांगले/उत्तमरित्या पूर्ण केले.

करिता हे प्रमाणपत्र देण्यात येते.

दिनांक :

प्रभारी अधिव्याख्याता
________ विभाग

प्राचार्य
जयक्रांती अध्यापक
महाविद्यालय (बी.एड्.), लातूर

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. | विषय शिक्षक स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|
| | * मुल्यमापनाची साधने स्पष्ट करा. | | | |
| | एका समुपदेशन केंद्राला भेट देवुन | | [signature] 9-11-22 | |
| | अहवाल लिहीणे | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

* मुल्यमापनाचे साधने स्पष्ट करा

शिक्षकाचे अध्यापन किती प्रमाणात यशस्वी झाले, अभ्यासक्रम किती योग्य आहे, हे परिक्षेतुन समजते व त्यामधुन आढळुन आलेल्या उनिवा दुर करता येतात. त्यामुळे परिक्षाचे शिक्षणातुन समुळ उच्चाटन करणे अयोग्य आहे.

- शिक्षणाची जर सुधारणा करण्याची असेल तर परिक्षा पद्धतीतही सुधारणा करणे हेच योग्य आहे.
- इ.स 1948 मध्ये अमेरिकेत या तंत्राचा उदय झाला. डॉ. बेंजमीन ब्लूम हे मुल्यमापन तंत्राचे जनक होते.
- मुल्यमापन तंत्र हे केवळ परिक्षेचे तंत्र नसुन शिक्षण प्रक्रियेस गवसणी घालणारे तंत्र आहे.

मुल्यमापन प्रक्रीयेत पुढील तीन घटकाचा समावेश होतो.




अशा प्रकारे उद्दीष्टानुसार व दिलेल्या अनुभुतीनुसार मुल्यामापनाची साधने वापरली जातात. योग्य अनुभुतीद्वारे जी उद्दीष्टे साध्य करण्याचा प्रयत्न झालेला असतो ती खरोखरच साध्य झाली आहे का हे पाहण्यासाठी मुल्यमापनाची साधने.

★ मुल्यमापनाचे गुणात्मक साधने

(1) निरीक्षणात्मक

(2) आत्मनिरीक्षणात्मक

(3) अभिकाशात्मक

(4) समाजमिती

— तर आज आपण निरीक्षणात्मक साधनाचा विचार करणार आहोत.

★ निरीक्षणात्मक साधने ★

पडताळा श्रेणी — पर्दनिश्चित श्रेणी — प्रासंगिक श्रेणी

पर्दनिश्चित श्रेणी → आलेखात्मक, वर्णनात्मक

(1) पडताळा सुची :-

या साधनाच्या माध्यमाने विद्यार्थ्यांच्या ठिकाणी विशिष्ट गुणांच्या कौशल्याचा अथवा वृत्तीचा कितपत विकास झाला आहे ते पडताळा येते ज्या गुणाचे आपण करावयाचे त्या गुणाचे प्रयत्न करून त्याची विविध अंगे प्रथम निश्चिती ठरविली पाहिजे.

★ उपयोग :-

(1) वक्तृत्व, नाट्य, खेळ, गायन इ, विषयामध्ये जेथे कौशल्य अपेक्षित आहे तेथे पडताळा सुचीचा उपयोग करता येतो.

(२) विद्यार्थ्यांनी स्वतःचे मुल्यमापन स्वतः करावे या दृष्टीने पडताळा सुचिचा चांगला उपयोग होतो.

(३) पडताळा सुचिच्या सहाय्याने शाळेतील उत्कृष्ठ विद्यार्थ्यांची बक्षिसासाठी निवड करणे सुलभ ठरते.

★ मर्यादा :—

पडताळा सुचिच्या सहाय्याने एखाद्या गुणाचे किंवा कौशल्याचे अस्तित्व विद्यार्थ्यामध्ये आहे किंवा नाही एवढाच बोध होतो. एखादे कौशल्य विद्यार्थ्याच्या ठिकाणी असल्यास ते किती प्रमाणात आहे याचा बोध होत नाही.

(२) पदनिश्चयन श्रेणी :—

- एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या गुणाचे मुल्यमापन करण्यासाठी या साधनाचा वापर केला जातो.
- आपल्या हाताखाली काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये आत्मविश्वास, धडाडी, कल्पकता, सहकार्याची वृत्ती, भावनात्मक समतोल इ. गुण आहेत / नाहीत, हे पाहुन त्या शिक्षकाचे मुल्यमापन मुख्याध्यापक नेहमी करत असतो. अशा पदनिश्चयन श्रेणीचे दोन प्रकार पडतात.

① आलेखात्मक पदनिश्चयन श्रेणी :-
हा विद्यार्थी चर्चेमध्ये किती प्रमाणात भाग घेतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| काहीही नाही | क्वचित | कधि-कधी | बरेच वेळा | नेहमी |

अशा तऱ्हेने श्रेणी दर्शविणारा आलेख करायचा त्यावर विद्यार्थ्याचे स्थान दाखवायचे.

② वर्णनात्मक पदनिश्चयन श्रेणी :-
विद्यार्थ्याचे स्थान नेहमी निश्चित करण्यासाठी नेहमी कधी-कधी क्वचित असे संदीग्ध शब्द न वापरता वर्णनात्मक शब्द योजना केली जाते.

हा विद्यार्थी चर्चेमध्ये किती प्रमाणात भाग घेतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इतरापेक्षा जास्त भाग घेतो | घेत नाही केवळ ऐकतो | मुद्दाम सांगितले तरच भाग घेतो | इतराइतकाच भाग घेतो. | बऱ्याच वेळा भाग घेतो. |

★ उपयोग :-
① विद्यार्थ्यांच्या काम करण्याच्या पद्धतीचे मुल्यमापन पदनिश्चयन श्रेणीने करता येते.

② काही वेळेला विद्यार्थ्यांना तयार केलेल्या वस्तुची श्रेणी ठरवुन मुल्यमापन करता येते.

★ पदनिश्चयन श्रेणी वापरताना घ्यावयाची काळजी :-

(1) एखाद्या विद्यार्थ्याबद्दल पुर्वग्रह असेल तर त्याचे योग्य स्थान शिक्षक दाखवणार नाही.

(2) निरीक्षण करणाऱ्याला निरीक्षणाची पुरेशी संधी मिळाली नसेल तर त्या वरीष्ठ बाबतीत त्याने मात्र व्यक्त करु नये.

(3) ज्या गुणांची श्रेणी ठरवायची असेल त्या गुणाचा निश्चित अर्थ शिक्षकांना सांगितला पाहिजे.

(4) निरनिराळ्या शिक्षकांना विद्यार्थ्यांना दिलेल्या श्रेणीचे संकलन करावे म्हणुन ते विश्वसनीय ठरते.

(2) प्रासंगिक नोंदी :-

- शाळेतील नोंदी नित्याचे कार्यक्रम चालु असताना विद्यार्थ्यांच्या वागणुकीतील वैशिष्ट्ये शिक्षकाला दिसु शकतात, मात्र ती दृष्टी शिक्षकाजवळ पाहिजे अशा प्रासंगिक घटना विद्यार्थ्यांच्या स्वभावावर प्रकाश टाकतात.

★ उदा :-

विद्यार्थी - संजय स्थळ - शाळेचे मैदान

इयत्ता - 9वी दि - 21-01-21

* प्रासंगिक नोंद :-

आज मैदानावर दोन वर्गाची मॅच चालु असताना भांडण्याचा प्रसंग आला त्यावेळी संजयने आपल्या वर्गाची समजुत घालुन भांडण्याचा प्रसंग टाळण्याचा प्रयत्न केला. मॅचमध्ये शेवटी संजयच्या वर्गाला जय मिळाला.

* शिक्षकाचे भाष्य :-

कठीण प्रसंग आला असताना आपल्या वर्गाचे नेतृत्व करणे मुलाच्या वर्तनाला योग्य ते वळण संजय घेवु शकतो. त्याच्या मनाला इतर मुले ही मान देतात.

* उपयोग :-

① नैसर्गिक घटनाद्वारे विद्यार्थ्याच्या वर्तनाबद्दल माहिती मिळते. इतर साधनांची मिळालेल्या माहितीची सत्यसत्यता अशा नोंदीमुळे पाहता येते.

② व्यक्तीची उन्नती व कृती यामध्ये जर तफावत असेल तर अशा प्रासंगिक नोंदीचा उपयोग होतो.

③ अगदी लहान मुलाच्या बाबतीत या नोंदी फार उपयुक्त ठरतात.

* मर्यादा

(१) या साधनाचा उपयोग करण्यामध्ये शिक्षकांचा बराच वेळ जातो.

(२) या नोंदीमध्ये व्यक्ती निष्ठता येण्याची शक्यता जास्त असते ज्या विद्यार्थ्यांबद्दल शिक्षकाचे अनुकूल मत आहे. अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत चांगले प्रसंगच तेवढे ठेवले जात तर चांगले मत आहे.

(३) विद्यार्थ्यांचे वर्णन प्रसंगानुसार निरनिराळे असु शकते त्यामुळे निष्कर्ष काढण्यापुर्वी अनेक प्रसंग वर्णन पाहणे आवश्यक आहे.

(२) आत्मनिरीक्षणात्मक साधने :-

शिक्षकाने निरीक्षण करुन विद्यार्थ्यांबद्दल ती माहिती गोळा केला असेल तर त्या माहितीमध्ये विद्यार्थ्यांचे प्रतिबिंब पुर्णपणे उमटू शकत नाही. विद्यार्थ्यांचे स्वत: बद्दलचे विचार त्याला निरनिराळ्या प्रसंगी काय वाटते, त्याला कोणाबरोबर खेळावयाला आवडते इ. माहिती विद्यार्थी स्वत: चांगल्या प्रकारे देवू शकेल या गटातील प्रमुख साधनांचा विचार करा.

## * आत्मनिरीक्षणात्मक साधने

- मुलाखत
- प्रश्नावली
  - अभिरुची प्रश्नावली
  - व्यक्तिमत्व प्रश्नावली
- समस्या-सुची

## * ① मुलाखत —

- ① एखाद्या व्यक्तिबद्दल माहिती मिळवण्याचा प्रकार म्हणजे मुलाखत.
- ② समोरा समोर बसुन केलेले संभाषण म्हणजे मुलाखत होय.
- ③ मुलाखती मध्ये विद्यार्थ्यांच्या मत स्वतः बद्दलचे माहिती जाणुन घेण्यासाठी त्यांना प्रश्न विचारुन उत्तर देण्यास प्रवृत्त केले जाते.
- ④ मुलाखती द्वारे विद्यार्थ्यांना जाणुन घेतले जाते, तसेच विद्यार्थ्यांची मते त्यांचे विचार दृष्टीकोन इ. जाणुन घेण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य प्रकारच्या वातावरणाची निर्मिती करुन प्रश्न विचारतात यालाच मुलाखत म्हणतात.




* मुलाखतीचे गुण :-

1) मुलाखतीतील गरजेनुसार प्रश्नाचे योग्य उत्तर काढण्यासाठी वापर करता येतो.

2) विद्यार्थ्यांना नेमक्या कोणत्या अडचणी आहेत याचा बोध होतो.

3) मुलाखती द्वारे विद्यार्थ्यामधील गुणदोष, वर्तन विशेष वैशिष्ट्ये समजुन घेतात.

4) विद्यार्थ्याचे हावभाव त्याचे बोलणे याचे निरीक्षण करता येते

5) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मुलाखतीचा उपयोग होतो.

* मुलाखतीचे दोष

- (१) एकाच वेळी एकाचीच मुलाखत घ्यावी लागते त्यामुळे वेळ बराच लागतो.

- (२) मुलाखत घेणाऱ्याच्या व्यक्ती निष्ठेचा परिणाम होतो.

- (३) विद्यार्थ्यांना खरी उत्तरे दिली नाही तर मुलाखतीचा उद्देश साध्य होत नाही.

* प्रश्नावली.

- (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेवुन त्यानुसार प्रश्नावली तयार करावी.

- (२) प्रश्नावलीमध्ये अनेक प्रश्नांचा उपयोग असतो.

- (३) प्रश्नावली ही छापील स्वरूपात असणे आणि त्यातील प्रश्नाची उत्तरेही लिखित स्वरूपात घेतली जाते.

- (४) मुलाखतीद्वारे संख्यात्मक आणि गुणात्मक अशी दोन्ही प्रकारची माहिती गोळा करता येते.

## प्रश्नावलीचे प्रकार

अभिरुची प्रश्नावली — व्यक्तिमत्व प्रश्नावली.

- (1) अभिरुची प्रश्नावली

- विद्यार्थ्यांना कोणत्या विषयात गोडी आहे त्याला कोणता छंद आहे तो आपल्या रिकामा वेळ कसा घालविता या संबंधीचा माहीती अशा प्रश्नावरील मिळते.

- अभिरुची प्रश्नावली वापरताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, प्राथमिक व माध्यमिक शाळातील मुलांची अभिरुची परिस्थितीनुसार बदलत असते त्यामुळे या प्रश्नावली-वरुन दुरगामी स्वरुपाचे निष्कर्ष काढु नयेत.

- (2) व्यक्तीमत्वाच्या प्रश्नावली :—

- व्यक्ती स्वभाव वैशिष्ट्ये जाणुन घेण्याकरिता या प्रश्नावलीचा उपयोग केला जातो. निरनिराळे प्रसंग दर्शवि-णारी विधाने केली जावुन त्या विधान बद्दलची आपली प्रतिक्रिया व्यक्त करावयाची असते.

- विद्यार्थ्यांचे स्वभावदोष त्यांच्या घरचे वातावरण त्याची प्रकृती समाजात मिसळण्यासाठी त्याची क्षमता स्वभावातील समतोल इ. गोष्टी समजण्यासाठी अशा प्रश्नावलीचा उपयोग होतो.

* प्रश्नावलीचे गुण

1. विद्यार्थ्यांची समायोजन क्षमता प्रश्नाद्वारे शोधता येते.
2. विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्त्वाची गुणवैशिष्ट्ये समजतात.
3. प्रश्नावलीद्वारे विद्यार्थ्यांची अभिरुची जाणून घेतली जाते.
4. शैक्षणिक संशोधनासाठी प्रश्नावली उपयोगी पडते.

* प्रश्नावलीचे दोष :

1. प्रश्नांची मालिका तयार करणे कठीण काम आहे.
2. प्रश्नांची उत्तरे विद्यार्थी खरे देतीलच असे नाही.
3. चुकीच्या उत्तरावरून निष्कर्ष काढता येत नाही.
4. प्रश्न संदिग्ध असतील तर त्याचे योग्य उत्तर येत नाही.

(3) समस्या सुची -

. विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्या अडचणी येतात त्यामुळे त्यांच्या अडचण निर्माण होते. हा अडसुर दुर करावयाचा असेल तर विद्यार्थ्यांच्या अडचणी प्रथम समजल्या पाहिजेत. समस्या सुची हा प्रश्नावलीचाच एक प्रकार आहे.

* उपयोग :-

- समस्या सुचीच्या साहाय्याने कोणत्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, हे ठरविता येते.

- वर्गातील सर्व मुलांच्या काही समान अडचणी असतील तर मार्गदर्शन करण्यासाठी त्याचा उपयोग होतो.

- अभ्यासक्रम शाळेतील निरनिराळे उपक्रम विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या सवयी वर्गातील अध्यापन या सर्वांचा सुधारणेच्या दृष्टीने फेरविचार करण्यास या सुची मदत करतात.

- अशा सुचीमुळे विद्यार्थ्यांच्या निश्चित अडचणी कोणत्या आहेत त्याचा उपयोग होतो.

- ज्या विद्यार्थ्यांना समायोजना करण्यात अडचणी येतात, त्यांना मदत करता येईल.

★ प्रश्नावलीच्या मर्यादा

(1) स्वत: बद्दल चांगले मत व्हावे म्हणुन व्यक्ती चुकीची उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो.

(2) काही संज्ञाचा अर्थ निश्चित करणे. उत्तरे लिहीणाऱ्या व्यक्तींना कळत नाही.

(3) प्रश्नामध्ये वारंवार नेहमी कधि-कधी असे शब्द येतात त्यांना अर्थ निरनिराळ्या व्यक्ती भिन्न तऱ्हेने लावतात.

★ अविष्कारात्मक साधने

- मुले काही वेळा आत्म-निरीक्षण करून आपली माहीती व्यवस्थित देवु शकत नाहीत अगदी लहान मुलांच्या बाबतीत आत्मनिरिक्षणात्मक साधने कारणे उपयुक्त ठरत नाहीत. अशा वेळी अविष्कार या तंत्राचा उपयोग होतो.

- निरनिराळ्या प्रसंगी विद्यार्थी कसा वागतो काय बोलतो, काय लिहीतो यावरून त्याचा व्यक्तीमत्वाची ओळख होवु शकेल.

- पडद्यावर असे चित्र उमटले तसे विद्यार्थ्यांच्या लेखन त्याने काढलेले चित्र लिहीलेली कविता यामध्ये त्याच्या आशा-आकांक्षा प्रक्षेपित होतात.

अविष्कारात्मक साधने.

नंदीनी | वाक्यपुर्ती | गोष्टी पुर्ण करणे | बाहुल्यांचा खेळ | चित्र काढणे.

- ① वाक्यपुर्ती :-
काही अपुर्ण वाक्य देवुन विद्यार्थ्याला ती पुर्ण करावयाला सांगतो तो वाक्यपुर्ती कशा प्रकारे करतो हे पाहुन त्यांच्या मनातील खळबळ विचार संघर्ष इच्छा बोध होतो.

उदा :- ① माझे आईवडील खुप ......
② माझी शाळा ......

- ② गोष्टी पुर्ण करणे :-
ज्याच्या गोष्टीमध्ये निरनिराळ्या व्यक्तीचे चित्रण असते अशी गोष्ट अर्धवट सांगुन त्या गोष्टीतील पात्रे कशी बनली असतील ते विद्यार्थ्यांना सांगण्याचे व गोष्ट पुर्ण करावयाची गोष्ट पुर्ण करताना बहुदा आपल्या जीवनातील प्रसंग डोळ्यासमो आणुन गोष्टीतील घटकांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न त्या व्यक्तीकडुन केला जातो.

उदा :- वासंती परिक्षेत नापास झाली होती. तिचे वडील तिला खुप टाकुन बोलले.

- वासंती त्या दिवशी सायंकाळी नेवली नाही, तिच्या आईने तिची समजुत घालण्याचा प्रयत्न केला.

③ बाहुल्यांचा खेळ :-

- मुलाला काही बाहुल्या व इतर साहित्य देवुन त्यामधुन एखादी गोष्टी रंग, मंचावर चित्रीत करावयाला सांगतात त्या बाहुल्या म्हणजे आपल्या घरातील निरनिराळ्या व्यक्ती आहेत. असे समजुन मुले बहुतेक वेळ कथानक तयार करतात.

④ चित्र काढणे :-

— चित्रकला प्रदर्शनातील चित्रे पाहिल्यावर काही चित्रांचा आपल्याला चटकन बोध होतो, तर काही चित्रांचा अलबाड होत नाही. चित्रकाराला विचारले तर तो त्याचा अर्थ सांगु शकतो.

⑤ दैनंदिनी :-

- मुलांना जर दैनंदिनी लिहावयाला सांगितले तर त्या दैनंदिनीमध्ये मुलाच्या मनातील विचार उमटलेले दिसतील. दैनंदिनीमध्ये केवळ रोजचा दिनक्रम लिहु नये काही विशेष कार्यक्रम यातील घटना लिहाव्या.

* आविष्कार तंत्राचे फायदे :—

(1) आविष्कार तंत्रामध्ये जी साधने आपण पाहिली त्यामध्ये काहीना काही नाविन्य आहे. व्यक्तीकडुन ठराविक साच्याचे उत्तर यामध्ये अपेक्षित नाही.

(2) या साधनांचा उपयोग करण्याकरिता केल्या जात आहे याची निश्चित कल्पना विद्यार्थ्याला नसते. व्यक्तीच्या समस्या तिची विविधता या संबंधी प्रत्यक्ष स्वरूपाचे प्रश्न विचारले जात नाहीत, त्यामुळे उत्तर देताना कोणतेही दडपण राहत नाही. व्यक्तीच्या कल्पना विकासाला भरपूर वाव मिळतो.

(3) यापैकी बहुतेक साधनामध्ये विद्यार्थ्यांच्या भाषेवर प्रभुत्व नसले तरी चालते.

(4) विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब पहावयाला मिळते. एखाद्या व्यक्तीचे केवळ आरशातील प्रतिबिंब पहावयाला मिळते. व त्यावरुन आपणाला कल्पना येऊ शकते. एखादी व्यक्ती न पाहता ही वरील साधनांच्या द्वारे या व्यक्तीचे प्रतिबिंब पहावयाला मिळते.

## अविष्कार तंत्राचे तोटे.

(1) या साधनांपैकी बरीचशी साधने ज्ञानकाशनाच वापरता येतील. वाक्यपुर्ती दैनंदिनी गोष्ट पुर्ण करणे यासारखी साधने शिकायलाही वापरता येतील.

(2) या साधनांचा वापर करण्यात जास्त वेळ लागतो.

(4) समाजातील तंत्रे :–

विद्यार्थी ज्या गटामध्ये वावरतो त्या गटाची काही वर्तन मुल्य असतात.

या गटामध्ये प्रत्येक मुल्य आपली भुमिका ठरवीत असते. या गटामध्ये प्रत्येक मुलाचे स्थान कोणते आहे, याची कल्पना बाहेरुन निरीक्षण करणाऱ्या या शिक्षकाला येणार नाही. मुलांकडे पाहत असताना शिक्षकाचा दृष्टीकोन हा प्रौढ दृष्टीकोन नसतो म्हणुन मुल्यमापनामध्ये एकमेकांबद्दलचा दृष्टीकोन समजुन घेणे आवश्यक असते.

## समाजमिती तंत्रे

ओळखा कोण — नामनिर्देशित तंत्रे

① **ओळखा कोण** –

या तंत्रामध्ये काही विधाने दिली असतात वर्गातील मुलाला लागु पडेल असे वर्णन प्रत्येक विधानामध्ये केलेले असते या वर्णनाप्रमाणे जी मुले असतील त्यांचे नाव त्या विधानांपुढे लिहावयाची असतात.

② **नामनिर्देशित तंत्रे** –

– एखाद्या विद्यार्थ्या-बद्दल त्याच्या मित्रांना काय वाटते ते 'ओळखा कोण' या तंत्राच्या साहाय्याने समजु शकते पण एखाद्या वर्गात भिन्न गट निर्माण झालेले असतात त्या गटांचे नेतृत्व काही मुले करताना दिसतात.

उदा ; – मला पुढील मुलाबरोबर काम करायला आवडेल,

① ....... ② ....... ③ ..... ④ ......

Seen
9-11-22

# जयक्रांती अध्यापक महाविद्यालय लातूर

* मार्गदर्शक आणि समुपदेशन

* नाव :- गुळबिले प्रियंका कल्याण

* मार्गदर्शक :- प्रा. शरद पौडे सर

* समुपदेशन केंद्राला भेट देऊन त्याचा अहवाल तयार करा.

III rd Sem.

* प्रात्यक्षिक कार्य *

BEDCC - 304

# अनुक्रमाणिका


| अ.क्र | घटकाचे नाव | पेज क्र |
|---|---|---|
| (1) | प्रस्तावना | 1 |
| (2) | समुपदेशन केंद्राची वैशिष्ट्ये | 2 |
| (3) | समुपदेशन केंद्राचे महत्त्व | 4 |
| (4) | समुपदेशन केंद्राची निवड | |
| (5) | समुपदेशन केंद्राची कार्यकारी पद्धत | 5 |
| (6) | समुपदेशन केंद्रात केलेल्या कार्याचा समाजासाठी फायदा | 6 |
| (7) | निवडलेल्या समुपदेशन केंद्राने केलेल्या प्रकल्पाचे प्रश्न | 7 |
| (8) | समुपदेशन केंद्रातील सदस्यांसाठी प्रश्नावली | 8 |
| (9) | समुपदेशन केंद्राकडुन मिळालेली शिकवण | 15 |
| (10) | समारोप | 16 |

★ प्रस्तावना :-

जीवनातील व्यक्तीला अनेक छोट्या मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते या समस्यातुन मार्ग काढताना जेव्हा व्यक्ती स्वतःच्या समस्येविषयी योग्य निर्णय घेवु शकत नाही, तेव्हा त्या व्यक्तीच्या तिची बद्दल स्थाने कमतरता याची जाणीव करुन देण्यासाठी समुपदेशनाची आवश्यकता असते.

- समुपदेश म्हणजे समुपदेशक व समुपदेश्य यांच्यातील आंतरक्रियातुन निर्माण होणारे तात्पुरत्या अवस्थेतील नातेसंबंध होय.

गोंधळलेल्या स्थितीत किंवा ताणतणावावर मात करुन व्यक्तीने स्वतःचे निर्णय घ्यावेत यासाठी समुपदेशातुन सहकार्य केले जाते.

- समुपदेशन म्हणजे लाभार्थीची समस्या सोडविण्यासाठी समुपदेशक व लाभार्थी या दोघांमध्ये मैत्रीपुर्ण वातावरण व सामंजस्याने होणारे हेतुपुर्वक संभाषण होय.

- समुपदेशन ही एक मानसशास्त्रीय प्रक्रिया असुन त्याचा लाभार्थी आणि समुपदेशक या दोघांच्याही मानसिकतेवर तो स्वतः च्या समस्या सोडवण्यास समर्थ होतो.

## समुपदेशन केंद्राची वैशिष्ट्ये

(1) समाजाचा विकास साधण्यासाठी सहकार्य मिळते, केंद्राने समाजाचे प्रश्न सुटतात, त्यामुळे समाजातील विविध घटकांचा विकास साधण्यास मदत होते.

(2) वेगवेगळ्या कल्पना उदयास येतात.
- समुपदेशन केंद्राने विविध समस्यांना जवळुन पाहण्याचा अनुभव मिळतो आणि या अनुभवातुन समस्यांचे उपाय शोधण्यासाठी विविध कल्पनांचा विकास होतो.

(3) समाजापुढे एक नवीन संदेश निर्माण करता येतो समाजाचे घटक आहेत या समाजासाठी आपलेही देणे आहे. समुपदेशन केंद्राच्या माध्यमातुन असे संदेश देता येतात.

(4) समुपदेशन केंद्र म्हणजे जीवनदानाचे अनमोल दान.
- नेत्रदान व्यसनमुक्ती असे अनेक कार्यक्रम समुपदेशक संस्थेच्या मार्फत राबविले जातात आणि यापुढे समाजातील व्यक्तींना जीवनदान मिळते.

(5) समुपदेशन केंद्र म्हणजे माणुसकीचे मंदिर समुपदेशन केंद्राच्या विविध कार्यक्रमातुन माणुसकीचे धडे मिळतात यापुढे समुपदेशन केंद्र हे माणुसकीचे मंदिर म्हणता येईल.

⑥ प्रेम, आदर वाढविण्याचे प्रतिक म्हणजे समुपदेशन केंद्र
- समुपदेशन केंद्रात केलेल्या वेगवेगळ्या उपक्रमापुढे समाजातील लोकांबद्दल प्रेम-आदर आपुलकी वाढते, तसेच एकमेकां-बद्दल सद्भावना निर्माण होते.

⑦ - एकोपा वाढवण्याचे मंत्र म्हणजे समुपदेशन केंद्र
- समुपदेशन केंद्रात जात, धर्म, पंत, या गोष्टीपेक्षा सेवा देणे हाच प्राथमिक मंत्र होय.

★ समुपदेशन केंद्राचे महत्त्व

1. समुपदेशन केंद्राने समाजासाठी सत्कार्य करण्यास मदत होते.
2. समाज सेवेसाठी पुढाकार घेता येतो.
3. आपल्या कल्पनांना नवीन प्रेरणा मिळते.
4. दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करता येते.

समुपदेशनातील सुक्ष्म कौशल्य.

1. तदनुभुती
2. ऐकणे
3. माहिती देणे
4. प्रश्न विचारणे
5. सुचविणे
6. काढुन देणे, बोलते करणे
7. आठवण देणे
8. पुढे नेणे

★ समुपदेशन प्रक्रिया

- लाभार्थ्यांच्या समस्येनुसार आणि त्याच्या व्यक्तिमत्वा-नुसार प्रत्येक टप्प्यातील तपशील बदलेल पण या टप्प्याचा ठरलेला क्रम बदलणार नाही.

- (1) पहिला टप्पा -

- लाभार्थीशी संबंध प्रस्थापित करणे लाभार्थ्याला ओळखणे त्याना समस्या विचारणे.

- (2) दुसरा टप्पा -

- समस्येचे निदान व विश्लेषण करणे समस्या समजुन घेवुन त्या समस्येचे उपाय शोधणे.

- (3) तिसरा टप्पा -

- लाभार्थीत योग्य तो बदल करणे लाभार्थ्यांना काय हवे? लाभार्थ्यांना कशाची गरज आहे. याची पुर्तता करणे.

समुपदेशन प्रक्रियेतील नितीमुल्य

↓

गुप्तता

↓

लाभार्थित भेदाभेद न करणे

↓

कायमस्वरुपी मत न बनवणे

↓

नैतिकतेच्या बंधनाचे पालन करणे

↓

नोंदी ठेवणे.

मी निवडलेले समुपदेशन केंद्र

* रोटरी क्लब लातुर - (Dist + 3152 / Club -15520)

रोटरी क्लबचा इतिहास.

- 15 सप्टें 1970 साली या रोटरी क्लबची स्थापना झाली. प्रथम चार्टर प्रेसिडेन्ट हे स्वतः रा. श्री नारायण लालाजी लाहोटी हे होते.
या क्लबसाठी सर्वप्रथम औरंगाबादचे रा. म्हेत्रे यांनी स्पॉन्सर केले. रोटरी क्लब हे तीन व्यक्ति मत्वानी संपन्न आहे.

प्रथम - DG, P.D.G, Rtn विनयभाऊ राठी
द्वितीय - late P.D.G, Rtn डॉ. शिवदास मोयले
तृतीय - P.D.G, Rtn हरिप्रसाद सोमाली.

रोटरी क्लब लातुर यानी सहा क्लब बनवले आहेत
ते पुढीलप्रमाणे -

- ① उदगीर
- ② बीड
- ③ परळी
- ④ कळंब
- ⑤ लातुर बिड टाऊन
- ⑥ रॉट्रॅक्ट क्लब.

① रोटरी क्लबची वैशिष्ट्ये -
- सर्व क्षेत्रामध्ये कार्य केले जाते.
रोटरी क्लब असा क्लब आहे जेथे सामाजिक, पर्यावरण, शैक्षणिक, आरोग्य, या सर्व क्षेत्रामध्ये उपक्रम केले जातात.

② - दरवर्षी कार्याचा आढावा घेतला जातो.
- दरवर्षी वेगवेगळ्या सदस्य कार्यकारी मंडळ अध्यक्ष उपाध्यक्ष असतात.

③ सर्वजण एकोप्याने कार्य करतात.
- रोटरी क्लब मध्ये सर्वजाती धर्मांचे व्यक्ती एकत्र येवुन एकोप्याने कार्य करतात.

④ प्रकल्प समाजाच्या उपयोगाचे तसेच नव्या पिढीला प्रेरणा देणारे असतात.
- रोटरी क्लबमध्ये वेगवेगळे प्रकल्प वेगवेगळ्या कल्पनेने राबवले जातात.

⑤ प्रकल्पात नाविन्य पद्धतीने कार्य केले जाते.
रोटरी क्लबचे व्यवस्थापन छान असते. त्यामुळे प्रत्येक उपक्रमात नाविन्यता असते.

* रोटरी क्लब लातुर (Rotary club latur)

Bord of Directors (2020-21)

- रोटरी क्लबची कार्यकारी पद्धती जाणुन घेण्यासाठी रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष यांची मुलाखत मी घेतली.

माजी अध्यक्षाचे नाव - Rtn purushottam Kalia.

विविध अध्यक्ष कार्यक्रमाची आखणी करतात या सचिवाकडे व्यवस्थापनासाठी देतात.

★ माजी अध्यक्षांची कार्यकारी सदस्यांची ओळख.

(1) Rtn Rajgopal Rathi (Secretory)

सचिव सर्व प्रकल्पाचे व्यवस्थापनाचे कामकाज पाहतात.

(2) Rtn Ramnias Dhoot (Club trainer)

- क्लब ट्रेनर प्रकल्पासाठी मार्गदर्शन करतात.

(3) Rtn suresh penslewar (Indicate past president)

- अनुभवानुसार ते IPP क्लब ला मार्गदर्शन करतात.

(4) Rtn ADX Balwant deshpande (president elect)

- हे पुढचे प्रेसिडेंट असतात यासाठी हे कामाचा अनुभव व्यवस्थापनाचा आढावा घेतात.

(5) jt secretory Rtn Naik jodhawan.

- सचिवांना सहकार्य करतात.

(6) Treasure - Rtn Mahesh roshniwal C.A

- आर्थिक खर्च मोजमाप.

(7) Sergent at arms - Rtn Ramprasad Rathi

- रोटरी क्लबच्या साहित्याचा हे सांभाळ करतात.

(8) Club administration - Rtn pintu shah.

- प्रकल्पाची अंमलबजावणी होते की नाही याची माहिती ठेवतात, देखरेख करतात.

(9) Membership development - Rtn Shrikant Karwa

- रोटरी संस्थेत जास्तीत जास्त सदस्यांचा सहभाग.

(10) Community development. editor Rtn - pro gopal Rathi

- चालु वर्षाचे मासिक काढण्यास सहकार्य करतात.

रोटरी क्लबमध्ये होणाऱ्या प्रकल्पांच्या समाजासाठी फायदा :-

- youth service - Rtn Kirankumar Kalkar.
- युवकांच्या विकासासाठी प्रकल्प राबविले जातात.

TRF - Sangmeshwar Barne
- आर्थिक सहकार्य सर्वांनी वाढवावे यासाठी प्रेरित करतात.

public image - Rtn Sudhakar Kargirer
- संस्थेची प्रकल्प समाजात प्रभावी असावी यासाठी प्रयत्न करतात.

litercy - Rtn Brahkumar Swarnkumar
- शैक्षणिक दृष्ट्या युवा प्रौढ साक्षर व्हावी यासाठी प्रयत्न करतात.

रोटरी क्लबच्या प्रकल्पाचे व्यवस्थापन

↓

प्रकल्प समाजाची समस्या निवडतात.

↓

त्या समस्येवर कार्य करतात (प्रकल्प)

↓

प्रकल्पासाठी आर्थिक खर्च ठरवतात.

↓

अध्यक्षाकडुन आणि सचिवामार्फत कार्य वाटप.

↓

कार्यवाटप नंतर जागदिवस ठरवणे.

↓

विशिष्ट वेळेनुसार दिवसानुसार सदस्य एकत्र.

↓

प्रकल्पाची प्रत्यक्षरित्या अंमलबजावणी करणे.

↓

वर्षभराच्या प्रत्यक्षरित्या अंमलबजावणी करतात
- एका मासिकात वर्तमान पत्रात ठेवतात, सर्व जनतेपर्यंत पोह्चतात.

★ रोटरी क्लबचे प्रकल्प

① रोटरी क्लबतर्फे वृक्षारोपन :-
- रोटरी क्लबच्या वतीने अवनी राधाकृष्ण गौशाळा व आदर्श कॉलनीत रोटरीच्या पदाधिकाऱ्यांनी वृक्षारोपन केले.

② पोलिओ रॅली -
- 24 ऑक्टोबर 2020 रोजी रोटरी इंटरनॅशनल महत्वाकांक्षी पोलिओ निर्मुलन संदर्भात end polio Now या थीमखाली लातुर येथे पोलिओ रॅली काढण्यात आली.

③ मोफत अन्नसेवा उपक्रम :-
- लातुर शासकीय रुग्णालयात येणारा रुग्ण हा सर्वसामान्य कुटुंबातील असतो, त्यात ग्रामीण भागातील रुग्ण अधिक असतात. या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी रोटरी क्लबच्या वतीने मोफत अन्नसेवा उपक्रम राबविला.

④ सफाई कर्मचारी भगिनींना साडी-चोळी वाटप :-
- 9 नोव्हें 2021 रोजी दिपावली सणानंतर मा. - प्रांतपाल विष्णु मोंढे यांच्या संकल्पने नुसार त्यांनी महानगर-पालिका अंतर्गत सफाई भगिनींना वाटप.

⑤ झेंडावंदन कार्यक्रम व खाऊचे वाटप :-
26 जाने क्लबच्या जागेमध्ये सकाळी 9 वाजता प्रजासत्ताक दिनानिमित्त झेंडावंदन संपन्न झाले ज्यामध्ये रोटरी क्लबच्या सदस्यांचा सहभाग तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

⑥ चार्टर डे साजरा :-

- ३० सप्टें २०२० रोजी भालचंद्र ब्लड बँक येथे चार्टर डे साजरा करण्यात आला. या प्रसंगी दल शिक्षक शिक्षकांना आमदारांच्या हस्ते National Builder Award प्रदान केला.

★ रोटरी क्लब या समुपदेशन केंद्राकडून मला मिळालेली शिकवण.

(1) समाजासाठी सत्कार्याची भावना ठेवणे.
रोटरी संस्थेच्या प्रकल्पाना राहुन मला अशी शिकवण मिळते की आपल्या जीवनात काहीतरी सत्कार्य समाजासाठी करावे,

(2) एकोप्याने कार्य करणे :-
रोटरी क्लबमध्ये विविध पदे आहेत, परंतु सर्वजण एकोप्याने कार्य करतात.

(3) नि:स्वार्थ भावनेने कार्य करणे.
रोटरी क्लब निस्वार्थ भावनेने सेवाभाव करत असतो, आणि हाच सेवाभाव मला खूप आवडला.

(4) केलेल्या कामासाठी संस्थेच्या सदस्यांना प्रोत्साहन देणे.
जे कार्य सर्वजण मिळुन करतात त्यासाठी सर्वांची प्रशंसा म्हणुन बक्षिस देतात.

(5) समाजातील सर्व क्षेत्रामध्ये कार्य करणे.

(6) व्यवस्थापन योग्य ठेवणे.

★ **समारोप :—**

रोटरी क्लब लातुर या संस्थेचा अभ्यास करताना मला विशेष आनंद झाला, तसेच समाजातील विविध समस्या लक्षात आल्या त्या समस्येवर कसे उपाय करायचे याची कल्पना मिळाली.

या केंद्राला भेट देताना मला माजी अध्यक्ष प्रा. रो पुरूषोत्तम कालिया यांनी माहिती दिली. तसेच रोटरी क्लबची कार्यवाही व प्रक्रिया समजावुन सांगितली त्याबद्दलची त्यांचे विशेष आभार मानते.

Seen
9-2-22

JAIKRANTI COLLEGE OF EDUCATION, LATUR

Practical Assignment of 401

Educational Technology and ICT

Name- Mulla Alimunnisa Husain

Roll.NO- 58

Class- B.Ed forth semester

Year- 2020-2021

# JAI KARANTI COLLEGE OF EDUCATION, LATUR

| | | |
|---|---|---|
| NAME | :- | MULLA ALIMUNNISA HUSAIN |
| SUBJECT | :- | ICT |
| LESSON PLAN | :- | HINDI |
| ROLL NO. | :- | 58 |
| CLASS | :- | $9^{th}$ |

## वाक्य के प्रकार

### रचना की दृष्टि से

१. साधारण
२. मिश्र
३. संयुक्त

### अर्थ की दृष्टि से

१. विधानार्थक
२. निषेधार्थक
३. प्रश्नार्थक
४. आज्ञार्थक
५. विस्मयादिबोधक
६. संदेशसूचक

# विधानार्थक/विधानवाचक वाक्य

जिस वाक्य में किसी क्रिया के होने या करने की सूचना हो, उसे **विधानार्थक /विधानवाचक वाक्य** कहते हैं। **जैसे –**

(1) सिरचन को लोग चटोर भी समझते हैं। (2) करामत ड्यूटी पर जाने की तैयारी में था। (3) मैं भीतर तक काँप गया।

# निषेधार्थक/निषेधवाचक वाक्य

जिस वाक्य में किसी बात के न होने या न करने का बोध होता हो, उसे **निषेधार्थक/निषेधवाचक वाक्य** कहते हैं। **जैसे** –

(1) हम अपना विस्तार नहीं करते।

(2) मेरी गली में एक भी पेड़ नहीं है।

(3) लक्ष्मी ने आज भी दूध नहीं दिया।

## प्रश्नार्थक/प्रश्नवाचक वाक्य

: जिस वाक्य में किसी प्रकार का प्रश्न किया गया हो, उसे **प्रश्नार्थक**/प्रश्नवाचक **वाक्य** कहते हैं। **जैसे** –

(1) आपका कोर्स खत्म होने में कितना वक्त बचा है?

# आज्ञार्थक/आज्ञावाचक वाक्य

जिस वाक्य में किसी भी प्रकार की आज्ञा या प्रार्थना का बोध होता हो, उसे **आज्ञार्थक/ आज्ञावाचक वाक्य** कहते हैं। **जैसे** –

(1) करामत अली अपना ध्यान रखो।

# इच्छार्थक/इच्छावाचक वाक्य

जिस वाक्य में इच्छा, कामना, आशीर्वाद आदि का बोध होता है, उसे **इच्छार्थक / इच्छावाचक वाक्य** कहते हैं। **जैसे** –

(1) ऐसा काम करो कि देखने वाले देखते ही रह जाएँ।

# संदेहार्थक/संदेहवाचक वाक्य

जिस वाक्य में संदेह या शंका का बोध होता है, उसे **संदेहार्थक/संदेहवाचक वाक्य** कहते हैं।

**जैसे –**

(1) रहमान कह रहा था शायद कुछ लोग लक्ष्मी को खरीद लेंगे।

# संकेतार्थक/संकेतवाचक वाक्य

जिस वाक्य में संकेत या अपेक्षा का बोध होता है, उसे **संकेतार्थक/संकेतवाचक वाक्य** कहते हैं। **जैसे –**

(1) अगर गाय दूध नहीं देगी तो इसका क्या करेंगे?

# विस्मयार्थक/विस्मयादिबोधक वाक्य

जिस वाक्य में हर्ष, शोक, विस्मय, घृणा आदि का बोध होता है, उसे **विस्मयार्थक/ विस्मयादिबोधक वाक्य** कहते हैं। **जैसे –**

(1) ओह! कंबख्त ने कितनी बेदर्दी से पीटा है।

# JAI KARANTI COLLEGE OF EDUCATION, LATUR

| | | |
|---|---|---|
| NAME | :- | MULLA ALIMUNNISA HUSAIN |
| SUBJECT | :- | ICT |
| LESSON PLAN | :- | HISTORY |
| ROLL NO. | :- | |
| CLASS | :- | $9^{th}$ |

# स्वातंत्र्यलढ्याचे अंतिम पर्व

**१९३५ चा कायदा :** या कायद्याने भारतात ब्रिटिशशासित प्रांत आणि संस्थाने यांचे मिळून एक संघराज्य स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. यानुसार ब्रिटिशशासित प्रदेशांचा कारभार भारतीय प्रतिनिधींच्या हाती सोपवण्यात येणार होता.

# छोडो भारत ठराव



नेताजी सुभाषचंद्र बोस

सुभाषचंद्र बोस आपल्या भाषणातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव करण्याचे आवाहन भारतीयांना करू लागले. त्यामुळे सरकारने त्यांना बंदिवासात टाकले. तुरुंगात सुभाषबाबूंनी प्राणांतिक उपोषण सुरू केल्याने शासनाने त्यांना मुक्त करून त्यांच्या घरी नजरकैदेत ठेवले. तेथून वेषांतर करून सुभाषबाबूंनी सुटका करून घेतली.

## चलेजाव चळवळीचे महत्त्व

१९४२ च्या चळवळीने देशव्यापी आंदोलनाचे स्वरूप धारण केले. स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी लक्षावधी भारतीयांनी असीम त्याग केला. अनेकांनी आत्मबलिदान केले. आंदोलकांची संख्याच इतकी प्रचंड होती की, त्यांना डांबून ठेवायला देशातील तुरुंगही अपुरे पडले. साने गुरुजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज इत्यादींच्या राष्ट्रभक्तीपर गीतांनी आंदोलकांचा उत्साह वाढवला. या राष्ट्रव्यापी आंदोलनाला 'ऑगस्ट क्रांती' असेही म्हटले जाते.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



क्रांतिसिंह नाना पाटील

## प्रतिसरकारांची स्थापना

: देशाच्या काही भागांत ब्रिटिश अधिकाऱ्यांची हकालपट्टी करून तेथे लोकाभिमुख सरकारे स्थापन केली. यालाच प्रतिसरकार असे म्हणतात. बंगालमधील मिदनापूर, उत्तर प्रदेशातील बालिया व आझमगड, बिहारमधील भागलपूर व पूर्णिया या जिल्ह्यांत प्रतिसरकारे स्थापन करण्यात आली.

## स्फूर्तिगाथा बालवीरांची...



शिरीषकुमार

स्वातंत्र्य चळवळीमध्ये शाळकरी विद्यार्थ्यांनीही योगदान दिले. नंदूरबार येथे शाळेतील विद्यार्थ्यांनी शिरीषकुमार याच्या नेतृत्वाखाली तिरंगी झेंडा घेऊन मिरवणूक काढली. 'वंदे मातरम्'च्या घोषणा दिल्या. पोलिसांनी चिडून छोट्या मुलांवरही गोळीबार केला. या गोळीबारात शिरीषकुमार, लालदास, धनसुखलाल, शशिधर, घनश्याम हे शाळकरी विद्यार्थी हुतात्मे झाले.

# वैयक्तिक सत्याग्रह



आचार्य विनोबा भावे

ब्रिटिश सरकार मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करत असल्यामुळे राष्ट्रीय सभेने युद्धविरोधी प्रचार करण्याचे ठरवले. यासाठी सामुदायिक चळवळ न करता एकेका व्यक्तीने कायदेभंग करावा असा निर्णय घेण्यात आला. यालाच वैयक्तिक सत्याग्रह असे म्हणतात. आचार्य विनोबा भावे हे वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही होते. त्यांच्यानंतर सुमारे पंचवीस हजार सत्याग्रहींनी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेऊन तुरुंगवास स्वीकारला.

# आझाद हिंद सेनेची



रासबिहारी बोस

स्थापना : रासबिहारी बोस १९१५ पासून जपानमध्ये राहत होते. आग्नेय आशियातील देशप्रेमी भारतीयांना संघटित करून त्यांनी 'इंडियन इंडिपेंडन्स लीग' नावाची संघटना स्थापन केली. १९४२ च्या पूर्वार्धात जपानने आग्नेय आशियातील ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश जिंकले. तेथील ब्रिटिश सैन्यातील हजारो भारतीय सैनिक व अधिकारी जपानच्या हाती लागले.

# भूमिगत चळवळ



जयप्रकाश नारायण

१९४२ च्या अखेरीस जनआंदोलनाला नवे वळण मिळाले. आंदोलनाचे नेतृत्व तरुण समाजवादी कार्यकर्त्यांकडे आले. जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, छोटूभाई पुराणिक, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, युसूफ मेहेरअली, सुचेता कृपलानी, एस. एम. जोशी, शिरूभाऊ लिमये, ना.ग.गोरे, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, मगनलाल बागडी, उषा मेहता यांसारखे अनेक नेते आघाडीवर होते. रेल्वेमार्गांची मोडतोड करणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, पूल उद्ध्वस्त करणे इत्यादी मार्गांनी आंदोलकांनी दळणवळण व सरकारी यंत्रणा विस्कळीत केली. संपूर्ण भारतात आंदोलनाचे पडसाद उमटले.

Bharat Shikshan Prasarak Mandal Latur's

# Jaikranti Sr. College Of Education (B.Ed.)

शैक्षणिक क्रांती म्हणजेच जयक्रांती !

ज्ञानमेव जयते

Sitaram Nagar, Latur-413 512 Ph. (02382) 256309

Sem - IV th

**Academic Year :** 2021-2022

**Practicum / Enhancing Professional Capacities / Practical Courses**

**Code & Subject :** 402- Peace Education

Student Name : Dukare Nikhil N.

Roll No. : 20

Class : **B.Ed. ~~F.Y~~ / S. Y.** ✓

Semester : IV

भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित

# जयक्रांती अध्यापक महाविद्यालय

## (बी. एड्.)

सिताराम नगर, लातूर

२०21 -२०22

# प्रमाणपत्र

श्री / श्रीमती / कु. कुकरे निखिल नंदकिशोर

वर्ग B.Ed. S.Y सत्र IV ह. क्र. 20 यांनी शैक्षणिक वर्ष 2021-22

मध्ये ______

समाधानकारक/चांगले/उत्तमरित्या पूर्ण केले.

करिता हे प्रमाणपत्र देण्यात येते.

दिनांक :

प्रभारी अधिव्याख्याता
______ विभाग

प्राचार्य
जयक्रांती अध्यापक
महाविद्यालय (बी.एड्.), लातूर

अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. | विषय शिक्षक स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|
| | प्र.1 एका शाळेचे सर्वेक्षण आणि एका शिक्षकाची मुला | 1 | | |
| | प्र.2 शांतिमूल्य समकालीन करण्यासाठी सखोल शांततेचा दृष्टिकोन विकसित करण्यासाठी तुम्ही शिक्षक या नात्याने शांती मार्गाने काय कराल. | 15 | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

छात्राध्यापकाचे नाव : कुकरे शिवलीला नंदकिशोर

वर्ग : बी. एड्. द्वितीय वर्ष (चतुर्थ सत्र)

हजेरी क्र : 20

विषय : शांतता शिक्षण (402)

शैक्षणिक वर्ष : 2021-2022

मार्गदर्शक : प्रा. पाडे सर



*Inner Peace*

BEGINS THE MOMENT
YOU CHOOSE NOT TO
ALLOW ANOTHER
PERSON OR EVENT
TO CONTROL
YOUR EMOTIONS.

दि. 01/06/2022

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, जयक्रांती अध्यापक महाविदयालय (बी.एड.) लातूर सन २०२१-२०२२ मधील छात्राध्यापक 1) **गणेश शंकर ढेकणे** 2) **शांतेश्वर बालाजी माने** 3) **निखील नंदकिशोर डुकरे** यांनी आमच्या भगवान माध्यमिक विद्यालय, रिंग रोड, लातुर शाळेस प्रात्येक्षिक कार्य संदर्भात भेट देऊन शिक्षकांशी संवाद साधला व शाळेची माहिती घेतली.

सबब प्रमाणपत्र देण्यात येते,

मुख्याध्यापक
श्री भगवान माध्यमिक विद्यालय
रिंगरोड ... चौक, लातूर
शिक्का / सही

प्र. 1 एका शाळेचे सर्वेक्षण व एका शिक्षकाची मुलाखत.

(विषय: शाळा शांततेसाठी केले जाणारे प्रयत्न - शाळा / शिक्षक)

प्रस्तावना

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व विकासाचे प्रमुख साधन आहे, समाजातील सर्व प्रश्नांची उकल करण्यासाठी व शाश्वत बदल तसेच शांततापूर्ण समाज टिकवण्यासाठी शिक्षणातून जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

समाजातील शाळा हे असे स्थान आहे, जिथे भावी नागरिक घडविले जातात, शांततेचे वातावरण शिक्षणातून निर्माण होण्यासाठी सर्व शिक्षण व्यवस्था त्यातील अनुभवात्मक अध्यापन पद्धती, आंतरक्रिया, अध्ययन-अध्यापन क्रिया यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

सदर प्रात्यक्षिक कार्यासंदर्भात मी छात्राध्यापक या नात्याने श्री. मारवाड प्रा. व माध्यमिक विद्यालय, रिंग रोड, लातूर या



शाळेला भेट देऊन तेथील शिक्षकांशी संवाद साधला. शाळेत शांतता नांदावी म्हणून प्रयत्न करणारा शाळेतील शिक्षक वृंदाचे कौतुक केले तेवढे कमी वाटते. यानिमित्त शिक्षकांशी साधलेला आढावा.

* शाळेचे सर्वेक्षण

शाळेचे सर्वेक्षण खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

शाळेचे नाव :- श्री. भगवान प्रा. व माध्य. विद्यालय, रिंग रोड, लातूर.

शाळेची मान्यता :- 2000 सालापासून

वर्ग :- 1 ते 10 वी

विद्यार्थी संख्या :- 389

वर्ग खोल्या :- कार्यालयासह एकूण 20

शाळेच्या इमारतीचा आकार :- L

शाळेची वेळ :- 1 ते 4थी = 12:30 ते 5:30
5 ते 10 वी = 7:30 ते 12:30


There is no greater
wealth in this world
than peace of mind.



* शाळेच्या शैक्षणिक सुविधा

1) स्वतंत्र प्रयोगशाळा
2) स्वतंत्र ग्रंथालय
3) स्वतंत्र अभ्यासिका
4) मोफत शैक्षणिक पुस्तकांचे वाटप
5) मोफत गणवेश वाटप
6) स्पर्धा परिक्षा (स्कॉलरशिप, नवोदय MTS etc.) यासाठी विशेष तासिका

* शाळेच्या भौतिक सुविधा

1) मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह
2) स्वतंत्र क्रीडांगण
3) बसण्यासाठी बेंचेसची सुविधा
4) प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र वर्ग-खोल्या
5) स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा
6) दुपारच्या सुट्टीमध्ये पोषण आहाराची सोय


The less you respond
to negative people,
the more peaceful
your life will
become

* शाळेतील सहशालेय उपक्रम

1) शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला उत्साहात शाळा पहिली व पाचवीच्या विद्यार्थ्यांची वेलकम पार्टी
2) ग्रंथ दिंडीचे आयोजन (वाचन प्रेरणा दिवस)
3) नवीन वृक्ष लागवड व संवर्धन
4) महापुरुषांच्या जयंती / पुण्यतिथी यांचे छोट्या स्वरूपात आयोजन
5) वर्षातून एकदा सहलीचे आयोजन
6) जानेवारी मध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन
7) परिपाठामध्ये नैतिक व संविधानिक मूल्ये रुजविण्यासाठी वेगवेगळ्या प्रार्थना, सुविचार, गीते यांचा समावेश
8) शालेय स्तरावर विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन
9) प्रत्येक इयत्तेमधून लोकशाही पद्धतीने वर्ग प्रतिनिधी व वर्ग प्रतिनिधींमधून शाळा प्रतिनिधींची निवड (मुलींसाठी 50% आरक्षण)

वरील उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये समानता, धर्मनिरपेक्षता, नैतिक मूल्ये, चारित्र्य शिक्षण, राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक वारसा



समाजाबद्दल आदर, पर्यावरण संवर्धन, आध्यात्मिक विकास, वाचनाची आवड, अशा अनेक गुणांनी समायुक्त होईल, ~~त्यामुळे~~ शाळा ही समाजाची प्रतिकृती असल्यामुळे शाळेमध्ये तसेच समाजामध्ये शांतता सलोख्यासाठी मदत होईल.

* शाळेतील एका शिक्षकाची मुलाखत

शिक्षकाचे नाव :- श्री. रमाकांत उद्धवराव इपार

पत्ता :- कुलस्वामिनी नगर, पाच नंबर लातूर.

शिक्षण :- M.A. B.Ed

कार्यरत शाळा :- श्री. भगवान प्रा. व माध्य. विद्यालय, रिंग रोड, लातूर

शाळेत रुजू झाल्याची तारीख :- 17-06-2002

अध्यापन विषय :- मराठी, भूगोल

आदर्श :- 1) साने गुरुजी
2) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

अनुभव :- २० वर्षे

आवडलेला क्षण :- २००९ साली शाळेला आदर्श पुरस्कार (हा पुरस्काराचे वेगळे महत्त्व म्हणजे शाळेच्या विद्यार्थी संसदेतून लोकशाही पद्धतीने माझी सर्वानुमते बिनविरोध आदर्श शिक्षक म्हणून निवड)

आठवणीतील आवडता विद्यार्थी:
तसे पुष्कळ आहेत, परंतु वरच्या स्थानावर
"नारायण शिरसे"
सध्या 'STI' म्हणून कार्यरत त्याचे विशेष म्हणजे शांत, हुशार, मृदुभाषी आणि सामंजस्य वृत्ती

शाळा आणि शिक्षक यांच्याद्वारे आपण शांततेसाठी केलेले प्रयत्न:
शांतता आणि आनंद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, एक नाराज असली तर दुसरीपण रुसून जाते त्यामुळे

शालेय विद्यार्थ्यांमध्ये शांतता रूजविण्यासाठी शालेतील उपक्रम, शिक्षकांचे वर्तन विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक असतात.

2005 च्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यामध्ये शांतता शिक्षणाचा विशेष समावेश केला आहे.

शांतता विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी समानता, धर्मनिरपेक्षता, समाजाबद्दल आदर, मानवी मूल्य, पर्यावरणाचे महत्त्व, राष्ट्रीय एकात्मता, बंधुता, चारित्र्य संपन्नता, व्यक्तिमत्वाचा विकास या गुणांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी शालेय स्तरावर,

1) परिपाठ
2) सहल
3) स्नेहसंमेलन
4) वाचन प्रेरणा दिवस साजरा करणे.
5) सांघिक खेळाचे आयोजन

असे अनेक उपक्रम राबविले जातात.

आपण शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांना काय संदेश द्याल?

शाब्दिक गद्य मांडणी करण्यापेक्षा मला कविता पद्य रूपाने सारांशाने उत्तर द्यायला आवडेल.

" शरीर मनाने झोकून गेले, चरित्र त्यांचे पाहताना
आपणाही त्यांच्यासम व्हावे हाची त्यातील बोध खरा!"

" हम रुकने को नहीं न थकेंगे, सिखेंगे,
हम झुकने को नहीं न सिखे,
काम करेंगे,
काम करेंगे।"

" प्रामाणिकपणा असे ज्याचे पोटी,
धावितो त्याचेपाठी सर्व प्राणी।"
- महात्मा फुले

14/06/2022

**समारोप:**

"शाळा म्हणजे कुटुंब", या उक्तीवर चालणारे इथर सर आणि त्यांची शाळा विशेषत: शांती शिक्षणासाठी करत असलेले प्रयत्न प्रत्यक्षात शाळेवर प्रात्यक्षिक कार्यक्रमा-निमित्ताने अनुभवण्याचा योग आला आणि आपणसुद्धा शिक्षकपेशा निवडला याचा अभिमान वाटला. शाळेमध्ये वेगवेगळे

होणारे उपक्रम, दैनंदिन कामकाज या विद्यार्थ्यां-
चा संपूर्ण विकास होण्यासाठी महत्त्वाचे असतात
हे त्यांच्या बोलून ऐकल्यामुळे शिक्षक म्हणून
समाजाची आपल्यावर असणारी जबाबदारी
त्यांच्यामध्ये दिसून येते.

एकूणच बी.एड्. चा हा प्रात्यक्षिक
कार्याचा भाग आणि त्या निमित्ताने घडून
आलेली ही भेट भविष्यामध्ये शिक्षक म्हणून
कार्य करताना निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

# समारोप

प्र. शांतिमूल्ये समकालीन करण्यासाठी संदर्भ शांततेचा दृष्टिकोन व कौशल्ये विकसित करण्यासाठी भूमिका शिक्षक या नात्याने शांतीच्या मार्गाने काय करू शकता याबद्दल सविस्तर शब्दांकित करा.

प्रस्तावना :

भारतीय समाजव्यवस्थेच्या उद्याच्या सुजाण नागरिक बनवणाऱ्या पिढ्या शाळेच्या वर्गा-वर्गातून घडत असतात. त्यांना घडविण्याचे थोर कार्य शिक्षक करीत असतात. विद्यार्थ्यांना आई वडिलांच्या नंतर त्यांच्या समोर आदर्श वाटत ही शिक्षकच असते. म्हणून त्यांच्या मनावर प्रभाव टाकणे, शिकवणे, व्यक्तिमत्त्व फुलवणे व सक्षम बनवण्याचे कार्य शिक्षकच करीत असतात. हे कार्य करीत असताना शिक्षकांनाही खूप सावध पद्धतीने आपले काम पूर्णत्वाकडे घेऊन जावे लागते जेणेकरून वर्गामध्ये बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडेल आणि ते जीवनामध्ये उभे राहतील. जीवनामध्ये शांतता व नीती नियमांचे पालन करायला शिकवण्याचे कार्य शिक्षक वर्गातच करीत असतात.

शांततेच्या व्याख्या :

1) "लोकांना एकमेकांशी बोलणे आणि आंतर क्रिया करण्याच्या मार्गात सलोख्यासाठी प्रेरणा देणे आणि परस्परांना त्रास देणे, दुर्लक्ष करणे, नष्ट करणे यापासून परावृत्त करण्याचे वर्तन म्हणजे शांतता होय".

- थेरेसा एम. के व टर्नर

2) "हे संपूर्ण जग आपले बनवू यात कोणीही परका नाही, म्हणजेच शांतता आपोआप निर्माण होईल."

- महात्मा गांधी

शांतता शिक्षणाची व्याख्या :

1) "शांतता शिक्षण कौशल्यांची निर्मिती आहे. संघर्षावर मात करून सलोख्याने त्याच्या सोबत इतरांसोबत आणि जगात राहण्यासाठी सर्जनशील आणि नेमके मार्ग निवडण्यासाठी बालकांना सक्षम बनवते, त्याला 'शांतता शिक्षण' असे म्हणतात."

- एलिस फ्राइडमन आणि फॅन स्कमिडर

2) "बालकांना, तरुणांना आणि प्रौढांना संघर्ष आणि हिंसा अहिंसात्मक आणि संरचनात्मक संघर्ष शांततामय मार्गाने सोडविण्यासाठी वर्तमान बदल घडविण्यास आवश्यक असे ज्ञान, कौशल्य, अभिवृत्ती आणि मूल्य यांची माहिती देण्याची प्रक्रिया म्हणजे शांतता शिक्षण होय."

— युनिसेफ

शांती मूल्ये :

1) संविधानिक मूल्यांचा स्विकार
2) मानवतावाद सर्वोच्च मूल्य
3) चारित्र्य संवर्धन
4) सर्व धर्म समभाव
5) स्त्री - पुरुष समानता
6) लोकशाही मूल्यांची जोपासना करणे
7) निःपक्षपातीपणा
8) सेवावृत्ती
9) श्रमप्रतिष्ठा
10) सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारणे.

जीवनात शांतता टिकविण्यासाठी शांती मूल्ये फार महत्त्वाची आहेत.

जीवन कौशल्ये :

1) बालकामध्ये व्यावहारिक शिक्षणाचा विकास करणे.
2) स्व ची जाणीव निर्माण करणे
3) चिकित्सक विचार
4) वेळेचे नियोजन
5) संतुलीत आहार
6) सर्जनशील विचार
7) संभाषण चातुर्य
8) विषम परिस्थितीशी समायोजन
9) भाव-भावनांचे समायोजन
10) ताण-तणावांचे व्यवस्थापन
11) समस्या निराकरण
12) सहयोगपूर्ण भावना
13) मधुर भाषिक
14) निर्णय क्षमता

वरीलप्रमाणे आपण शांतीमुळे व जीवन कौशल्ये कोणते आहेत हे जाणून घेतले. शिक्षक म्हणून शांतता समकालिन करण्यासाठी वरील काही महत्त्वाच्या आहेत. शिक्षक म्हणून काम करत असताना शांतीमुळे समकालीन करणे, शांततेचा दृष्टिकोन व कौशल्ये विकसित करण्यासाठी आपणाला खालील प्रमाणे मुद्द्यांचा

त्याचबरोबर वेळोवेळी त्यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना समाजात मान दिला, यानंतर त्यांना समायोजित करण्यासाठी एक शिक्षक म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आपल्या हातात आहे.

1) समानतेची वागणूक :

भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत हक्कांमधील कलम 14 ते 18 यामध्ये समानतेचा समावेश आहे, शिक्षक म्हणून आपण समानतेची मूल्य आपल्या स्वतःच्या आचरणामध्ये रुजवून विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, यासाठी शाळेमध्ये सांघिक स्पर्धा, मैदान स्वच्छता अशा कृती करताना सर्वांना समानतेची वागणूक मिळेल याची खात्री करावी. यामुळे गरीब-श्रीमंत, मुलगा-मुलगी असे भेद निर्माण होणार नाहीत.

2) सहकार्याबाबतची चांगली भावना :

शिक्षकांमधील मतभेद विद्यार्थ्यांपुढे न मांडता सहकार्यवृत्ती दाखवावी, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्येही सहकार्यवृत्तीचा विकास होईल. सहकार्य वृत्ती असेल तरच भविष्यात

विद्यार्थी प्रगती गाठतील.

3) जबाबदारीची जाणीव :

शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम करीत असतांना आपल्या कार्यक्षमा माध्यमातून इतर सहकार्यांच्या समोर आदर्श निर्माण करता येतो. शाळा भरण्याच्या पूर्वी शाळेच्या परिसरात उपस्थित राहणे, वेळापत्रकानुसार वर्गावर जाणे यामुळे आपले सहकारी शिक्षक व वर्गातील विद्यार्थी ही शिक्षकाचे बारकाईने निरीक्षण करून आपले वर्तन करीत असतात. त्यामुळे आपण शिक्षक म्हणून जबाबदारीने काम करून सर्वांना पुढे आदर्श बनता येते.

4) परस्परांचा आदर :

आपल्या अध्ययन आणि अध्यापन कार्यातून आदरपूर्वक भाषा वापरावी, तसेच आपले सहकारी किंवा अधिकारी यांच्या विषयी बोलण्याचा प्रसंग येईल तेव्हा त्यांच्याविषयी आदरार्थी भाषा करावी. त्यामुळे विद्यार्थी ही आपल्या गुरु बद्दल, आई-वडील, मित्र परिवार वरिष्ठ व्यक्ती यांच्या बद्दल आदरपूर्वक बोलतील व वर्तन ही करतील त्यामुळे त्यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

5) <u>सुरक्षित</u> <u>वातावरण</u> :

शिक्षण प्रक्रियेमध्ये विद्यार्थी, शिक्षक व शाळे संबंधित असलेल्या घटकांना सुरक्षित वाटणे फार आवश्यक आहे. सुरक्षितता असेल तर मोकळ्या वातावरणात आत्मविश्वासाने चांगले काम करता येते व जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी सुरक्षितता महत्त्वाचे आहे म्हणून शिक्षक या नात्याने शाळेचे वातावरण सुरक्षित कसे राहील याकडे लक्ष दिले पाहिजे त्यातल्या वातावरण सुरक्षित राहिल्यास मुलींचे शिक्षणातील प्रमाण ही वाढेल आणि पालकांनाही चिंता वाटणार नाही.

6) <u>स्वातंत्र्यावर</u> <u>भर</u> <u>देणे</u> :

स्वातंत्र्य ही भारतीयांना लाभलेली लोकशाहीची देण आहे. स्वातंत्र्य मिळालेली व्यक्ति उत्साहपूर्वक, आनंदाने व आत्मविश्वासाने आपले काम पूर्ण करू शकते म्हणून शिक्षकांनी अनेक वेळा विद्यार्थ्यांना एखाद्या कामाची जबाबदारी देऊन विद्यार्थी ते काम कशा प्रकारे पूर्ण करतात याची पाहणी करून स्वातंत्र्याचा प्रभावीपणा देखील तपासून पाहतात यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त निर्माण होण्यास मदत होते.

7) शिस्त आणि वर्तनात सुधारणा :

शिक्षण हे वर्तनात परिवर्तन करणारे साधन आहे, म्हणून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त लावून त्यांच्या वर्तनात इष्ट बदल घडवण्याचे काम करतात त्यामुळे त्यांच्या जीवनाला वळण लावण्यास मदत होते. शिस्त लावण्यासाठी शिक्षण म्हणून वेगवेगळे प्रयोग करून विद्यार्थ्यांना शिस्त लावत असतात ज्या ठिकाणी शिस्त असते तेथे प्रगती असते म्हणून शिस्तीला प्राधान्य दिल्यास वर्तनात चांगले बदल दिसून येतात.

8) सृजनशीलतेचा विकास :

शिक्षणाच्या माध्यमातून बालकामध्ये सर्व गुणांना विकसीत करण्याचे काम आपल्याला करावे लागते, त्यामुळे वर्गात बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या कला दडलेल्या असतात त्यांना शिक्षक या नात्याने योग्य वेळ देवून मार्गदर्शन केल्यास कलेच्या क्षेत्रातही चांगले काम करु शकतात, त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांकडे एखादी कला असते तेव्हा त्याच्या जीवनामध्ये आनंदी असतो म्हणून सृजनशीलतेचा विकास करणे हे आपले कर्तव्य आहे.

9) शांतता कालावधी स्थापना करणे :

शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या समस्या सोडवण्यासाठी एका शांतता कालावधी स्थापना करण्यात यावी, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समस्या जीवनामध्ये निर्माण झाल्यास कशी सोडवायची त्यासंबंधी कोण-कोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे. हे प्रयत्नपूर्वक पाहिल्या-मुळे शाळेतील शांतता कालावधी फायदा त्याला त्याच्या जीवनामध्येही होवू शकतो.

10) मानवाधिकार व कर्तव्य यासंबंधी माहिती :

मानवाला जन्मजातच काही अधिकार मिळालेले असतात मात्र त्यांच्या परिस्थि-तीनुसार मानवाला बंधने येतात मात्र घटनेच्या माध्यमातून मानवाच्या स्वातंत्र्याला सुरक्षित करण्याचे प्रयत्न केलेला आहे, त्यामुळे मानवाला आपला अधिकार आणि कर्तव्याची जाणीव करून दिल्यास त्यांच्या जीवनामध्ये शिस्त लागून नियम, कायद्याची अनुकरण करून आपण आपले जीवन सुसाकार करण्याचा प्रयत्न करतो.


Peace
begins when
expectation ends.


FAITH
HOPE
JOY
LOVE
PEACE
UNITY


Peace is not
the highest goal in lif
It is the most fundame
requirement.


Peace
VectorStock

## समारोप :

'शिक्षण म्हणजे वर्तमान परिवर्तन करणारे साधन आहे.' विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाच्या माध्यमातून शांततेची मूल्य व कौशल्य यांची रुजवणूक करण्याची जबाबदारी एक शिक्षक म्हणून आपल्यालाच करावी लागते. सदर प्रात्यक्षिक कार्यातून एक शिक्षक म्हणून शांततेचे महत्त्व तसेच त्यांची विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक करण्याचे महत्त्व समजून घेतले. शांतता शिक्षणाचे कार्य हे विद्यार्थ्यांचे संपूर्ण कल्याण, त्यांना मनाप्रमाणे सल्ला आणि युवकांना समाजातील वागणूक शिक्षक आणि विद्यार्थी दोन्हींची वैयक्तिक आणि सामाजिक जबाबदारी यावर आधारित आहे.

# समारोप